CMYK

सोलापूर
# तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | शनिवार, २७ जून २०२६ | युगाब्द ५१२८ | वर्ष ४२ वे अंक २०९ | पाने १२ | किंमत रु. ८/-

|RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



भिन्न भिन्न प्रकारचे भिन्न भिन्न लोक आपल्या संबंधात येत असतात. असे संबंध माधुर्याने ओतप्रोत भरले पाहिजेत. यासाठी आपणास आपले व्यवहार शुद्ध आणि स्नेहमय करणे आवश्यक आहे.

**- स्व. सुरेशराव केतकर**
रा. स्व. संघाचे पूर्व सह सरकार्यवाह

## आज शिवराज्याभिषेक दिन



# तीन वर्षांत भारत होणार 'ड्रग्ज'मुक्त

दिल्लीतील विज्ञान भवनात शुक्रवारी आयोजित 'नार्को-कोऑर्डिनेशन सेंटर'च्या दहाव्या उच्चस्तरीय बैठकीला ते संबोधित करीत होते. केंद्र सरकार देशातील अमली पदार्थांच्या तस्करीविरोधातील कारवाई तीव्र करणार असल्याचे सांगत त्यांनी 'नार्कोटिक्स कंट्रोल व्हिजन डॉक्युमेंट'चे प्रकाशन केले. या देशाला अमली पदार्थमुक्त करण्यासाठी पुढील तीन वर्षांचा आराखडा मांडण्यात आला आहे.

गृह मंत्रालय आणि नार्कोटिक्स कंट्रोल ब्युरो यांनी आयोजित केलेल्या या बैठकीचा मुख्य उद्देश देशभरात अमली पदार्थांची तस्करी आणि गैरवापराविरोधात सुरू असलेल्या मोहिमांचा आढावा घेणे आणि त्या अधिक मजबूत करणे हा होता. यामध्ये विविध मंत्रालये, राज्य सरकारे आणि अमली पदार्थविरोधी कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या संस्थांचे प्रतिनिधी सहभागी होणार आहेत. अमली पदार्थविरोधातील शून्य-सहिष्णुता धोरण अधिक प्रभावी करण्यासाठी सर्व यंत्रणांमध्ये उत्तम समन्वय आवश्यक असल्याचा सूर बैठकीत उमटला. अमित शाह म्हणाले, पुढील वर्षभरात कोणत्याही अमली पदार्थविरोधातील कारवाई संदर्भातील कारवायांमध्ये प्रत्येक मापदंडात लक्षणीय सुधारणा झाली पाहिजे आणि हे पुढील वार्षिक अहवालात दिसून आले पाहिजे. अमली पदार्थांविरुद्धचा लढा गुप्तचर माहितीवर आधारित असला पाहिजे. अमली पदार्थांच्या तस्करीचा मुकाबला करण्यासाठी नेटवर्क केंद्रित धोरण अवलंबले पाहिजे. अमली पदार्थांच्या तस्करीविरुद्धच्या लढ्यात कठोर आणि निर्दयी दृष्टिकोन आवश्यक आहे, असे शाह म्हणाले.

### अमित शाह यांनी जाहीर केला नवा आराखडा
### अमली पदार्थांच्या तस्करीबाबत सरकार कठोर

**नवी दिल्ली, २६ जून**

**मादक पदार्थांची तस्करी कायमस्वरूपी नष्ट करण्याच्या दृष्टीने येणारी तीन वर्षे देशासाठी महत्वाची ठरणारी आहेत. मादक पदार्थांची मागणी आणि पुरवठा साखळी तोडण्याचे काम देशातील गुप्तचर संस्थांच्या मदतीने केले जाणार आहे. युवापीढीला मादक पदार्थांमुळे होणाऱ्या वेदना पूर्णपणे थांबविणे, हे आमचे लक्ष्य असून यासाठी तीन वर्षांचा कृती आराखडा तयार करण्यात आला आहे, अशी माहिती केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी दिली आहे. देशातील नक्षलवाद कठोरतेने संपुष्टात आणल्यानंतर अमित शाह यांनी आपला मोर्चा आता ड्रग्ज तस्करांकडे वळविला आहे.**



### पुरवठा साखळी तोडण्यावर विशेष भर

नार्कोटिक्स कंट्रोल व्हिजन डॉक्युमेंटमध्ये अमली पदार्थांची मागणी कमी करणे, तस्करीची पुरवठा साखळी तोडणे आणि व्यसनींचे पुनर्वसन करणे यावर विशेष भर दिला जाईल. हा दस्तऐवज भविष्यात अमली पदार्थांविरुद्धच्या राष्ट्रीय धोरणाचा आधार बनेल. या व्हिजन डॉक्युमेंटमध्ये सिंथेटिक ड्रग्सचा वाढता वापर आणि डार्कनेटद्वारे होणारी अमली पदार्थांची तस्करी यांसारख्या नवीन आव्हानांना तोंड देण्यासाठीच्या धोरणांचाही समावेश आहे. याव्यतिरिक्त, अमली पदार्थांच्या व्यसनाने बाधित झालेल्यांसाठी जनजागृती मोहीम, उपचार सुविधा आणि पुनर्वसन सेवा अधिक मजबूत करण्यासाठी आराखडा तयार केला आहे. (वृत्तसंस्था)

### ड्रग्स माफियांविरुद्ध कठोर कारवाई

ड्रग्स माफिया आणि त्यांचे पाठीराखे यांच्याविरोधात कठोर कारवाई केली जाईल. मादकपदार्थ विरुद्धची लढाई ही केवळ पोलिस अथवा एखाद्या संस्थेची नाही. युवापिढीचे भविष्य बिघडविणाऱ्या अमली पदार्थ तस्करांच्या विरोधातील मोहिमेत राज्य आणि केंद्रिय संस्था, समाज, शिक्षक आणि धार्मिक नेत्यांनी एकत्र येणे आवश्यक आहे, असे शाह यावेळी म्हणाले.

# एमपीएससी पूर्व परीक्षा आता सीबीटी पद्धतीने

## २१ दिवसांत निकालाचे लक्ष्य; अध्यक्षांनी दिली माहिती

**मुंबई, २६ जून**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने (एमपीएससी) भरती प्रक्रिया अधिक वेगवान, पारदर्शक आणि कालबद्ध करण्याच्या दृष्टीने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. यापुढे आयोगाच्या सर्व पूर्व परीक्षा संगणकाधारित कॉम्प्युटर बेस्ड टेस्ट (सीबीटी) पद्धतीने घेण्यात येणार असून, पूर्व परीक्षांचे निकाल २१ दिवसांच्या आत जाहीर करण्याचे लक्ष्य निश्चित करण्यात आले आहे. तसेच ज्या वर्षी परीक्षा होईल, त्याच वर्षात भरती प्रक्रिया पूर्ण करण्यासाठीही आयोगाने नियोजन केले असल्याची माहिती महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे अध्यक्ष विवेक भीमनवार यांनी दिली.

आयोगाच्या कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यापूर्वी परीक्षा निकाल आणि पुढील निवड प्रक्रियेत होणाऱ्या विलंबामुळे उमेदवारांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. ही परिस्थिती बदलण्यासाठी आयोगाने पूर्व परीक्षांचे निकाल २१ दिवसांच्या आत जाहीर करण्याचे नियोजन केले आहे. नुकताच राज्यसेवा पूर्व परीक्षेचा निकाल अवघ्या २२ दिवसांत जाहीर करण्यात आला असून, आगामी सर्व पूर्व परीक्षांसाठी २१ दिवसांचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. भरती प्रक्रियेलाही निश्चित कालमर्यादा देण्यात आली आहे. मुलाखत असलेल्या पदांची निवड प्रक्रिया ९ ते ११ महिन्यांत, तर केवळ लेखी परीक्षा असलेल्या पदांची भरती ६ ते ७ महिन्यांत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. (तभा वृत्तसेवा)

### मुख्य परीक्षा जुन्या पद्धतीनेच होणार

राज्यसेवा, गट 'अ', गट 'ब' आणि गट 'क'च्या मुख्य परीक्षांच्या स्वरूपात कोणताही बदल करण्यात आलेला नाही. मुख्य परीक्षा यापूर्वीप्रमाणेच पारंपरिक लेखी पद्धतीनेच घेतली जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. सीबीटी आणि नॉर्मलायझेशन ही नवी संकल्पना नसून आयोगाने आतापर्यंत सुमारे १४० परीक्षा या प्रणालीद्वारे यशस्वीपणे घेतल्या आहेत. ही पद्धत वैज्ञानिक असून न्यायालयानेही तिला मान्यता दिली आहे.

# नवीन भाषा धोरण सध्या लागू होणार नाही

**नवी दिल्ली, २६ जून**

केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या (सीबीएसई) विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. शिक्षण मंत्रालयाच्या सूत्रांनुसार सध्या इयत्ता ७ वी, ८ वी आणि ९ वी मध्ये शिकत असलेले आणि त्रि-भाषा धोरणांतर्गत दोन परदेशी भाषा निवडलेले विद्यार्थी इयत्ता १० वी पर्यंत त्याच भाषा संयोजनासह शिक्षण सुरू ठेवू शकतील. त्यांना मध्येच विषय बदलण्याची आवश्यकता भासणार नाही.

सूत्रांनुसार, त्रि-भाषा धोरणांतर्गत किमान दोन भारतीय भाषा शिकण्याची अट केवळ नवीन प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांनाच लागू होईल. (वृत्तसंस्था)

## महत्त्वाचे

### वर्ल्ड चॅम्पियन भारताला आयर्लंडने नमविले

**बेलफास्ट** : टी-२० विश्वविजेत्या भारताला जगात १२व्या क्रमांकावर असलेल्या आयर्लंडकडून पराभव पत्करावा लागला. शुक्रवारी बेलफास्ट येथे झालेल्या दोन सामन्यांच्या मालिकेतील पहिल्या सामन्यात आयर्लंडने ३४ धावांनी विजय मिळवला. मार्चमध्ये टी-२० विश्वचषक जिंकल्यानंतर भारतीय संघ हा आपला पहिलाच सामना खेळत होता. आयर्लंडविरुद्ध भारताचा हा पहिलाच पराभव होता. नाणेफेक गमावून प्रथम फलंदाजी करताना आयर्लंडने २० षटकांत ९ गडी गमावून १८२ धावा केल्या. लॉर्कन टकरने ५० धावा केल्या. प्रत्युत्तरात, भारतीय संघ १८.५ षटकांत केवळ १४८ धावाच करू शकला. सलामीवीर अभिषेक शर्माने २० चेंडूंमध्ये ५० धावा करून सर्वाधिक धावा केल्या. सात भारतीय फलंदाज दुहेरी आकडा गाठण्यात अपयशी ठरले. युवा फलंदाज वैभव सूर्यवंशीला या सामन्यात पदार्पणाची संधी मिळाली नाही.

### स्टोन क्रेशर मशीनवर काम करताना शॉक लागून कामगाराचा मृत्यू

**सोलापूर** : स्टोन क्रेशर मशीनवर काम करीत असताना विजेचा जोरदार धक्का लागल्याने एका ३५ वर्षीय कामगाराचा जागीच मृत्यू झाल्याची घटना तळे हिप्परगा येथे शुक्रवारी सकाळी ९.३० वाजता घडली. बाळू पांडुरंग गेजगे (रा.पसारे वस्ती, तुळजापूर नाका, सोलापूर) असे मयत कामगाराचे नाव आहे. गेल्या पंधरा वर्षापासून तळे हिप्परगा येथील वीर नागनाथ स्टोन क्रेशर मशीनवर कामास होता. नेहमीप्रमाणे शुक्रवारी सकाळी तो कामावर आला होता. काम दरम्यान त्याला विजेचा जोराचा धक्का लागला. त्यात तो जागेवर बेशुद्ध होऊन पडला. त्याला उपचारासाठी येथील शासकीय रुग्णालयात भाचा रतन याने दाखल केले असता डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. त्याच्या पश्चात पत्नी व एक मुलगा असल्याची माहिती नातेवाईकांनी दिली.

# 'ऑपरेशन सिंदूर'मध्ये सहा जवान हुतात्मा

केंद्र सरकारकडून प्रथमच माहिती सार्वजनिक

**नवी दिल्ली, २६ जून**

जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाम दहशतवादी हल्ल्याला लष्करी प्रत्युत्तर म्हणून राबवण्यात आलेल्या 'ऑपरेशन सिंदूर' दरम्यान हुतात्मा झालेल्या सहा लष्करी जवानांची नावे केंद्र सरकारने प्रथमच जाहीर केली आहेत. यात पाच भारतीय लष्करातील आणि वायुदलातील एका जवानाचा समावेश आहे. सहा हुतात्म्यांची नावे राष्ट्रीय युद्ध स्मारकाच्या संकेस्थळावरील 'रोल ऑफ ऑनर' विभागात प्रसिद्ध करण्यात आली आणि राजधानी दिल्लीतील राष्ट्रीय युद्ध स्मारकावरही कोरण्यात आली आहेत.

२२ एप्रिल रोजी पहलगाममधील बैसरन खोऱ्यात दहशतवाद्यांनी केलेल्या गोळीबारात २५ पर्यटक आणि एका स्थानिक घोडावाल्यासह २६ जण ठार झाले. यानंतर भारतीय सैन्याने 'ऑपरेशन सिंदूर' राबवत पाकिस्तानला जोरदार प्रत्युत्तर दिले, यात शहीद झालेल्या सहा जवानांची नावे पहिल्यांदाच सार्वजनिक केली आहेत. पाकिस्तान आणि व्याप्त काश्मीरात

भारतीय जवानांनी भीमपराक्रम गाजवत पाकिस्तानला त्याची जागा दाखवून दिली. भारतीय जवानांच्या माऱ्यासमोर पाकिस्तानने गुडघे टेकले आणि संघर्षविरामासाठी अक्षरशः भीक मागितली. या मोहिमेवेळी आपल्या पराक्रमाची शर्थ करणाऱ्यांना ६ जवानांना हौतात्म्य आले. या हौतात्म्यांची नावे आता पहिल्यांदाच सार्वजनिक करण्यात आली आहेत. त्यांना वीरता पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. या मोहिमेदरम्यान भारतीय सशस्त्र दलांना झालेल्या नुकसानीची सरकारने सार्वजनिकरित्या आणि अधिकृतपणे दखल घेण्याची ही पहिलीच वेळ आहे. (वृत्तसंस्था)

# होर्मुझच्या सामुद्रधुनीत सिंगापूरच्या जहाजावर हल्ला

**दुबई, २६ जून**

अमेरिका आणि इराण यांच्यात झालेला करार आणि वाटाघाटीची पहिली फेरी पार पडल्यानंतर इराणने होर्मुझच्या सामुद्रधुनीतून जाणाऱ्या सिंगापूरचा ध्वज असलेल्या मालवाहू जहाजावर बेछूट गोळीबार केला. यात खलाशी आणि जहाजाला कोणतेही नुकसान झाले नसले तरी, इराणच्या आक्रमकतेमुळे अमेरिकेसोबतचा करार धोक्यात आला आहे. जहाजाने सूचनांचे उल्लंघन केल्याने ही कारवाई करण्यात आल्याचे इराणच्या इस्लामिक रिव्होल्यूशनरी गार्ड कॉर्प्सने (आयआरजीसी) म्हटले आहे.

सिंगापूरचा ध्वज असलेले 'एव्हर लव्हली' मालवाहू जहाज होर्मुझ जलमार्ग ओलांडत असताना आयआरजीसीने कुठलाही इशारा न देता जहाजाच्या दिशेने गोळीबार केला. दोन दिवसांनंतर इराणने परवानगीशिवाय होर्मुझ सामुद्रधुनीतून बाहेर पडणाऱ्या जहाजांवर कारवाई करण्याचा इशारा दिला होता. (वृत्तसंस्था)

### पंतप्रधान मोदी सेशेल्सच्या दौऱ्यावर

**नवी दिल्ली** : पंतप्रधान नरेंद्र मोदी २७ ते २९ जून दरम्यान सेशेल्सच्या दौऱ्यावर आहे. सेशेल्सचे राष्ट्रपती डॉ. पॅट्रिक हर्मिनी यांच्या विशेष निमंत्रणावरून ते राष्ट्रीय दिनाच्या सुवर्ण महोत्सवी सोहळ्यात प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. दोन्ही देशांमधील सामरिक आणि राजनयिक संबंध अधिक दृढ करणे हा दौऱ्याचा उद्देश आहे.

# टेम्पो व दुचाकीची धडक; अभियंता तरुण जागीच ठार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२६ जून-**

वीट वाहतूक करणाऱ्या भरधाव टेम्पो आणि दुचाकीची समोरासमोर धडक बसून झालेल्या अपघातात दुचाकीवरील अभियंता तरुण जागीच ठार झाल्याची घटना दक्षिण सोलापूर तालुक्यातील कुंभारी येथे शुक्रवार, दि.२६ जून २०२६ रोजी घडली. वरुण यशवंत खंडागळे (वय-३२, रा.आदित्य नगर, सोलापूर) असे मयत दुचाकीस्वाराचे नाव आहे.



कंपनीच्या कामानिमित्त शुक्रवारी सकाळी १० वाजण्याच्या सुमारास ते दुचाकीवरुन सिध्देश्वर साखर कारखानामार्गे कुंभारीकडे जात होते. चाबुकस्वार वस्ती येथे समोरुन येत असलेल्या एम.एच.१३ ए.एन.४२६५ या क्रमांकाच्या वीट वाहतूक करणाऱ्या टेम्पोने दुचाकीला जोरदार धडक दिली. यात ते जागीच मृत्युमुखी पडले.

ही खबर वळसंग पोलिसांना समजली असता पोलिस हवालदार एस.व्ही. कुंवर यांनी घटनास्थळी पोहोचून सदरचा मृतदेह विच्छेदनासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केला. दरम्यान, पोलिसांनी अपघातग्रस्त टेम्पो ताब्यात घेऊन तो वळसंग पोलीस ठाण्यात लावला आहे.

# महाराष्ट्र धर्मासाठी समाजांनी एकत्र यावे

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन

**पुणे, २६ जून**

महाराष्ट्र धर्म जपण्यासाठी सर्व समाजांनी एकत्र येणे काळाची गरज आहे. काहीजण जाणूनबुजून समाजात फूट पाडण्याचा प्रयत्न करत आहेत. समाजातील सर्व घटकांना सोबत घेऊन महाराष्ट्र धर्म टिकविण्याचा आमचा संकल्प आहे. तसेच शासनाच्या विविध कल्याणकारी योजना समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविण्यासाठी प्रभावी प्रयत्न करण्यात येतील,असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी) यांच्या वतीने संघ लोकसेवा आयोग, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, तसेच विविध स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा व त्यांच्या पालकांचा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावेळी मुख्यमंत्री बोलत होते. कार्यक्रमास उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, सारथी संस्थेचे अध्यक्ष अजित निंबाळकर, खासदार मेधा कुलकर्णी, महापौर मंजुषा नागपुरे, आमदार योगेश टिळेकर, राहुल कुल आदी उपस्थित होते.





विद्यार्थ्यांचा सत्कार करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील आदी मान्यवर

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, विद्यार्थ्यांना केंद्रस्थानी ठेवून आणि त्यांचा विश्वास संपादन करून शासन निर्णय घेत आहे. काही खासगी शिकवणी संस्था विद्यार्थ्यांमध्ये संभ्रम निर्माण करण्याचे काम करत आहेत. त्याला पर्याय म्हणून शासनाने 'निपुण सेतु' हा उपक्रम सुरू केला आहे. मराठा समाजाने आरक्षणासाठी अत्यंत शांततापूर्ण पद्धतीने मोर्चे काढले. या समाजातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या विविध संधी उपलब्ध करून देण्यासाठी 'सारथी'सारखी संस्था महत्त्वाची भूमिका बजावत आहे. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार अर्थमंत्री असताना 'सारथी' संस्थेचा नियोजन विभागात समावेश करण्यात आला. संस्थेला नियमित व पुरेसा निधी मिळावा यासाठी त्यांनी मोलाचे योगदान दिले. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार म्हणाल्या, की 'सारथी' ही केवळ संस्था नसून विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण विकसित करणारी एक चळवळ आहे. शिक्षण, संशोधन, उद्योजकता आणि कौशल्य विकास या सर्व क्षेत्रांत संस्था उल्लेखनीय कार्य करत आहे. (तभा वृत्तसेवा)

### मुख्यमंत्र्यांची सारथीच्या मुख्यालयाला भेट

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्थेच्या (सारथी) मुख्यालयास भेट देऊन तेथील उपक्रमांची माहिती घेतली. यावेळी उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, महापौर मंजुषा नागपुरे यांच्यासह अधिकारी उपस्थित होते.

# भूमिहीन महिलांना मिळणार शेतकऱ्यांचा दर्जा

मंत्रिमंडळ बैठकीत मसुद्याला मान्यता

**मुंबई, २६ जून**

राज्यातील भूमिहीन महिला, शेतमजूर आणि स्वतःच्या नावावर जमीन नसलेल्या पण शेतीत राबणाऱ्या महिलांना आता 'महिला शेतकरी प्रमाणपत्र' देऊन स्वतंत्र शेतकरी म्हणून कायदेशीर मान्यता मिळणार आहे. महिला शेतकऱ्यांना समान हक्क आणि लाभ मिळवून देण्यासाठी महिला शेतकरी सक्षमीकर कायदा करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. मंत्रिमंडळ बैठकीत या विधेयकाचा मसूद्याला मान्यता देण्यात आली आहे.



ग्रामीण भागातील बहुतांश महिला कृषी व तत्सम क्षेत्रात कार्यरत आहेत. तसेच राज्यात जमिनीची अधिकारता असलेल्या माहिला शेतकऱ्यांची संख्या अत्यल्प आहे. बहुतांश योजनांसाठी जमीन मालकी हक्क अनिवार्य असल्याने महिलांना त्याचा लाभ होत नाही. त्याचप्रमाणे राज्यातील भूमिहीन तसेच मत्स्यव्यवसाय, पशूसंवर्धन, कुक्कुटपालन, वनोपज संकलन यात काम करणाऱ्या महिलांना शेतकरी दर्जा नसल्याने त्या सरकारच्या योजनांपासून वंचित राहतात. प्रस्तावित कायद्यात पारंपारिकपणे शेतीचा भाग न मानल्या तसेच मोबदल्यासाठी किंवा मोबदल्याशिवाय पिकांची लागवड, बियाणे उत्पादन, पशुपालन, कुक्कुटपालन, दुग्धव्यवसाय, पशूपालन, मधमाशी पालन, चारा लागवड, मासेमारी, मत्स्यपालन, रेशीम उत्पादन, फळबाग, फूलशेती, कृषी-वनीकरण, कोणत्याही जमिनीचा किंवा तिच्या भागाचा चराईसाठी किंवा खतासाठी वापर, सर्व प्रकारचे कंपोस्ट खत किंवा स्वयंरोजगार, भाडेतत्त्वावरील शेती, वाटणी शेती किंवा स्थलांतरित शेतीसह इतर प्रकारच्या लागवडीद्वारे चालवल्या जाणाऱ्या इतर कोणत्याही शेतीविषयक कामांचा, तसेच मालकी हक्क किंवा उपभोग्य हक्कांच्या आधारे गौण किंवा गैर-लाकडी वन उत्पादनांचे संकलन, वापर आणि विक्री अशा इतर शेतीपूरक कामांनाही शेतीचा दर्जा देण्यात आला आहे. (वृत्तसंस्था)

### महिला सक्षमीकरणासाठी स्वतंत्र विशेष निधी

प्रस्तावित कायद्यात शेती व पुरक उपक्रम करणाऱ्या महिलांना शेतकरी म्हणून मान्यता देण्यात येणार आहे. सरकारच्या विविध धोरणे आणि योजनांमधून महिला शेतकऱ्यांना पतपुरवठा उपलब्ध करुन देण्यासोबतच महिलांच्या सक्षमीकरणासाठी स्वतंत्र विशेष निधी स्थापन करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे महिलांसाठी धोरण निर्मिती, अंमलबजावणी, तसेच तक्रार निवारणासाठी स्वतंत्र नियामक मंडळ, सक्षमीकरण कक्ष आणि सनियंत्रण समिती निर्माण करण्यात येणार आहे.

## महत्वाचे...



### आरकाल विद्यालयात श्रीहरी कुरापाटी यांच्यातर्फे गणवेश वाटप

**सोलापूर, दि. २६ जून-**

कै. आशय्या ईएय्या आरकाल, आंध्रभद्रावती मराठी विदयालय व श्री. आंध्रभद्रावती माध्यमिक विदयालयात इ.१ ली ते १० वी पर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांना मध्य रेल्वेचे माजी लेखाधिकारी श्रीहरी कुरापाटी यांच्यातर्फे गणवेश वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थेचे सेक्रेटरी व्यंकटेश कुडम, प्रमुख पाहुणे श्रीहरी कुरापाटी, अनिलकुमार जन्यारम, श्रीकांत भीमनाथ, सुरेश गंजी यांच्या प्रमुख उपस्थितीत गणवेश वाटप करण्यात आले. मुख्याध्यापिका भाव्यलक्ष्मी जन्यारम यांनी प्रास्ताविक केले, शिक्षिका जयंती चौगुले यांनी यादीवाचन केले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे श्रीहरी कुरापाटी यांनी आपले मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन खंडू भोसले व आभार मानकर मानले.



### शहरातील रिक्षाचालकांसाठी व्यसनमुक्ती जनजागृती कार्यक्रम

**सोलापूर, २६ जून-**

आज नशा मुक्त भारत अभियानांतर्गत आंतरराष्ट्रीय अंमली पदार्थ विरोधी दिनानिमित्त सोलापूर शहरातील रिक्षा चालकांसाठी जनजागृती पर कार्यक्रम पार पडला. सामाजिक न्याय विभाग व समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने समाज कल्याण हॉल, रंगभवन येथे आंतरराष्ट्रीय मादक पदार्थ गैरवापर व अवैध तस्करी विरोधी दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. संयुक्त महासंघ महाराष्ट्र राज्य या संस्थेतर्फे रिक्षाचालक सदस्यांसाठी हा कार्यक्रम घेण्यात आला. अध्यक्षस्थानी संयुक्त महासंघाचे अध्यक्ष रियाज सय्यद हे होते. आयुष इन्स्टिट्यूट फॉर डिक्शन मॅनेजमेंट, बार्शीचे डॉ. संदीप तांबारे, डॉ. मृणालीनी मोरे व ॲड. द्वारका देवळे यांनी उपस्थित रिक्षा चालकांना मार्गदर्शन केले. डॉ. संदीप तांबारे यांनी आपल्या विनोदी शैलीतून व्यसनमुक्तीचे महत्त्व पटवून दिले. सूत्रसंचालन प्रदीप शिंगे यांनी केले.



### वाढदिवसाचा विधायक उपक्रम; विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्यांचे वाटप

**सोलापूर, दि. २६ जून-**

वाढदिवस म्हणजे केवळ आनंदोत्सव, केक कापणे आणि जल्लोष एवढ्यापुरता मर्यादित न ठेवता समाजाप्रती असलेली बांधिलकी जपत तो विधायक उपक्रमातून साजरा करण्याचा आदर्श पुकाळे परिवाराने पुन्हा एकदा समाजासमोर ठेवला आहे. भावसार व्हिजन इंडियाचे राष्ट्रीय अध्यक्ष मनीष सुत्रावे तसेच भावसार व्हिजन सोलापूर सेंट्रलचे सचिव सागर पुकाळे यांची कन्या आराध्या पुकाळे यांच्या वाढदिवसानिमित्त भावसार व्हिजन सोलापूर सेंट्रलच्या माध्यमातून महाराष्ट्र शासनाच्या एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत बाल विकास प्रकल्प अधिकारी, सोलापूर प्रकल्प क्र. ३ अंतर्गत अक्कलकोट रोड येथील अंगणवाडी क्रमांक ४४ मधील सुमारे ५० विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. हा उपक्रम एरिया गव्हर्नर श्रीराज निकते यांच्या हस्ते व अध्यक्ष सुशील महिंद्रकर यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. याप्रसंगी सुशील महिंद्रकर, मल्लिनाथ याळगी, माळवतकर, गायकवाड उपस्थित होते.

### माझ्या बायकोची बदनामी करतो, म्हणत तरुणाला मारहाण

**सोलापूर, दि. २६ जून-**

'तू माझ्या बायकोची बदनामी करतोस', असा आरोप करत एका तरुणाला मारहाण करण्यात आली. ही घटना गांधी नगर झोपडपट्टी परिसरात गुरुवारी मध्यरात्री घडली. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. अनिल मुशन, प्रणव मुशन, सविता मुशन आणि स्वाती अंबादास कनकुंटला (सर्व रा. दत्त नगर, सोलापूर) अशी गुन्हा दाखल आरोपींची नावे असून याबाबत, मल्लिकार्जुन राजन्ना भंडारी (रा. गांधीनगर झोपडपट्टी) यांनी फिर्याद दिली आहे. यातील फिर्यादी मल्लिकार्जुन भंडारी हे २५ जून रोजी मध्यरात्री बारा वाजता आपल्या घरासमोर उभे असताना आरोपी आले. आरोपींनी 'तू माझ्या बायकोची बदनामी करतो' असे म्हणत फिर्यादीला शिवीगाळ करत लाथाबुक्यांनी जबर मारहाण केली. एवढ्यावरच न थांबता, आरोपी अनिल मुशन फिर्यादीच्या घरातील बॅट उचलून त्यांच्या डोक्यावर वार मारले. यात फिर्यादी गंभीर जखमी झाले आहेत. हवालदार गायकवाड हे पुढील तपास करत आहेत.

### झाडाला गळफास घेऊन तरुणाची आत्महत्या

**सोलापूर, दि. २६ जून-**

अज्ञात कारणावरून एका ३३ वर्षीय तरुणाने घरासमोरील लिंबाच्या झाडाला साडीच्या साह्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना भारतरत्न इंदिरा नगर येथे आज शुक्रवारी दुपारी बारा वाजता उघडकीस आली. विश्वनाथ शटप्पा भांडेकर (वय ३३ वर्ष, रा. भारतरत्न इंदिरानगर सोलापूर) असे त्या गळफास घेतलेल्या तरुणाचे नाव आहे. आज शुक्रवारी दुपारी बारा वाजेच्या सुमारास विश्वनाथ याने गळफास घेतला असल्याचे आढळून आले. ही खबर सदर बाजार पोलिसांना समजली असता हवालदार एन.सी. इनामदार यांनी घटनास्थळी पोहोचून सदरचा मृतदेह इतरांच्या साह्याने खाली उतरून येथील शासकीय रुग्णालयात दुपारी एक वाजता दाखल केला असता डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

# मृग नक्षत्रातील पेरणी ठप्प; बळीराजाला पावसाची आतुरता

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. २६ जून-**

सकाळी आभाळ भरून येते दुपारी वारा सुटलो आणि रात्री चांदणी पडते ही माळशिरस तालुक्यातील परिस्थिती आहे. माळशिरस तालुका परिसरातील शेतकरी सध्या आकाशाकडे डोळे लावून पावसाची आतुरतेने वाट पाहत आहेत. खरीप हंगामातील पेरणीचा हंगाम सुरू होऊनही अद्याप समाधानकारक पाऊस न झाल्याने शेतकरी चिंतेत आहेत. मृग नक्षत्रातील पेरणी जवळपास महिनाभर लांबली असून, पेरणीपूर्व मशागतीची कामे पूर्ण करूनही अनेक शेतकरी पावसाच्या प्रतीक्षेत बसले आहेत.

दरवर्षी शेतीचा खर्च वाढत असताना उत्पादनात अपेक्षित वाढ होत नसल्याने शेती व्यवसाय परवडेनासा होत असल्याची भावना शेतकऱ्यांमध्ये व्यक्त होत आहे. यंदाही नांगरणी, रोटाव्हेटर, बियाणे, खतांसह मशागतीच्या विविध कामांसाठी मोठा खर्च करावा लागला आहे. मात्र, पाऊस लांबल्यामुळे केलेली तयारी वाया जाण्याची भीती शेतकऱ्यांना सतावत आहे. शेतकरी अविनाश जाधव यांनी सांगितले की, पूर्वी रोहिणी नक्षत्रातील पाऊस आणि मोत्यांचा तुरा अशी म्हण प्रचलित होती. मृग नक्षत्रात होणारा पाऊस खरीप पिकांसाठी पोषक मानला जात असे. त्यामुळे उत्पादनात भरघोस वाढ होत असे. मात्र, बदलत्या हवामानामुळे आता पावसाचे चक्र अनियमित झाले आहे. त्यांच्या मते, आर्द्रा नक्षत्रात होणारा मुसळधार पाऊस पिकांच्या उगवणीसाठी फारसा लाभदायक नसतो. उलट या काळातील सततच्या पावसामुळे पिकांवर



किडींचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता असते, ज्याचा परिणाम उत्पादन घटण्यात होतो. त्यामुळे शेतकऱ्यांना नाईलाजास्तव आर्द्रा नक्षत्रात खरीप पेरणी करावी लागणार असल्याचे चित्र सध्या दिसत आहे.

तालुक्यात तुरक झालेल्या पावसावर थोड्याफार प्रमाणात चाऱ्याची पिके कडवळ यांची पेरणी झाली असून खरिपातील तूर बाजरी झाली आहे पुरेशी ओलं असल्याशिवाय शेतकऱ्यांनी पेरणी करू नये असे कृषी कार्यालयाकडून सांगण्यात आले आहे उशिरा पेरणीसाठी उशिरा पेरण्याच्या शिफारसी केल्या आहेत त्याच्याप्रमाणे शेतकऱ्यांनी पेरणी करावी साधारणता एक जुलैपासून पडसाळी उसाच्या लागणीला सुरुवात होते मात्र पावसा व्हावी त्याही पुढे ढकलण्याची शक्यता नाकारता येत नाही सध्या शेतीसाठी असलेला पुरवठा कमी प्रमाणात होत असून ज्यांच्याकडे पाणी आहे त्यांना पिकांना पाणी देण्याची अडचण होत आहे तालुक्यातील गिरझणी, फोडशिरस, कोथळे, निमगाव आधी पाझर तलाव यांनी तळ गाठला आहे सध्या बारा गावात पिण्याच्या टँकर चालू आहेत. खत विक्रीवर परिणाम झाला असून पाऊस पडल्याशिवाय रासायनिक खते मिळाला मागणी नाही दरवर्षी जून महिन्यामध्ये बी बियाणे आणि खतासाठी शेतकऱ्यांची गर्दी असते मात्र दहा टक्के सुद्धा विक्री झाली नसल्याचे खत विक्रेते संतोष फडे यांनी सांगितले.

> सध्या वरिष्ठ कार्यालयाच्या आदेशानुसार २५ अंपियर पर्यंतचा दाब असलेल्या ठिकाणी नवीन भार नियमना नुसार ६ तास तर दाब वाढल्यास ४ तासांचा शेती विद्युत पुरवठा सुरू आहे.रात्री शेतीचा पुरवठा बंद करून सिंगल फेज विद्युत पुरवठा सुरू आहे.मात्र पाऊस आल्यास यामध्ये तातडीने बदल होऊन शेतकऱ्यांना पुरेसा विद्युत पुरवठा करण्याचा आमचा प्रयत्न आहे.
>
> **- प्रसाद कोहळे,** कार्यकारी अभियंता,अकलूज

### रोटरी नवजात शिशु अतिदक्षता विभागाचे आज लोकार्पण

**सोलापूर, दि. २६ जून-**



सोलापूर जिल्ह्यातील माता व बाल आरोग्य सेवेला नवी दिशा देणारा अत्याधुनिक रोटरी नवजात शिशु अतिदक्षता विभाग महिला व नवजात शिशु रुग्णालय, गुरुनानक चौक येथे उभारण्यात आला असून त्याचे लोकार्पण आज (शनिवार) सकाळी ११ वाजता मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे.

रोटरी ई-क्लब ऑफ सोलापूर इलाइट, रोटरी क्लब ऑफ नोवी (अमेरिका), टी. बी. लुल्ला चॅरिटेबल ट्रस्ट आणि द रोटरी फाउंडेशनच्या ग्लोबल ग्रँटच्या संयुक्त सहकार्याने हा प्रकल्प साकार झाला आहे. या विभागात अत्याधुनिक वैद्यकीय उपकरणांची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली असून अकाली जन्मलेली, कमी वजनाची तसेच गंभीर आजारांनी ग्रस्त नवजात बालकांवर तातडीने व दर्जेदार उपचार करता येणार आहेत. या सुविधेमुळे उपचारांसाठी पुणे, मुंबईसारख्या शहरांत जाण्याची गरज कमी होणार असून सोलापूरसह ग्रामीण भागातील हजारो कुटुंबांना मोठा दिलासा मिळणार आहे. उद्घाटन सोहळ्यास जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, रोटरीचे पदाधिकारी, टी. बी. लुल्ला, सुधीर लाडरे, स्वाती हेरकल, जयेश पटेल, किशोर लुल्ला, वर्षा डोंगफोडे आणि डॉ. सतीश कोपुरवाड यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. प्रकल्प उभारणीत रोटेरियन स्वाती हेरकल, जयेश पटेल आणि प्रकल्प समन्वयक अजय डोईजोडे यांचे योगदान विशेष उल्लेखनीय असल्याचे आयोजकांनी नमूद केले आहे. रोटरी ई-क्लब ऑफ सोलापूर इलाइटचे अध्यक्ष बालमुकुंद राठी, प्रकल्प समन्वयक अजय डोईजोडे, सचिव रोशन भुतडा, खजिनदार राहुल डांगरे यांनी सर्व नागरिकांना या ऐतिहासिक उद्घाटन सोहळ्यास उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

### द इन्कम टॅक्स सेल्स टॅक्स प्रॅक्टिशनर असोसिएशनतर्फे ॲड.थोबडे यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ जून-**




महाराष्ट्र व गोवा बार कौन्सिलच्या सदस्यपदी ज्येष्ठ विधीज्ञ ॲड. मिलिंद थोबडे यांची सलग तिसऱ्यांदा निवड झाल्याबद्दल द इन्कम टॅक्स सेल्स टॅक्स प्रॅक्टिशनर असोसिएशनतर्फे त्यांचा सत्कार करण्यात आला. असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. कमलेश नागर यांच्या हस्ते हा सन्मान झाला.

असोसिएशनचे सदस्य आशिष दोशी यांची कन्या सी. ए. आयुषी दोशी यांनी नुकत्याच झालेल्या चार्टर्ड अकाउंटंट परीक्षेमध्ये यश प्राप्त केल्यामुळे तिचा देखील सत्कार करण्यात आला व असोसिएशनचे सदस्य विश्वंभर पाटील यांची कन्या डॉ. वैष्णवी पाटील यांनी मेडिकल क्षेत्रामध्ये एमबीबीएस पदवी प्राप्त केल्याबद्दल त्यांचा देखील सत्कार करण्यात आला. याप्रसंगी असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. कमलेश नागर, उपाध्यक्ष ॲड. अक्षय अंदोरे , सचिव ॲड. राजेश बदू व सहसचिव ॲड. व्यंकटेश दारना हे व्यासपीठावर उपस्थित होते. सूत्रसंचालन व आभार संस्थेचे सचिव ॲड. राजेश बटू यांनी मानले.

### श्री शिवराज्याभिषेक सोहळा समितीतर्फे आज पालखी मिरवणूक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ जून-**

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक पुण्यश्लोक छत्रपती श्री शिवाजी महाराज यांच्या ३५२ व्या श्री शिवराज्याभिषेक दिनानिमित्त श्री शिवराज्याभिषेक सोहळा समितीतर्फे शनिवारी (दि.२७) दुपारी ४ वाजता देवदर्शन पदयात्रा पालखी मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले आहे.

ग्रामदैवत श्री सिद्धरामेश्वर मंदिराजवळ ही देवदर्शन पदयात्रा पालखी सोहळा सुरुवात होणार असून तेथून ही पालखी मिरवणूक सरस्वती चौक, मेकॅनिक चौकमार्गे छत्रपती श्री शिवाजी महाराज चौकात विसर्जित होणार आहे. या देवदर्शन पदयात्रा पालखी मिरवणूकित लेझीम पथकाचा समावेश असणार आहे.

शिवभक्तांनी या देवदर्शन पदयात्रा पालखी सोहळ्यात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन श्री शिवराज्याभिषेक सोहळा समितीचे संजय साळुंखे आणि अक्षय शिंदे यांनी केले आहे.

### लष्कर येथे तोल जाऊन पडल्याने पादचाऱ्याचा मृत्यू

**सोलापूर** - घराकडे पायी निघालेल्या एका इसमाचा तोल जाऊन खाली पडल्याने मृत्यू झाल्याची घटना लष्कर भागात गुरुवारी रात्री अकरा वाजता घडली. संजय रामसिंग चौधरी (वय ४० वर्ष, राहणार लष्कर सोलापूर) असे त्या मयत व्यक्तीचे नाव आहे. ते गुरुवारी रात्री गुलजार तालीम जवळ कचराकुंडीत कचरा टाकून परत घराकडे चालत निघाले असताना वाटेत तोल जाऊन ते खाली पडले. यात डोक्याला मार लागल्याने त्यांना त्वरित सिविल हॉस्पिटल मध्ये पत्नीने रात्री अकरा वाजता दाखल केले असता त्यांचा उपचारापूर्वीच मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले.

## आणीबाणी हा भारतीय लोकशाहीवरील सर्वात मोठा आघात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ जून-**

**जेष्ठ पत्रकार अरविंद जोशी : आणीबाणीची ५१ वर्षे विषयावर भाजपातर्फे व्याख्यान**



भारतात २५ जून १९७५ रोजी लागू करण्यात आलेल्या आणीबाणीचा कालखंड हा भारतीय लोकशाहीवरील सर्वात मोठा आघात होता, असे प्रतिपादन जेष्ठ पत्रकार अरविंद जोशी यांनी केले.

आणीबाणीला ५१ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल भारतीय जनता पार्टीतर्फे भाजप शहर कार्यालयात ज्येष्ठ पत्रकार अरविंद जोशी यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आणीबाणी मध्ये कारावास भोगलेल्या ज्येष्ठ कार्यकर्त्यांचा सन्मान भाजपातर्फे करण्यात आला.

यावेळी व्यासपीठावर भारतीय जनता पार्टी सोलापूर शहरच्या अध्यक्षा रोहिणी तडवळकर, महापौर विनायक कोंड्याल, उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, सभागृह नेते नरेंद्र काळे, सरचिटणीस तथा नगरसेवक प्रा. डॉ. नारायण बनसोडे आणि सरचिटणीस शिवराज सरतापे उपस्थित होते.

जेष्ठ पत्रकार अरविंद जोशी म्हणाले, लोकशाहीचे रक्षण करण्यासाठी संघर्ष करणाऱ्या असंख्य देशभक्तांच्या त्यागाचे स्मरण करून आजच्या पिढीने त्या इतिहासातून बोध घेण्याची आवश्यकता आहे. आणीबाणीच्या काळात प्रसारमाध्यमांवर लादण्यात आलेली सेन्सॉरशिप, विरोधी पक्षांच्या नेत्यांच्या झालेल्या अटकसत्र, नागरिकांच्या मूलभूत अधिकारांवरील निर्बंध, राज्यघटनेतील करण्यात आलेल्या वादग्रस्त दुरुस्त्या तसेच लोकशाही व संविधानिक मूल्यांवर झालेल्या आघाताचा आढावा जोशी यांनी घेतला.

यावेळी आणीबाणीच्या काळात लोकशाहीच्या रक्षणासाठी संघर्ष करत तुरुंगवास भोगलेल्या ज्येष्ठ कार्यकर्त्यांचा करण्यात आला. यामध्ये सुधा अळ्ळीमोरे, रामचंद्र तडवळकर, गुरुराज कुलकर्णी, भारत तांबोळकर, जगदीश तुळजापूरकर आणि शिरीष कुलकर्णी यांचा सन्मान करत सत्कार करण्यात आला.



### शिवालय शैक्षणिक संकुलात राजर्षी छत्रपती शाहू महाराज जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ जून-**

शिवालय प्राथमिक-माध्यमिक आश्रम शाळा व ओम वैष्णव कनिष्ठ महाविद्यालय, तळे हिप्परगा येथे राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमास प्राचार्या कांचन वाघचवरे यांच्या अध्यक्षतेखाली व प्रमुख उपस्थिती होत्या.

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन कांचन वाघचवरे यांच्या हस्ते करून कार्यक्रमास प्रारंभ करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांनी शाहू महाराजांच्या कार्याविषयी आपली मनोगते व्यक्त केली. किशोर जाधव यांनी शाहू महाराजांचे जीवनकार्य, सामाजिक सुधारणा आणि लोककल्याणकारी विचार यांची माहिती दिली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी राजकुमार शिंदे, शिवशंकर माने, किरण शिंदे, बाळासाहेब भोसले, सिद्धारूढ रेऊरे, मारुती शिंदे आदींनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन नेताजी इंगळे यांनी केले, तर आभार प्रदर्शन सुभाष चव्हाण यांनी केले.

# राजर्षी शाहू महाराजांच्या जयंती निमित्त डोणगाव येथे मार्गदर्शन मेळावा

**एकता महिला मंचतर्फे आयोजन; कृषी शास्त्रज्ञ अनिता सराटे-शेळके, दामिनी पथकाच्या पूजा गायकवाड यांचे मार्गदर्शन**

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. २६ जून-**

डोणगाव (ता. उत्तर सोलापूर) येथील ग्रामपंचायत कार्यालयात आज एकता महिला मंचच्या वतीने छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त महिला मार्गदर्शन मेळावा आणि विविध मनोरंजक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलनाने झाली.

या मेळाव्यासाठी प्रमुख पाहुण्या म्हणून कृषी शास्त्रज्ञ अनिता सराटे-शेळके, दामिनी पथकाच्या नीलम कांबळे (महिला पोलिस कॉन्स्टेबल), पूजा गायकवाड (महिला पोलिस कॉन्स्टेबल), सलगर वस्ती पोलीस ठाण्याचे पोलीस कॉन्स्टेबल योगेश राठोड, एकता महिला मंचचे प्रमुख प्रभाकर क्षीरसागर, गावच्या सरपंच राजश्री आमले, उपसरपंच मोहिनी शिंगाडे, ग्रामपंचायत सदस्य मनीषा अवताडे तसेच एकता महिला मंचच्या डोणगाव प्रमुख सावित्री पाटील प्रामुख्याने उपस्थित होत्या.

कृषी विज्ञान केंद्राच्या शास्त्रज्ञ अनिता सराटे-शेळके यांनी महिलांशी संवाद साधताना एकता महिला मंचच्या उपक्रमांचे कौतुक केले. यावेळी त्यांनी महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी ज्वारी प्रक्रिया उद्योग आणि ज्वारीपासून बनणाऱ्या विविध मूल्यवर्धित पदार्थांविषयी माहिती देत, ग्रामीण भागात उपलब्ध असणाऱ्या रोजगाराच्या विविध संधींवर मोलाचे मार्गदर्शन केले.

दामिनी पथकाच्या पूजा गायकवाड म्हणाल्या, महिलांनी छेडछाड किंवा कोणत्याही त्रासाला घाबरून न जाता बिनधास्तपणे दाद मागितली पाहिजे. कोणत्याही संकटसमयी थेट डायल ११२ वर संपर्क साधावा, दामिनी पथक मदतीसाठी सदैवपाठीशी उभे आहे. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मंचाच्या सावित्री पाटील,प्रीती येरनाळे, संजीवनी शेळके, सुरेखा शेळके, निमित्त शेळके, कविता देशेट्टी, निलंगा येरनाळे, पूजा चौगुले, दुर्गा चौगुले, राणी दगडे, निर्मला चराटे, मधुमती खजूरकर यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन डोणगाव प्रमुख सावित्री पाटील यांनी केले. प्रास्ताविक प्रीती येरनाळे यांनी मांडून मंचाच्या कार्याची रूपरेषा सांगितली, आभार संजीवनी शेळके यांनी मानले.



**स्पर्धांचे निकाल पुढीलप्रमाणे: (प्रथम, द्वितीय, तृतीस या क्रमाने)**
**उखाणे स्पर्धा :** दुर्गा चौगुले, सावित्री पाटील, संजीवनी शेळके, उत्तेजनार्थ : सुरेखा शेळके
**बिस्किट खाणे स्पर्धा :** शिवलेला चराटे, सुरेखा शेळके, शिवलीला चौगुले
**संगीत खुर्ची स्पर्धा :** श्रावणी चराटे, ऐश्वर्या जाधव, रेहाना नदाफ, उत्तेजनार्थ : कोमल शेळके.

# रशिया-युक्रेनचे परस्परांवर हल्ले

## ऊर्जा केंद्र, पायाभूत सुविधांवर ड्रोन-क्षेपणास्त्रांचा मारा; ३५ नागरिकांचा मृत्यू

**मॉस्को/कीव्ह, २६ जून**

रशिया-युक्रेनने गुरुवारी रात्री परस्परांवर जोरदार हल्ले केले. युक्रेनने रशियाच्या ताब्यातील क्रिमिया प्रांतातील ऊर्जा आणि पायाभूत सुविधांना लक्ष्य करत ड्रोनचा मारा केला. रशियाने हल्ल्याला प्रत्युत्तर देत युक्रेनची राजधानी कीव्हसह विविध शहरात ड्रोन आणि क्षेपणास्त्राचा मारा केला. यात इंधन डेपो, पायाभूत सुविधा आणि लष्करी तळांचे मोठे नुकसान झाले. दोन्ही देशांनी परस्परावर केलेल्या हल्ल्यात युक्रेनमध्ये २२ तर रशियातील १३ नागरिकांचा मृत्यू झाला. इमारतीच्या ढिगाऱ्यातून शेकडो जखमींना बाहेर काढून रुग्णालयात हलवले. मृतकांमध्ये मुले आणि महिलांचाही समावेश आहे.

युक्रेनने क्रिमियावर एकाचवेळी सहाशेपेक्षा अधिक लांब पल्ल्याच्या ड्रोनचा मारा केला. यात ऊर्जा प्रकल्प, पायाभूत आणि निवासी भागातील इमारतींचे नुकसान झाल्याची माहिती रशियाच्या संरक्षण विभागाने निवेदनातून दिली. हवाई संरक्षण प्रणालीने ५६० पेक्षा अधिक ड्रोनला हवेतच नष्ट केले. या हल्ल्यात १३ नागरिकांचा मृत्यू झाला, तर ५० पेक्षा अधिक जखमी आहे. युक्रेनी सैन्याने रशियाच्या १२ वेगवेगळ्या प्रदेशांमध्ये, तसेच क्रिमियन द्वीपकल्प, काळा समुद्र आणि अझोवच्या समुद्रात हल्ले केले. नागरिकांच्या मृत्यूचा सूड घेण्यासाठी रशिया वचनबद्ध असून, युक्रेनला मोठी किंमत चुकवावी लागेल अशा इशारा रशियाने दिला आहे. दरम्यान युक्रेन गेल्या अनेक महिन्यांपासून रशियाच्या तेल उत्पादन आणि ऊर्जा सुविधांना लक्ष्य करत आहे. यामुळे रशियाचा इंधन पुरवठा आणि लष्करी रसद कमी झाली आहे. दोन्ही देशात चार वर्षांपासून संघर्ष सुरू आहे. (वृत्तसंस्था)



रशियाच्या हल्ल्यानंतर नुकसान झालेल्या भागात बचावकार्य करताना सुरक्षा दलाचे जवान

### युद्ध संपविण्यासाठी दबाव

युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की यांनी '४०-दिवसांच्या प्रभाव मोहिमे'चा आदेश दिल्यानंतर काही तासांतच रशियावर मोठा हल्ला झाला. या हल्ल्याचा उद्देश रशियाला युद्ध संपवण्यास भाग पाडणे आहे. गेल्या वर्षभरात अमेरिकेच्या शांतता प्रयत्नांना कोणतेही ठोस परिणाम न मिळाल्याने झेलेन्स्की यांनी हे पाऊल उचलले आहे. तुलाचे गव्हर्नर दिमित्री मिल्यायेव यांनी सांगितले की, युक्रेनच्या हल्ल्यात नोवोमोस्कोव्स्क शहरात एक वीज वाहिनी आणि एका औद्योगिक केंद्राचे नुकसान झाले. एका रासायनिक कारखान्याला आणि एका जलविद्युत प्रकल्पाला आग लागली.

### कीव्ह शहरावर भीषण प्रहार

युक्रेनच्या हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून रशियाने राजधानी कीव्ह आणि खार्किव प्रदेशावर भीषण हल्ले चढवले. खार्किवचे प्रादेशिक प्रमुख ओलेह सिनिहुबोव्ह यांनी सांगितले की, गेल्या २४ तासांत झालेल्या रशियन हल्ल्यांमध्ये २२ नागरिक ठार झाले आणि ५५ जण जखमी आहे. रशियाने मार्गदर्शित बॉम्ब आणि ड्रोनद्वारे खार्किव आणि आसपासच्या १६ भागांवर हल्ला केला. युक्रेनियन हवाई दलाने म्हटले की, त्यांनी १८९ पैकी १७४ रशियन ड्रोन हवेतच नष्ट केले. सातपैकी चार इस्कंदर-एम बॅलिस्टिक क्षेपणास्त्रांनी आपले लक्ष्य भेदले. यात निवासी इमारती, पायाभूत सुविधा आणि तेल डेपोंचे नुकसान झाले.

# पहलगाम हल्ल्यासाठी ट्रेकिंग अॅपचा वापर

**श्रीनगर, २६ जून**

जम्मू-काश्मिरात झालेल्या पहलगाम हल्ल्यासाठी दहशतवाद्यांनी ट्रेकिंग अॅपचा वापर केला होता. या अॅपच्या माध्यमातून हल्लेखोर घटनास्थळाची आणि सुरक्षा दलाच्या तैनातीची माहिती मिळवत होते. १५ एप्रिलपासूनच दहशतवादी हल्ल्याच्या तयारीत होते आणि त्यांना पाकिस्तानातून सातत्याने सूचना मिळत होती अशी माहिती राष्ट्रीय तपास संस्थेने (एनआयए) न्यायालयात सादर केलेल्या आरोपपत्रातून दिली आहे.

काश्मीरमधील पहलगाम येथे २२ एप्रिल २०२५ रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्यात एक स्थानिक आणि २५ पर्यटकांचा मृत्यू झाला. या हल्ल्याप्रकरणी एनआयएने न्यायालयात आरोपपत्र सादर केले. त्यात म्हटले की, हल्लेखोर १५ एप्रिलपासूनच या भागात सक्रिय होते. त्यांनी घटनास्थळी पोहोचण्यासाठी आणि तेथून बाहेर पडण्यासाठी ट्रेकिंग अॅपचा वापर केला. २८ जुलै २०२५ रोजी श्रीनगरमध्ये राबवलेल्या ऑपरेशन महादेव दरम्यान एक दहशतवादी ठार झाला होता. त्याच्या मोबाईलमध्ये १५-१६ एप्रिलच्या वेळेची नोंद असणारे नकाशाचे दोन स्क्रीनशॉट्स सापडले. यात बैसरन येथील ठिकाणे दाखविण्यात आली आहेत. मोबाईल अॅपमध्ये हे पॉइंट्स मार्क करुन ठेवण्यात आले होते. एवढेच नव्हे तर, पाकिस्तानस्थित हँडलर साजिद जट याच्याकडून त्यांना सूचना मिळत असल्याचे पुरावे आढळले. दहशवाद्यांनी केलेल्या वेळेच्या नोंदींवरुन हा कट १५ एप्रिलपासूनच केला जात असल्याचे तपासातून समोर आले आहे. (वृत्तसंस्था)

### एनआयच्या आरोपपत्रातील माहिती



पहलगाम येथे झालेल्या हल्ल्याच्या ठिकाणी पोहोचलेले सुरक्षा जवान

### चौकशीत अनेक धक्कादायक खुलासे

जप्त केलेल्या दोन मोबाईल फोनमधील डेटाच्या विश्लेषणातून दहशतवाद्यांचे अनेक फोटो, दहशतवादी हँडलर अली साजिद ऊर्फ अली याच्यासोबत मोबाईलवरून झालेल्या संवादाची माहिती, बैसारन पार्क, पहलगामजवळील कोऑर्डिनेट दाखवणाऱ्या अपचे स्क्रीनशॉट्स आढळून आले आहेत. तसेच, पाकिस्तानी नागरिक साजिद हा लष्कर-ए-तोयबा आणि द रेसिस्टन्स फ्रंट दहशतवादी संघटनेचा कमांडर असल्याचे समोर आले. साजिदने या हल्ल्यात पाकिस्तानात बसूनच दहशतवाद्यांना मदत केल्याची तपासातून उघड झाले आहे. दहशतवाद्यांकडून जप्त केलेले फोन पाकिस्तानातील असल्याचे समोर आले आहे.

# सीमापार तस्करी करणाऱ्या सात जणांना अटक

**अमृतसर, २६ जून**

अमृतसर शहर पोलिसांनी एका केंद्रीय संस्थेसोबत संयुक्त कारवाई करत सीमापार अवैध शस्त्रे, अमली पदार्थ आणि हवाला नेटवर्कवर कारवाई करताना एका अफगाण नागरिकासह सात आरोपींना अटक केली. आरोपींकडून दोन सब-मशीन गनसह १० अत्याधुनिक शस्त्रांसह ५.०४८ किलोग्रॅम हेरॉईन आणि हवाला व्यवसायाशी संबंधित ३०.३८ लाख रुपयांची रोकडही जप्त करण्यात आली. (वृत्तसंस्था)

## चित्रपट वार्ता

### 'महाराष्ट्र एपस्टीन फाईल्स'चा फर्स्ट लूक समोर




**मुंबई** : महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळात खळबळ माजवून देणाऱ्या घटनांवर आधारित 'महाराष्ट्र एपस्टीन फाईल्स' या आगामी चित्रपटाचा फर्स्ट लूक प्रदर्शित करण्यात आला. 'आता सगळं उघड होणार...!' अशी टॅगलाईन असलेल्या या चित्रपटात प्रसिद्ध अभिनेत्री आणि नृत्यांगना दीपाली सय्यद मुख्य भूमिकेत दिसणार असून, त्यांच्या फर्स्ट लूकने प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतले आहे. हा चित्रपट महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक आणि आध्यात्मिक घडामोडींमधील एक अतिशय महत्त्वाचे आणि संवेदनशील प्रकरण जगासमोर आणणार आहे. हा चित्रपट २ ऑक्टोबर रोजी प्रदर्शित होणार आहे. चित्रपटाचे दिग्दर्शन स्वरूप बी. सावंत करत आहे. या चित्रपटाची कथा सागरकुमार एस. जैन यांनी लिहिली असून, पटकथा आणि संवादलेखन संजय नवगिरे यांनी केले आहे. फ्लेमिंगो क्रिएशन आणि मातोश्री एन्टरटेन्मेंट वर्ल्ड प्रस्तुत या चित्रपटाची निर्मिती देवेंद्र भट, सूर्यकांत भुंडे आणि प्रशांत कदमपुरे करत आहेत.

### 'प्रहार : द उज्ज्वल निकम स्टोरी'चा टीझर प्रदर्शित




**मुंबई** : अभिनेता राजकुमार रावच्या बहुप्रतीक्षित 'प्रहार : द उज्ज्वल निकम स्टोरी' या चित्रपटाचा दमदार टीझर प्रदर्शित झाला. भारतातील प्रसिद्ध सरकारी वकील उज्ज्वल निकम यांच्या जीवनावर आधारित असलेल्या या चित्रपटात राजकुमार राव मुख्य भूमिका साकारत आहे. टीझरमध्ये कथानकाबाबत फारशी माहिती उघड करण्यात आलेली नसली, तरी पार्श्वसंगीत, संवाद आणि दृश्यरचना प्रेक्षकांची उत्सुकता वाढवणारी ठरली आहे. उज्ज्वल निकम यांनी १९९३ च्या मुंबई बॉम्बस्फोट प्रकरण, गुलशन कुमार हत्या प्रकरण, प्रमोद महाजन हत्या प्रकरण, २६/११ मुंबई दहशतवादी हल्ला, मुंबई सामूहिक बलात्कार प्रकरण तसेच कोपर्डी बलात्कार आणि हत्या प्रकरण यांसारख्या अनेक खटल्यांमध्ये सरकारची बाजू मांडली आहे. त्यांच्या संघर्षमय आणि प्रेरणादायी प्रवासाची कथा 'प्रहार : द उज्ज्वल निकम स्टोरी' या चित्रपटाच्या माध्यमातून मोठ्या पडद्यावर पाहायला मिळणार आहे. हा चित्रपट ७ ऑगस्ट रोजी प्रदर्शित होणार आहे.

### सामंथा रुथ प्रभूने केली गर्भधारणेची पुष्टी



**मुंबई** : साउथ अभिनेत्री सामंथा रुथ प्रभूने बुधवारी गरोदरपणाच्या वृत्ताला पुष्टी दिली आहे. एका कार्यक्रमात टी-शर्ट घातल्याने दिसलेल्या बेबी बंपनंतरच अभिनेत्री गरोदर असल्याच्या बातम्या आल्या होत्या. मातृत्वासाठी चित्रपटांमधून ब्रेक घेणार असल्याचे अभिनेत्रीने सांगितले. सामंथा रुथ प्रभू बुधवारी नुकत्याच प्रदर्शित झालेल्या तिच्या 'मां इंती बंगारम' या चित्रपटाच्या सक्सेस मीटमध्ये पती राज निदिमोरू यांच्यासोबत पोहोचली होती. कार्यक्रमात माध्यमांशी बोलताना सामंथाने गरोदरपणाची पुष्टी करत 'मां इंती बंगारम' नंतर मी माझी स्थिती पाहून एक छोटासा ब्रेक घेईन. मला प्रसूती रजा घ्यावीच लागेल. त्यानंतर मी माझ्या चाहत्यांसाठी आणखी एका चित्रपटासह परत येईन, असे म्हटले.

# राजर्षी शाहू महाराज जयंती मिरवणुकीत पारंपरिक शौर्यकलेचे दर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ जून-**

छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त शुक्रवारी सोलापुरात पारंपरिक संस्कृती, शौर्य आणि सामाजिक समतेचा संदेश देणारी भव्य मिरवणूक उत्साहात पार पडली. मिलिंद नगर येथे विविध तालीम संघ आणि छत्रपती शाहूराजे प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या या मिरवणुकीत यंदा डीजेच्या दणदणाटापेक्षा पारंपरिक मर्दानी खेळांना प्राधान्य देण्यात आल्याने महाराष्ट्राच्या शौर्यपरंपरेचे जिवंत दर्शन सोलापूरकरांना घडले.

आज सायंकाळी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करून मिरवणुकीला प्रारंभ झाला. शहरातील प्रमुख चौकांत आकर्षक सजावट, विद्युत रोषणाई तसेच ऐतिहासिक व सामाजिक संदेश देणारे देखावे उभारण्यात आले होते. या देखाव्यांना नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत छायाचित्रे व व्हिडिओंच्या माध्यमातून सोहळा आपल्या आठवणीत जपला. राजर्षी शाहू महाराजांनी मर्दानी व मैदानी खेळांना दिलेल्या राजाश्रयाची परंपरा जपण्याच्या उद्देशाने छत्रपती शाहूराजे प्रतिष्ठान, थोरला मंगळवेढा तालीम संघ, बाणेकारी तालीम संघ, अहिंसक तरुण मंडळ आणि सिद्धार्थ नवतरुण क्रीडा मंडळ यांनी संयुक्तपणे मिरवणुकीचे आयोजन केले होते. सुमारे १०० जणांचा संघ मिरवणुकीत सहभागी झाला होता. त्यामध्ये ६० बालक व प्रौढ तर ४० बालिकांचा समावेश होता.मार्गावरील प्रमुख चौकांमध्ये सहभागी खेळाडूंनी लाठी-काठी, बोथाटी, भौरा फिरविणे, लेझीम तसेच पेटत्या टेंभ्यांच्या सहाय्याने मर्दानी खेळांची थरारक प्रात्यक्षिके सादर केली. बालिका आणि युवकांनी सादर केलेल्या शौर्यकलेला नागरिकांनी टाळ्यांच्या कडकडाटात भरभरून दाद दिली.

कोल्हापूरच्या ऐतिहासिक खासबाग कुस्ती मैदानाचा हुबेहूब देखावा यंदाच्या मिरवणुकीतील प्रमुख आकर्षण ठरला.त्याचबरोबर कुस्तीप्रेमी शाहूराजे या संकल्पनेवरील देखाव्यानेही उपस्थितांचे विशेष लक्ष वेधले. ढोल-ताशांचा गजर, पारंपरिक वाद्यांचा निनाद आणि शिस्तबद्ध मिरवणुकीमुळे संपूर्ण परिसर शाहूमय झाला होता.



**असा होता मिरवणुकीचा मार्ग**

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक चार हुतात्मा पुतळा चौक सरस्वती चौक नवी वेस पोलीस चौकी छत्रपती शिवाजी महाराज चौक मिलिंद नगर सम्राट चौक न्यू बुधवार पेठ येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान असा मिरवणुकीचा मार्ग होता.

**अनेक संस्थांचा उत्स्फूर्त सहभाग**

छत्रपती शाहूराजे प्रतिष्ठान, भीमप्रकाश प्रतिष्ठान, सम्राट अशोक जयंती उत्सव मंडळ, राजर्षी प्रतिष्ठान, लोकराजा बहुउद्देशीय सामाजिक संस्था, गंगावेश तालीम प्रतिष्ठान यांच्यासह विविध सामाजिक संस्था, मंडळे आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेत राजर्षी शाहू महाराजांच्या समता, शिक्षण आणि सामाजिक न्यायाच्या विचारांना अभिवादन केले.

**मिरवणुकीतील आकर्षक देखावे असे**

छत्रपती शाहूराजे प्रतिष्ठान : राजर्षी छत्रपती शाहू खासबाग कुस्ती मैदान या ऐतिहासिक वास्तूचा हुबेहूब देखावा.

सम्राट अशोक जयंती उत्सव मंडळ : गंगाराम कांबळे यांच्या कॅन्टीनमध्ये चहा पिऊन राजर्षी शाहू महाराजांनी अस्पृश्यतेला दिलेले खुले आव्हान हा सामाजिक समतेचा संदेश देणारा देखावा. राजर्षी प्रतिष्ठान : समतेच्या विचारांच्या मनी रुजवूनी लाटा... शाहूराजांनी माझ्या भीमरायाला फेटा बांधला या संकल्पनेवर आधारित देखावा. गंगावेश तालीम प्रतिष्ठान : कोल्हापूर संस्थानात प्रथम आगमनावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शाहू महाराजांनी फेटा बांधून केलेले स्वागत साकारणारा देखावा.

लोकराजा बहुउद्देशीय सामाजिक संस्था : व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंग आणि बहुजनांच्या शिक्षणासाठी राजर्षी शाहू महाराजांनी घेतलेला ध्यास यावर आधारित देखावा.

**मुंद्रा पोर्ट ड्रग्ज प्रकरण**

# मुख्य आरोपी हरप्रीतला अटक

## पाकिस्तानी आयएसआय एजंटसोबत संगनमत

**नवी दिल्ली, २६ जून**

अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) २४ आणि २५ जूनला राष्ट्रीय राजधानीतील सहा ठिकाणी घेतलेल्या झाडाझडतीदरम्यान दिल्लीचा रहिवासी हरप्रीत सिंग तलवारला अटक केली आहे. १३ सप्टेंबर २०२१ रोजी मुंद्रा पोर्टवर जप्त केलेल्या सुमारे ३,००० किलो हेरॉईनशी संबंधित कथित मनी लॉंडरिंगच्या सुरू असलेल्या तपासाचा भाग म्हणून ही झडती घेण्यात आली.

ऑगस्ट २०२२ मध्ये राष्ट्रीय तपास संस्थेने (एनआयए) देखील याच प्रकरणात हरप्रीत सिंग उर्फ कबीर तलवारला अटक केली होती. ईडीने म्हटले आहे, की तलवार या प्रकरणातील मुख्य आरोपी आहे. ईडीच्या पथकांनी त्याच्या निवासस्थानासह त्याचे कर्मचारी, व्यावसायिक भागीदार आणि त्याच्याशी संबंधित संघटनांच्या ठिकाणी शोधमोहीम राबवल्यानंतर त्याला अटक करण्यात आली.

ईडी मुख्यालयाचे तपास पथक सेमी-प्रोसेस्ड टाल्कमध्ये लपवून मोठ्या प्रमाणावर हेरॉईन आयात करण्याच्या प्रकरणाचा तपास करत आहे. अमली पदार्थांच्या तस्करीप्रकरणी तलवार आणि इतरांविरुद्ध दाखल केलेल्या एफआयआरच्या आधारे ईडीने हा तपास सुरू केला आहे. एनआयएने या प्रकरणात सहा आरोपपत्रे दाखल केली होती. ज्यात आरोपींवर अफगाणिस्तान, पाकिस्तान आणि दुबईस्थित एका आंतरराष्ट्रीय अमली पदार्थ तस्कर सिंडिकेटसोबत कट रचल्याचा आरोप होता.




**गुन्हेगारीतून कमावले १.६५ कोटी रुपये**

अमली पदार्थांच्या अवैध विक्रीतून मिळालेली अंदाजे ७४ कोटी रुपये रक्कम हवालामार्फत अफगाणिस्तानला पाठवली जात होती. तिचा वापर दहशतवादी कारवायांना निधी पुरवण्यासाठी केला जात होता. (वृत्तसंस्था)

# आमदार निर्मला सप्रे प्रकरणात काँग्रेसला धक्का

**जबलपूर, २६ जून**

विधानसभेतील विरोधी पक्षनेते उमंग सिंघार यांनी आमदार निर्मला सप्रे यांच्यावर पक्षांतरबंदी कायद्याअंतर्गत कारवाई करण्याची मागणी करणारी याचिका दाखल केली होती. ही याचिका उच्च न्यायालयाने फेटाळून लावली. प्रभारी मुख्य न्यायाधीश विवेक रुशिया आणि न्यायमूर्ती प्रदीप मित्तल यांचा समावेश असलेल्या उच्च न्यायालयाच्या न्यायासनाने आपल्या आदेशात म्हटले आहे की, विधानसभा अध्यक्ष कायदेशीर प्रक्रियेनुसार विरोधी पक्षनेत्यांच्या अर्जाची तपासणी करत आहेत. संबंधित पक्षांचे जबाब आधीच नोंदवण्यात आले आहेत.त्यामुळे या प्रकरणात कोणताही आदेश देण्याची आवश्यकता नाही. लोकसभा निवडणुकीदरम्यान ५ मे २०२४ रोजी राहतगड येथे मुख्यमंत्री डॉ. मोहन यादव यांच्या एका कार्यक्रमात मंचावर उपस्थित होत्या. काँग्रेसच्या आमदार सप्रे यांनी भाजपात प्रवेश केला आहे, तरीही त्यांनी आपल्या आमदार पदाचा राजीनामा दिलेला नाही. (वृत्तसंस्था)

# मुलांना लक्ष्य करणाऱ्यांना जबाबदार धरावे



## मध्यपूर्वेतील संघर्षावर संयुक्त राष्ट्रांत भारताची भूमिका

**संयुक्त राष्ट्र, २६ जून**

मुलांचे शिक्षण आणि सुरक्षितता सुनिश्चित करणे हे जागतिक प्राधान्य आहे आणि गुन्हेगारांना शिक्षा दिल्याशिवाय हे उद्दिष्ट साध्य होऊ शकत नाही. मध्यपूर्वेतील संघर्षात मुले, महिलांना लक्ष्य करणाऱ्यांना जबाबदार धरायला हवे, अशी भूमिका भारताना संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेत मांडली.

संयुक्त राष्ट्रांमधील भारताचे स्थायी प्रतिनिधी, राजदूत हरीश पार्वतानेनी यांनी मानवाधिकारांवर बोलताना म्हटले की, संघर्षात शाळा आणि मुलांना लक्ष्य करणाऱ्यांना जबाबदार धरले पाहिजे. शिक्षेशिवाय मुलांच्या संरक्षणाचे कार्य अपूर्ण आहे. शिक्षण हा एक हक्क आहे जो युद्धकाळातही उपलब्ध असला पाहिजे. शांतता प्रस्थापित करण्यासाठी हे सर्वात शक्तिशाली साधन आहे. भारत युद्धकाळात मुलांच्या सुरक्षिततेसाठी आणि त्यांच्या शिक्षणाच्या हक्कासाठी पूर्णपणे वचनबद्ध आहे. प्रत्येक मुलाने आपली पूर्ण क्षमता ओळखावी, अशी भारताची इच्छा आहे. संयुक्त राष्ट्राने संघर्षग्रस्त भागातील मुलांच्या बिकट परिस्थितीवर सादर केलेला अहवाल अतिशय चिंताजनक आहे. संघर्षग्रस्त भागांमध्ये मुलांवरील हिंसाचारात लक्षणीय वाढ झाली आहे. २०२५ मध्ये जागतिक संघर्षात हजारो मुलांना जीव गमवावा लागला, तर लाखो मुले शिक्षणापासून वंचित राहिली. ३८,५५८ मुलांवर गंभीर गुन्हे नोंदवले गेले, ज्याचा परिणाम २४,१७४ मुलांवर झाला. यामध्ये १५,४९३ मुले आणि ७,९९० मुलींचा समावेश होता. युद्ध करणाऱ्या गटांनी आंतरराष्ट्रीय नियमांकडे दुर्लक्ष केले आणि कोणत्याही भीतीशिवाय गुन्हे करणे सुरूच ठेवले, ज्यामुळे नागरिक आणि मुलांवर प्रतिकूल परिणाम झाला. सरकारी दले देखील मुलांच्या हत्येसाठी आणि शाळांवर हल्ले करण्यासाठी जबाबदार आढळली. त्यांनी मानवतावादी मदतीतही अडथळा आणला हा प्रकार अक्षम्य आहे. (वृत्तसंस्था)



### इराणी शाळेवर अमेरिकेचा हल्ला नाही

संयुक्त राष्ट्रांचा अहवाल आणि इराणच्या आरोपावर बोलताना राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटले की, इराणमधील मिनाब येथील मुलींच्या शाळेवर झालेल्या हल्ल्यात अमेरिकन क्षेपणास्त्राचा वापर झाल्याचा आरोप निराधार आहे. त्यावेळी सर्व दिशांनी क्षेपणास्त्रे डागली जात होती, त्यामुळे या हल्ल्यासाठी नक्की कोण जबाबदार होते हे कदाचित कधीच समजणार नाही. आम्ही हा हल्ला केल्याचे दर्शवणारा कोणताही पुरावा मला आढळलेला नाही.

### शाळांवरील हल्ल्यांत ४४ टक्के वाढ

एकाच वर्षात शाळांवरील हल्ल्यांमध्ये ४४ टक्के वाढ झाली आहे. जगभरातील सहा मुलांपैकी एक मूल, म्हणजेच अंदाजे ४७३ दशलक्ष मुले, युद्धग्रस्त भागांमध्ये राहतात. यापैकी ८५ दशलक्षांहून अधिक मुलांना शिक्षणाची सोय उपलब्ध नाही. हा प्रकार मानवतेला काळीमा फासणारे आहे. मुलांचे संरक्षण करणे जागतिक जबाबदारी आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## अग्रलेख

# गुन्हेगारीची वृत्ती आणि विकृती

मानवी स्वभावाचा थांग लागणे कठीण असते. एखादी व्यक्ती कोणत्या वेळी कशी वागेल, काय करेल, याचा अंदाज करता येत नाही. मनुष्य स्वभाव हा कोणत्या वेळी कसे विकृत आणि विपरीत वळण घेईल, हेही सांगता येत नाही. माणसामध्ये वात्सल्य आणि वासना या मूलभूत भावना आदिम काळापासून आहेत. त्या नैसर्गिक आहेत. मात्र, त्यातील संतुलन जेव्हा ढळते, तेव्हा पाशवी स्वरूपाचे गुन्हेगारी कृत्य घडते. वाल्याचा वाल्मीकि झाला की त्याची पूजा केली जाते, मात्र नराचा नराधम होतो तेव्हा मात्र त्याला माफी नसावीच. अशा गुन्हेगारास कठोरतम शिक्षा मिळायला पाहिजे, अशी संतप्त जनभावना नेहमीच असते. गुन्हेगारीविषयक घटना देशात दररोज कुठे ना कुठे घडत असतात. गुन्हेगारीच्या घटनांतही वैविध्य असते. खिसे कापणारे, भुरट्या चोऱ्या करणारे, घरफोडी करणारे, दरोडे घालणारे, अपहरण करून खंडणी मागणारे, वेळप्रसंगी प्राणघातक हल्ला करणारे, खून करणारे असे अनेक प्रकार यात असतात.

महिलाविषयक गुन्हे करणाऱ्यांचा एक विशिष्ट वर्ग असतो. देशात गेल्या काही वर्षांत महिलाविषयक गुन्ह्यांची संख्या सतत वाढत आहे. महिलांची छेडखानी, विनयभंग करणे, बलात्कार करणे आणि बलात्कार करून आपण पकडले जाऊ नये म्हणून त्या स्त्रीची हत्या करणाऱ्या गुन्हेगारांची संख्याही देशात कमी नाही. काही वर्षांपूर्वी राजधानी दिल्लीत एक घटना अशीच घडली होती. निर्भया प्रकरण म्हणून ती देशभर गाजली होती. अशीच एक घटना मागील आठवड्यात राजधानी दिल्लीतही घडली. फूटपाथवर आपल्या कुटुंबीयांसह झोपलेल्या १० वर्षांच्या मुलीला एका कॅबचालकाने मध्यरात्री पळवून नेले आणि पाशवी अत्याचार करीत तिची हत्या केली. गेल्या काही वर्षांत अशा अत्याचाराच्या घटना वाढल्या आहेत. अशा घटनांनी जनमानस हादरून जाते, लोकक्षोभ उसळतो. लोक रस्त्यावर उतरत आपल्या तीव्र भावना व्यक्त करतात. महाराष्ट्रातील पुणे जिल्ह्यातील नसरापूर येथे अशीच एक घटना काही महिन्यांपूर्वी घडली. एका वयोवृद्ध व्यक्तीने साडेतीन वर्षांच्या मुलीवर बलात्कार करून तिची निर्घृण हत्या केली. त्यामुळे महाराष्ट्राचे जनमानस हादरले, जनक्षोभ उसळला. लोकांच्या संतप्त भावना लक्षात घेत राज्य सरकारने या प्रकरणाची जलद सुनावणी करण्याचा निर्णय घेतला. ५८ दिवसांत या प्रकरणाची सुनावणी पूर्ण करून विशेष न्यायालयाने आरोपी भीमराव प्रभाकर कांबळे या ६५ वर्षांच्या वृद्धाला या प्रकरणात दोषी ठरविले आहे. सोमवारी या प्रकरणात आरोपीला शिक्षा जाहीर केली जाईल. आरोपीला जन्मठेप आणि फाशी यापैकी एक शिक्षा मिळणार हे निश्चित आहे. इतक्या जलदगतीने तपास केल्याबद्दल न्यायालयाचे आणि तशी व्यवस्था केल्याबद्दल शासनाचे अभिनंदन केले पाहिजे.

सरकारी पक्षाने या आरोपीला फाशीची शिक्षा द्यावी, अशी मागणी केली आहे. विशेष न्यायालयाने हे दुर्मिळातील दुर्मिळ प्रकरण असल्याचे म्हटले आहे. त्यामुळे आरोपीला फाशी होईल, असे वाटते. येऊन-जाऊन आरोपीला शिक्षा व्हावी, एवढेच समाज म्हणू शकतो. ती होईल की नाही, हे मात्र सांगता येत नाही. मात्र, आरोपीला या स्तरावर फाशीची शिक्षा झाली तरी समाजाने आपली लढाई संपली, असे समजायचे कारण नाही. विशेष न्यायालयाने फाशीची शिक्षा दिली तरी काही दिवसांत वा महिन्यांत त्याला फासांवर लटकवले जाईल, असा भाबडा समज आपण करू नये. कनिष्ठ न्यायालयाने फाशीची शिक्षा दिली असे मानले तरी त्या शिक्षेवर उच्च न्यायालयाने शिक्कामोर्तब करायचे असते. त्यामुळे कांबळेसाठी या स्तरावर फाशीची शिक्षा जाहीर झाली तरी हे प्रकरण उच्च न्यायालयात जाईल. विशेष न्यायालयात जलदगतीने खटल्याची सुनावणी झाली म्हणून उच्च न्यायालयातही या प्रकरणाची वेगाने सुनावणी होईल, असे म्हणता येत नाही. शिवाय, विशेष न्यायालयाच्या फाशीच्या शिक्षेबाबत उच्च न्यायालय काय भूमिका घेते हेही महत्त्वाचे ठरणार आहे. कनिष्ठ न्यायालयाने फाशी दिली आणि ती शिक्षा उच्च न्यायालयाने कायम ठेवली तरी सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्याचा पर्याय असेलच. तेथेही काही काळ लागू शकतो. सर्वोच्च न्यायालयानेही आधीचा निर्णय कायम ठेवला तरी आरोपीला काही महिन्यांत फाशी होईल, असे नाही. सर्वोच्च न्यायालयाने कायम केलेल्या फाशीच्या शिक्षेवर राष्ट्रपतींकडे दयेचा अर्ज करता येतो. दयेचा अर्ज किती दिवसांत निकालात काढायचा, याची कोणतीच मर्यादा नाही. हा असा व्यवस्थात्मक विलंब होत असतो तेव्हा गुन्हेगाराऐवजी देशातील सर्वसामान्य माणसाच्या जलद न्यायाच्या आशा-अपेक्षा फासावर टांगल्या जातात. असे म्हणतात की, आपल्या देशात फार कमी लोकांना न्याय मिळतो. बाकीच्यांना न्यायालयातून जे काही प्रचंड विलंबाने मिळते, त्याला न्याय समजावे लागते. हे म्हणणे खरेच वाटते.

नागरिकांच्या तीव्र भावना लक्षात घेता आपल्या देशातील न्यायदानाच्या प्रक्रियेत बदल होण्याची आणि मुख्य म्हणजे ती वेगवान होण्याची गरज आहे. मुंबईवरील दहशतवादी हल्ल्यातील जिवंत पकडला गेलेला एकमेव आरोपी कसाबला आपल्या येथील तुरुंगात बिर्याणी खाऊ घातल्याचा आरोप झाला होता. गुन्हेगारांचे अशाप्रकारचे लाड केले जातात. जे पीडित असतात, त्यांना जिवंतपणी यातना दिल्या जातात. समाजाची स्मरणशक्ती अल्पजीवी असते. एखादे प्रकरण माध्यमात चर्चेत असते, तोपर्यंत लोक त्याची थोडीफार दखल घेतात. माध्यमांचा उत्साह हा अशीच दुसरी घटना होईपर्यंतच टिकत असतो. त्यामुळे समाजमन एखाद्या घटनेचा फार काळ पाठपुरावा करू शकत नाही. याचा फायदा आरोपी पक्षाला कळत-नकळत मिळतो. मुळात आपल्या देशात न्याय मिळविणे अतिशय महाग झाले आहे. आरोपी आपल्या बचावासाठी महागडे वकील लावतात, पाण्यासारखा पैसा खर्च करतात. गरज असेल तेथे पैसा ओतणारे अनेक आरोपी आपण पाहिले आहेत. शिवाय, काही अपवाद वगळता आपले पोलिस खाते योग्य तपास न करण्यासाठी अधिक ख्यात आहे. तपासात अनावधानाने म्हणा की जाणीवपूर्वक, अनेक त्रुटी ठेवल्या जातात आणि त्यामुळे अनेकदा न्यायालयात संशयाचा फायदा मिळून आरोपींची सुटका होते. सीबीआय ही देशातील सर्वोच्च तपास यंत्रणा समजली जाते. पण याच सीबीआयने तपास केलेल्या अनेक प्रकरणांतील आरोपींची निर्दोष मुक्तता झाली आहे. याचे दोनच अर्थ होतात. एक तर तपास यंत्रणांना तपास कसा करावा हे कळत नसेल किंवा तपास करताना त्यांच्यापुढे आरोपीला शिक्षा होण्याऐवजी दुसरे काही तरी ध्येय असेल. यातले काहीही घडले तरी पीडितांना न्याय मिळत नाही आणि आरोपींना कठोरतम शिक्षा होत नाही.

जगातील काही देशांत बलात्कार वा अशा तत्सम घटनांसाठी ज्या शिक्षा दिल्या जातात, त्या कदाचित फार क्रूर वाटू शकतात. पण, अनेकदा वाटते की, तशा शिक्षा आपल्या देशातही दिल्या पाहिजेत. भारतात गुन्हेगारांना कायद्याची तसेच शिक्षेची कोणतीही भीती उरली नाही. गुन्हेगार निर्ढावले आहेत. आपले कोणीच काही बिघडवू शकत नाही, आपण सगळ्यांना विकत घेऊ शकतो, असा समज असलेल्यांची संख्या वाढते आहे. त्यामुळेच गुन्हेगारी वाढली आहे आणि ती दिवसेंदिवस जास्त विकृत आणि पाशवी होत चालली आहे. आपण सर्वजण छत्रपती शिवाजी महाराजांचा वारसा सांगतो. पण, हे वास्तव विसरतो की, त्यांनी कधीच गुन्हेगारांची गय केली नाही. गुन्हेगार कुणीही असला तरी त्याचे हातपाय तोडण्याची शिक्षा महाराज देत. तशाच शिक्षा आज देण्याची गरज आहे. अन्यथा आम्हाला छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव घेण्याचा आणि त्यांचा जयजयकार करण्याचा अधिकार राहणार नाही. ■

## यंगिस्तान

# जेव्हा 'ती' क्रूर बनते!

**जयेश शत्रुघ्न मेस्त्री**

पुण्याजवळील लोहगड... सह्याद्रीच्या कुशीत वसलेला, इतिहासाचा साक्षीदार असलेला हा किल्ला. निसर्गप्रेमी, ट्रेकर्स आणि पर्यटकांनी नेहमीच गजबजलेला. पण हाच लोहगड काही दिवसांपूर्वी एका अशा घटनेचा साक्षीदार झाला, ज्याने संपूर्ण देशाला हादरवून सोडले. २६ वर्षीय केतन अग्रवाल या तरुणाचा मृतदेह दरीत सापडला आणि तपास जसजसा पुढे गेला, तसतसे समोर आलेले तपशील अधिकच धक्कादायक ठरले. पोलिसांच्या तपासानुसार, केतनची होणारी पत्नी सिया गोयल आणि तिचा कथित प्रियकर चेतन चौधरी यांनी कट रचल्याचा आरोप आहे. याआधी मुस्कान, सोनम, शिवानी आदी मुलींनी असेच कृत्य केले आहे. त्यांनी त्यांच्या नवऱ्यांना मारून टाकलं आहे. मात्र, या घटनांनी अनेक सामाजिक प्रश्न निर्माण केले आहेत. महत्त्वाचा प्रश्न म्हणजे 'ती' क्रूर का होत चालली आहे? केतन आणि सिया यांचा साखरपुडा झाला होता. काही महिन्यात दोघे लग्नबंधनात अडकणार होते. पण सियाच्या आयुष्यात दुसरीच एक व्यक्ती असल्याचा आरोप तपासात समोर आला. जर हे नाते तिला मान्य नव्हते, तर त्यातून बाहेर पडण्याचे अनेक मार्ग तिच्यासमोर होते. साखरपुडा मोडता आला असता, सत्य सांगता आलं असतं, घरच्यांचा विरोध पत्करता आला असता. पण तिने निवडलेला मार्ग सर्वात भयानक आहे. तपासात समोर आलेल्या माहितीनुसार, सियाने चौकशीत समाजाच्या दबावामुळे आणि साखरपुडा मोडण्याच्या भीतीमुळे हा निर्णय घेतल्याचे सांगितले आहे. हे विधान जितकं धक्कादायक आहे, तितकंच विचार करायला लावणारं आहे. आता तिचं म्हणणं आहे की, तिने केतनला तिच्या प्रेमाबद्दल सांगितलं होतं. तरीही त्याने प्रतिसाद दिला. अर्थात हे वाक्य वकिली शिकवणुकीतून आलेलं वाटतं. समजा हे खरं असलं, तरी खून करण्याचा मार्ग का पत्करावा लागला? त्या २० वर्षांच्या तरुण पोरीला जराही भीती वाटली नाही?

या प्रकरणात सर्वात अस्वस्थ करणारी गोष्ट म्हणजे तपासात समोर आलेले कथित घटनाक्रम. एका बाजूला एकत्र फिरणं, गप्पा मारणं, कॉफी पिणं आणि दुसऱ्याच क्षणी त्याच व्यक्तीचा खून करणं. खून करण्यापूर्वीचे त्या दोघांचेही व्हिडिओ समोर आलेत. जणू 'एक दुजे के लिए' अशा प्रकारचं हे जोडपं वाटतं. हा इतका अभिनय जमतो तरी कसा? आणखी एक धक्कादायक बाब म्हणजे केतनच्या मृत्यूनंतर सोशल मीडियावर शेअर करण्यात आलेली कथित भावनिक पोस्ट. 'तू मला वाढदिवशी सोडून गेलास' अशा आशयाचे संदेश. ही म्हणजे हद्द झाली. याला 'कोल्ड ब्लडेड मर्डरर' असं म्हणतात. इतक्या शांतपणे एखाद्याचा खून करण्यासाठी तितकंच थंड रक्त लागतं. मानसशास्त्र सांगतं की, जेव्हा व्यक्ती स्वतःच्या स्वार्थाला सर्वात वर ठेवते, तेव्हा सहानुभूती नाहीशी होऊ लागते.

या प्रकरणानंतर सोशल मीडियावर अनेक प्रतिक्रिया उमटल्या. अनेकांनी प्रश्न विचारला की, 'एखादी स्त्री इतकी क्रूर कशी असू शकते?' गुन्ह्याला लिंग नसतं. गुन्हा करणारा पुरुष असो किंवा स्त्री, गुन्हा हा गुन्हाच असतो. अर्थात, आपला समाज स्त्रीकडून ममतेची, संवेदनशीलतेची अपेक्षा करतो. त्यामुळे जेव्हा एखादी स्त्री गंभीर गुन्ह्यात आरोपी ठरते, तेव्हा धक्का अधिक मोठा बसतो. काही मोजक्या स्त्रियांमुळे सबंध स्त्री जातीवर लांछन लावण्याचे कारण नाही. समाज म्हणून विचार करताना अनेक प्रश्न उभे राहतात. स्त्रीवर अनेक देशांत पूर्वी कोणत्या ना कोणत्या परिस्थितीत अन्याय झालेच होते. त्यामुळे या आधुनिक युगात स्त्रिया अधिक स्वैर वागू लागल्यात का? की पालक म्हणून आपण आपल्या मुलांना जास्त सूट देतोय. पूर्वी लहान मुलांच्या भावनिक विश्वाचा सहसा विचार केला जायचा नाही पण आता आपण अधिक विचार करतोय का?काही लोकांनी तर तिने खून का केला असेल याचाही विचार व्हावा। असे मत मांडले आहे. म्हणजे आपण खुनी मानसिकतेचा स्वीकार करतोय का? प्रश्न आणि फक्त प्रश्न आणि या प्रश्नांची उत्तरे आपल्या या प्रगत समाजात नाहीत.

आज आपल्या समाजात संवाद कमी झाला आहे आणि दिखावा वाढला आहे. लोक आनंदापेक्षा आनंदी दिसण्याचा प्रयत्न जास्त करतात. प्रेमापेक्षा प्रेमाचं प्रदर्शन अधिक करतात. मुलांना करिअरबाबत जागृत केलं जातं, पण नातं तुटलं तर ते स्वीकारायचं कसं किंवा नाती जपायची कशी हे शिकवलं जात नाही. अपयश आलं तर त्यातून बाहेर कसं पडायचं, हे शिकवलं जात नाही. भावना व्यक्त करणं कमकुवतपणाचं लक्षण मानलं जातंय. पुरुषालाही मन असतं, त्यालाही भावना असतात असं म्हणत असताना पुरुषाचं पौरुषत्व मारलं जातंय का? किंवा स्त्री ही पुरुषाच्या खांद्याला खांदा लावून चालते असं म्हणत स्त्रीत्वाचा आपण बळी देतोय का? प्रत्येक गोष्टीत आपला अतिरेक होतोय का? आपल्याला कोणत्याही गोष्टीचं संतुलन राखता येत नाहीये का? पुन्हा प्रश्न!

या विश्वाचा ईश्वराने विश्व बनवताना सहसा समानता पाळलेली नाही. इथे वाघही आहे आणि शेळीही आहे. वाघ शेळी होऊ शकत नाही किंवा शेळी वाघ होऊ शकत नाही. ही असमानता नैसर्गिक संतुलन राखण्यासाठी अत्यंत आवश्यक आहे असे ईश्वराला वाटले असावे. अर्थात वाघ-शेळीचा नियम मानवी जीवनाला लागू नाही. मात्र असमानता निसर्गात आहे हे आपल्याला मान्य करावेच लागेल. ही असमानता म्हणजे अस्पृश्यता नव्हे. तर मानवी जीवनाचा अविभाज्य भाग आहे. स्त्री आई होऊ शकते, तिला मासिक पाळी येते. हे पुरुषांच्या बाबतीत घडू शकत नाही. या जगात मानवाने पहिल्यांदा प्रवेश केला त्यापासूनचा हा नियम आहे. कुणी हा नियमच बदलू पाहिला तर निसर्ग पुढे विद्रूप रूप धारण करेल. भारताविषयी बोलताना आपण केवळ पुरुषप्रधान संस्कृती असा उल्लेख करत नाही तर मातृसत्ताक असाही उल्लेख करतो. जेव्हा भले भले देव, महादेव राक्षसाला हरवू शकत नाही तेव्हा माता पार्वतीला कालिकेचं रूप धारण करावं लागतं. शक्ती-उपासना हा भारतीय संस्कृतीचा अविभाज्य भाग आहे. पण शिव आणि पार्वती हे संतुलन साधता आलं पाहिजे. पुरुषाचं पौरुषत्व जपलं गेलं पाहिजे आणि स्त्रीचं स्त्रीत्व टिकवून ठेवलं पाहिजे. आपल्या मुलांना नकार, अपयश पचवायला शिकवलं गेलं पाहिजे. झेन झी आणि झेन अल्फा पिढी बोअर होत नाही. कारण त्यांच्याकडे मोबाईल आहे. त्यांना बोअर व्हायला शिकवलं पाहिजे. तुकोबा म्हणतात,

**'सुख पाहता जवापाडे । दुःख पर्वताएवढे ॥**
**धरी धरी आठवण । मानी संतांचे वचन ॥'**

माणसाच्या आयुष्यातील सुख हे जवाच्या दाण्याएवढे लहान असते, तर दुःख पर्वताएवढे मोठे असते. सुख-दुःखात समभाव ठेवावा. थोडक्यात काय तर आपल्या कोणत्याही गोष्टीत संतुलन राखता आले पाहिजे. वाचकहो, स्त्री ही निसर्गतःच सर्जनशील असते, ती जन्मदात्री असते. पण जेव्हा तीच स्त्री विनाशाकडे वळते, तेव्हा ते केवळ एका व्यक्तीचं अपयश नसतं, तर ते संपूर्ण समाजाचं अपयश असतं. त्यामुळे समाज म्हणून आपण विचार करायला हवाय. 'ती' क्रूर का बनतेय? हा प्रश्न स्त्री, पुरुष, कुटुंब, पालक, समाज सर्वांनाच पडायला हवा... पण पुन्हा प्रश्नच! ■

writerjayeshmestry@gmail.com

## वेध

**विजय कुळकर्णी**

# मादक पदार्थांचे सेवन देश विकासातील अडसर

संपूर्ण जीवसृष्टीत मानव हा सर्वात बुद्धिमान प्राणी मानला जातो. याचे कारण म्हणजे मानवाचा विकास मेंदू आहे. मानवी शरीराची प्रत्येक हालचाल, निर्णय आणि व्यवहार मेंदू नियंत्रित करतो. जर मेंदू योग्यरीतीने काम करीत नसेल तर मानवाचे अस्तित्व जिवंत प्रेतासारखेच होईल. दुर्दैवाची बाब म्हणजे नशा सर्वात प्रथम आणि जास्त प्रमाणात या मेंदूवरच आघात करते. मादक पदार्थांचे सेवन व्यक्तीच्या विचार करण्याची आणि समजण्याची क्षमता हिरावून घेते. त्यामुळे चांगले-वाईट याचे भान त्याला राहात नाही. नशेत असलेल्या व्यक्तीला तो काय करीत आहे, याची सुतराम कल्पना नसते. त्यामुळे अनेक गुन्हेगारी घटनांमागे नशा हे प्रमुख कारण आढळते. नशापाणी करण्याच्या हव्यासापोटी लोक चोरी, लूट, हिंसा आणि इतर गैरकायदेशीर मार्गाचा अवलंब करतात. आर्थिक स्थिती खालावल्यामुळे अनेकदा एवढी भयंकर स्थिती निर्माण होते की, तो नशाबाज आपल्या परिवारातील सदस्यांशीही वाद, भांडण, मारामाऱ्या करू लागतो. नशेच्या हव्यासापायी अनेकांचे संसार उद्ध्वस्त झाल्याचे आपण पाहतो. निर्दोष लोकांना जीव गमाविण्याची वेळ येते. नशा केवळ मेंदूच नव्हे तर शरीराच्या इतर अवयवांनाही हळूहळू कमकुवत करते. त्याची परिणती शेवटी असाध्य आजार, महागडे उपचारांच्या रूपात दिसून पडते आणि त्या व्यक्तीच्या मृत्यूचे कारणही बनते. तेव्हा, अमली पदार्थांचे सेवन करणे हे कोणत्याही प्रकारे मनोरंजनाचे साधन होऊच शकत नाही.

भारत सरकारच्या सामाजिक न्याय व हक्क मंत्रालयामार्फत दरवर्षी नशा मुक्ती जागरूकता अभियान आयोजित केले जाते. यावर्षी १७ ते २६ जून या कालावधीत नशामुक्त सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. या अभियानांतर्गत देशभरात विविध जनजागृतीपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यावर्षी जागतिक स्तरावर 'ड्रग्ज समस्या : आव्हाने व समाधान' या संकल्पनेनुसार हा उपक्रम राबविण्यात येत आहे. हा विषय यादृष्टीनेही महत्त्वाचा आहे की, मादक पदार्थांची उपलब्धता आणि पोहोच पूर्वीच्या तुलनेत वाढली आहे. लहान मुलांपासून युवक-वृद्धांपर्यंत सर्वच वयोगटातील लोक कोणत्या ना कोणत्या प्रकारे या समस्येच्या विळख्यात सापडत आहेत. काही दिवसांपूर्वीच नागपूरमध्ये पाच महिन्याच्या कालावधीत पाच कोटींचे मादक पदार्थ जप्त करण्यात आले. जर, केवळ एका शहरातील ही स्थिती असेल तर राज्य आणि देशात मादक पदार्थ सेवन करणारे आणि त्याची तस्करी करणारे रॅकेट किती व्यापक असेल, याचे गांभीर्य लक्षात येते.

काही लोक दिवसभराचा थकवा घालविण्यासाठी, मानसिक ताण घालविण्यासाठी नशेचा आधार घेतात. त्यावेळी शिक्षणाचा अभाव व मनोरंजनाची मर्यादित साधने यामुळे ही धारणा बनली होती. मात्र, आता शिक्षणाचे प्रमाण वाढले आहे. मनोरंजनाची साधन उपलब्ध आहेत. तरीही, मोठ्या संख्येत युवक आधुनिकता आणि मौज मस्ती आणि सामाजिक प्रतिष्ठा म्हणून याकडे पाहतात. ही बाबत अत्यंत चिंताजनक आहे. रणधीर कपूरच्या एका जुन्या चित्रपटातील गाणं यानिमित्ताने आठवते, 'पिने वालोंको पिने का बहाना चाहिये।' या गाण्यात दारू पिण्यासाठी किती कारणं उपलब्ध असतात ते सांगितलं आहे. उच्च प्रतिची मिळाली नाही तर हातभट्टीची चालेल, असेही त्या गाण्यात वर्णन केले आहे. नशाबाज व्यक्तीला नेहमी सामाजिक अपमान, भावनात्मक पीडा सहन करावी लागते. नशेची सवय त्याला हळूहळू त्याच्या जबाबदाऱ्यांपासून दूर करते. तो आपल्या कर्तव्याचे पालन करण्यात अपयशी ठरतो. परिवारातील सदस्य असुरक्षित समजू लागतात. कुटुंब प्रमुखच अमली पदार्थांच्या आहारी गेला तर त्या कुटुंबावरच संकट ओढवते. नशा केवळ व्यक्ती, परिवार, समाजच नव्हे तर देशाच्या विकासातील मोठा अडसर आहेत. मुले व किशोरवयीनांना नशेपासून दूर ठेवणे ही पालकांची प्रमुख जबाबदारी आहे. केवळ मुलांना सर्व सुखसुविधा उपलब्ध करून देणे एवढ्यावरच न थांबता पालकांनी आपला मुलगा, मुलगी कुठे जाते, त्याचे मित्र कसे आहेत. ते दिवसभर काय करतात याकडेदेखील लक्ष ठेवणे आवश्यक आहे. या आव्हानाचा मुकाबला करण्यासाठी अतिकठोर कायदे करणे गरजेचे आहेत. नशेच्या गर्तेत सापडलेल्यांसाठी उपचार, पुनर्वसन आणि भावनात्मक सहकार्याची आवश्यकता आहे. तणाव, एकटेपणा, चिंता, सामाजिक दबाव आणि मानसिक अस्थिरता इत्यादी कारणं युवकांना नशा करण्यास उद्युक्त करतात. नशामुक्त भारत अभियानांतर्गत नशा मुक्ती केंद्र व पुनर्वसन, सहायता सेवा उपलब्ध आहेत. ज्यांना आवश्यकता असेल त्यांनी १४४४६ या हेल्पलाईन नंबरवर संपर्क साधावा. ■

८८०६००६१४९

## मुंबई वार्तापत्र

# बघ्यांचे शहर, मृतांची गर्दी!

**नागेश दाचेवार**

मुंबई... देशाची आर्थिक राजधानी, स्वप्नांची नगरी आणि 'कधीही न झोपणारं शहर.' या शहराबद्दल बोलताना आपण नेहमी अभिमानाने छाती फुगवतो. आपण कौतुक करतो ते इथल्या 'मुंबई स्पिरिट'चं, संकट आलं की मुंबईकर धावून जातो, पुराच्या पाण्यात अनोळखी व्यक्तीला हात देतो, बॉम्बस्फोट झाले तरी दुसऱ्या दिवशी पुन्हा कामावर रुजू होतो, अशा अनेक कथा आपण आजवर ऐकल्या आणि मिरवल्या आहेत. पण २३ जूनच्या त्या काळरात्री पश्चिम रेल्वेच्या लोकल ट्रेन क्रमांक ९०६६३ च्या फर्स्ट क्लास डब्यात जे घडलं, त्याने या तथाकथित 'मुंबई स्पिरिट'चा बुरखा टराटरा फाडला आहे. एका २५ वर्षांच्या निष्पाप मयंक लोहार नामक तरुणाचा एका माथेफिरूने धारदार शस्त्राने खून केला आणि तुडुंब भरलेल्या त्या डब्यातील 'सो-कॉल्ड एलिट' क्लासचे प्रवासी केवळ बघ्याची भूमिका घेत राहिले. ही घटना केवळ एका तरुणाची हत्या नाही, तर ती मुंबईकरांच्या संवेदनशीलतेची आणि माथेफिरूंसमोर हतबल झालेल्या माणुसकीची, आत्म्याची हत्या असून बघ्यांचे शहर अशी नवी ओळख निर्माण करणारी ठरली आहे.

**एका बंद दरवाजाची किंमत :** विरारमध्ये राहणारा मयंक रोजप्रमाणे अंधेरीच्या वेस्टसाईड मॉलमध्ये आपली सेल्समनची नोकरी संपवून रात्री १० च्या सुमारास घराकडे निघाला होता. चर्चगेटहून सुटलेली ती नालासोपारा फास्ट लोकल होती. बाहेर धो-धो पाऊस पडत होता, वाऱ्यामुळे पावसाचे तुषार डब्यात येत होते. मयंकने फक्त एवढंच म्हटलं की, पाऊस येतोय, लोकलचा दरवाजा बंद करा. किती किरकोळ आणि रास्त मागणी होती ही... पण त्या डब्यात आधीच मद्यधुंद अवस्थेत असलेल्या एका नराधमाला हा सल्ला रुचला नाही. वाद सुरू झाला. वाद विकोपाला गेला, बाचाबाची झाली आणि त्या नशेत असलेल्या आरोपीने थेट स्वतःच्या बॅगेतून धारदार शस्त्र काढून मयंकवर सपासप वार केले. मयंक रक्ताच्या थारोळ्यात पडला. अवघ्या काही मिनिटांत त्याचा मृत्यू झाला. एका हसत्या-खेळत्या कुटुंबाचा आधार असलेला तरुण फक्त एका लोकलच्या दरवाजाच्या वादापायी जगातून उठला. या घटनेतील सर्वात क्लेशदायक आणि शरमेने मान खाली घालायला लावणारी गोष्ट म्हणजे, ही घटना कुठेही अंधाऱ्या गल्लीबोळात घडलेली नाही; ती मुंबई लोकलच्या फर्स्ट क्लास डब्यात घडली.



ज्या डब्यात समाजातील सुशिक्षित, उच्चभ्रू, तथाकथित 'एलिट' वर्गाचे लोक प्रवास करतात. अशा भरगच्च डब्यात एका तरुणाला जिवंत मारले जात होते. मयंक जेव्हा त्या नराधमाशी झुंजत असेल, जेव्हा त्याने मदतीसाठी या सुशिक्षित लोकांकडे पाहिले असेल, धावा केला असेल, वाचवण्याची आर्त हाक दिली असेल, तेव्हा त्याला मृतांच्या गर्दीचं चित्र दिसलं असेल.

तिथे उपस्थित असलेल्या प्रवाशांनी मयंकला वाचवण्याऐवजी, त्या नराधमाला पकडण्याऐवजी स्वतःचा जीव वाचवण्यासाठी डब्यात इकडे-तिकडे पळायला सुरुवात केली. प्रत्येकाच्या हातात महागडे फोन होते, डोक्यावर सुशिक्षितपणाचा पगडा होता; पण मन मात्र पूर्णपणे बधिर झाले होते. त्या डब्यातील चार ते पाच जणांनी जरी हिंमत दाखवून त्या मद्यप्याला एकत्र येऊन पकडले असते तर कदाचित मयंक आज जिवंत असता. पण नाही, आपण कशाला पडायचं या भानगडीत? आपला काय संबंध? पोलिस केस होईल, झंगाट मागं लागेल, या क्षुद्र विचारांनी मुंबईकरांच्या बुद्धीला आणि हृदयाला ग्रासले होते. ही बघ्यांची भूमिका पाहून विचार येतो की, या ठिकाणी जर आपला स्वतःचा मुलगा, आपला भाऊ किंवा आपला नातू असता किंवा आपला सगा कोणी असता तर खरंच लोकांनी अशीच बघ्याची भूमिका घेतली असती?

**सीसीटीव्हीमधील विदारक सत्य, ना भीती, ना पश्चात्ताप! :** घटनेनंतरचे जे सीसीटीव्ही फुटेज समोर आले आहेत, ते अधिक अंगावर काटा आणणारे आहे. बोरिवली स्थानकाच्या प्लॅटफॉर्म क्रमांक ६ वर ट्रेन पूर्ण थांबण्यापूर्वीच तो आरोपी आरामात उतरतो. अंगात काळे कपडे, खांद्यावर काळी बॅग आणि वाढलेली दाढी. तो पळत नाहीये, त्याच्या चेहऱ्यावर पोलिसांची भीती नाही की आपण एका निष्पाप पोराचा जीव घेतला, याचा कोणताही पश्चात्ताप नाही. तो अत्यंत 'नॉर्मल' अवस्थेत स्टेशनच्या लिफ्टमधून वावरताना दिसतो, स्टेशनबाहेर पडतो आणि भरपावसात भिजत निघून जातो. हा नराधम इतका बिनधास्त कसा राहू शकतो? कारण त्याला माहिती आहे की, समाज नपुंसक झाला आहे. त्याला ठाऊक आहे की, कोणीही त्याला थांबवणार नाही. त्याला कळून चुकले आहे की, मुंबईकरांमध्ये गुन्हेगाराला प्रतिकार करण्याचे अवसान आता उरलेले नाही. तो नशेत होता, पण त्याहून मोठी नशा आणि बधिरता त्या डब्यातील इतर प्रवाशांच्या डोळ्यात चढली होती.

**मुंबई स्पिरिट की निव्वळ ढोंगीपणा? :** पोलिसांनी त्या नराधमाला पकडले आणि त्याला शिक्षाही होईल. पण त्या डब्यात मयंकच्या मृत्यूचे साक्षीदार बनलेल्या शेकडो प्रवाशांच्या विवेकाचे काय? दरवेळी २४ जुलैचा पूर असो वा २६/११ चा हल्ला, १९९३, २००६ बॉम्बब्लास्ट, मुंबई पुन्हा उभी राहिली, असं म्हणून आपण याला 'मुंबई स्पिरिट'चे गोंडस नाव देतो. पण मयंक लोहारच्या हत्येने सिद्ध केले आहे की, हे 'स्पिरिट' आता मृत झाले आहे. ही फक्त स्वार्थी लोकांची गर्दी आहे, ज्यांना रोज सकाळी कामावर जायचे आहे आणि रात्री सुरक्षितपणे घरी परतायचे आहे. बाजूला कोणाचा गळा कापला गेला, नाहीतर एखाद्या बहिणीची अब्रू लुटली गेली, तरी त्यांना काही फरक पडत नाही. आज मयंक गेला, उद्या रेल्वेच्या गर्दीत किंवा रस्त्यावर आपण असू. जर समाजाची हीच बघ्याची वृत्ती कायम राहिली, तर गुन्हेगारांचे धाडस असेच वाढत जाईल. ही घटना आपल्याला अंतर्मुख करायला लावणारी आहे. जेव्हा जेव्हा आपण अशा अन्यायकारक आणि हिंसक घटनांकडे डोळेझाक करतो, तेव्हा आपणही त्या गुन्ह्यात अप्रत्यक्षपणे सामील असतो. मयंकच्या मृत्यूने मुंबईच्या प्रतिमेवर लागलेला हा डाग कधीही पुसला जाणार नाही. आता तरी जागे व्हा, केवळ गर्दी बनून जगू नका, माणसांच्या शहरात किमान माणुसकी जिवंत ठेवा, एवढीच या मृत पावलेल्या 'मुंबई स्पिरिट' जनतेकडून अपेक्षा आहे. ■

९२७०३३३८८६

# विद्वत पूजनाची गौरवशाली परंपरा

**श्रीनृपशालिवाहन शके १५९६, आनंद नाम संवत्सर, ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशी (६ जून १६७४) रायगडावर हिंदवी स्वराज्याच्या सार्वभौम सिंहासनाची निर्मिती होऊन छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक झाला. शनिवार, २७ जून, ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशी शिव शक ३५३ चा पहिला दिवस. त्यानिमित्त...**

'शककर्ते शिवराय' हे अस्सल शिवचरित्र लिहीत असताना छत्रपती सेवा प्रतिष्ठानचे संस्थापक शिवकथाकार विजयराव देशमुख यांच्या मनात 'जिजामाता विद्वत गौरव पुरस्काराचे' बीजारोपण झाले. छत्रपती शिवाजी महाराजांनी राज्याभिषेकानंतर विद्वान लोकांचे पूजन केले होते. राजाने विद्वानांचे पूजन करणे त्याकाळी राजेशाही परंपरेत सुसंगत होते, योग्य होते. आता मात्र लोकशाहीत सामान्य लोकच राजे असतात. या न्यायाने सर्वसामान्य जनतेचे प्रतिनिधी म्हणून छत्रपती सेवा प्रतिष्ठान १९८२ पासून गेली ४५ वर्षे दरवर्षी धर्म, संस्कृती, इतिहास या क्षेत्रातील उल्लेखनीय आणि



व्रतस्थ कार्य करणाऱ्या महनीय व्यक्तींचे जिजामाता विद्वत गौरव पुरस्कार प्रदान करून पूजन करते. १९८२ चा पहिला पुरस्कार इंडोलॉजिस्ट, कलचुरी, वाकाटक, शिलाहार यांचे अभ्यासक, महामहोपाध्याय डॉ. वासुदेव विष्णू मिराशी यांना नागपुरात सन्मानाने प्रदान केला होता. आजपर्यंतच्या पुरस्कार भूषवणाऱ्यांच्या यादीत इतिहासकार ग. ह. खरे, सेतु माधवराव पगडी, पद्मविभूषण बाबासाहेब पुरंदरे, डॉ. जयसिंगराव पवार; संस्कृती अभ्यासक तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, बाळासाहेब देवरस, श्रीपाद केशव चितळे, डॉ. अरविंद जामखेडकर; वारकरी संप्रदाय धुंडा महाराज देगलूरकर, रामदासी संप्रदाय मारुती बुवा रामदासी, ज्ञानेश्वरीचे निरूपणकार किसन महाराज साखरे, नामदेवगाथाव्रती प्रकाश निकते गुरुजी, गाणपत्य डॉ. स्वानंद पुंड शास्त्री, संस्कृत पंडित वसंतराव गाडगीळ, मूर्तिशास्त्रज्ञ डॉ. देगलूरकर, दुर्ग अभ्यासक घाणेकर सर, लोककला आणि भारुडकार डॉ. रामचंद्र देखणे तसेच भारतरत्न लतादीदी, आचार्य गोविंद देव गिरी महाराज यासारखे वलयांकित लोकं आहेत. अण्णाबुवा कालगावकर, प्रज्ञाचक्षू मुकुंदकाका जाटदेवळेकर यासारखे प्रसिद्धीपराङ्मुख व्यक्तिमत्त्वेही आहेत. याच मांदियाळीत म्हणजे ४५ व्या वर्षी पुण्याचे रामकथाकार मानस किंकर रवींद्र पाठक यांचे शनिवार, ६ जून २०२६ राज्याभिषेक दिनी पुण्यात जिजामाता विद्वत गौरव पुरस्कार प्रदान करून पूजन करण्यात येणार आहे. सातत्याने दिला जाणारा पुरस्कार हा मांसाहेब जिजाऊंचा प्रसाद आहे, तोही राज्याभिषेक दिनी दिला जाणारा; ज्याची सुरुवात केली होती प्रत्यक्ष छत्रपती शिवाजी महाराजांनी. 'छत्रपती सेवा प्रतिष्ठानने ती व्रत म्हणून अंगीकारली. सद्गुरुदास विजयराव देशमुख यांच्या निजानंदगमनानंतरचा हा पहिलाच पुरस्कार सोहळा. विदर्भकन्या जिजाबाईंचा हा प्रसाद अक्षय्य अखंडीतपणे सुरू राहील.

॥ जय जिजाऊ, जय शिवराय ॥

**मंगेश श्रीराम बरबडे**/ पुणे / ९९२१२३७९९९

## वाचक पत्रे

### इतकी घाई कशाला?

सकाळी साधारण ९.४५ ला ऑफिसला येताना बजाजनगर चौकात आमच्या बाजूचा सिग्नल चालू असताना विरुद्ध बाजूने (वामन हरी पेठे ज्वेलर्स एक मुलगी दुचाकी घेऊन सुसाट निघाली आणि आमच्या बाजूने चालणाऱ्या चारचाकीच्या मध्ये आली. त्यामुळे चालकाला गाडी कंट्रोल करता आली नाही आणि त्या मुलीला चारचाकीची धडक बसली. धडक इतकी जोरदार होती की, ती मुलगी गाडीवरून उसळून दूर फेकली गेली आणि तिची गाडी त्या चारचाकीसोबत फरफटत गेली. इथे मुद्दा असा आहे की, वाहतूक नियंत्रक (सिग्नल), त्यावर लावलेले कॅमेरे असताना नागपुरात असे अपघात रोज बघायला मिळतात. प्रत्येक चौकात वाहतूक पोलिस असतीलच असे नाही; नागरिकांनी आपले वाहन रस्त्यावर चालवताना वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करणे अपेक्षित असते. विशेष करून दुचाकी वाहन चालकांनी, सिग्नल जम्पिंग आजकाल लोकांना थ्रिल वाटते, परंतु ते करीत असताना आपला जीव धोक्यात येईल असे वागण्यात काय मर्दुमकी आहे कोण जाणे! माझी वाहतूक शाखा नागपूर यांना कळकळीची विनंती आहे की, रस्त्यावरून वाहने विशेषकरून दुचाकी चालक स्वारांकरिता विशेष मोहीम सुरू करावी आणि प्रत्येक चौकात लावलेले सीसीटीव्ही कॅमेरे कार्यरत आहेत की नाही याची तपासणी व्हावी; जेणेकरून वाहतूक शाखेच्या मध्यवर्ती नियंत्रण कक्षाला सतत याचा डेटा उपलब्ध राहील व दोषींवर त्वरित कारवाई करता येईल तसेच तिथे लावलेले ध्वनिक्षेपकावरून सतत वाहतूक नियमांचे पालन करण्याच्या सूचना सुरू असाव्यात; जेणेकरून लोकांना वाहतूक नियम पालनाचे भान राहील. ■

**श्रीकांत देशपांडे**/नागपूर

# LOKMANGAL CO.-OP BANK LTD. SOLAPUR

INDEPENDENT AUDITOR'S REPORT FOR THE YEAR ENDED 31ST MARCH 2026
[See Section 81 and Rule 69 (3)]

## INDEPENDENT AUDITOR'S REPORT

To,
The Members,
Lokmangal Co-operative Bank Ltd, Solapur

**REPORT ON THE FINANCIAL STATEMENTS:**

We have audited the accompanying financial statements of Lokmangal Co-operative Bank Ltd, Solapur, which comprise the Balance Sheet as at 31st March 2026 and the Profit and Loss Account for the year then ended as on that date and a summary of Significant Accounting Policies and other explanatory information. The Returns of 7 (Seven) Branches audited by us are incorporated in these financial statements.

**MANAGEMENT'S RESPONSIBILITY FOR THE FINANCIAL STATEMENTS:**

Management is responsible for the preparation of these financial statements in accordance with the provisions of Banking Regulation Act, 1949 (AACS) and Maharashtra Co-operative Societies Act, 1960 and that give a true and fair view of the financial position, financial performance and cash flows of the Bank in accordance with the accounting principles generally accepted in India including Accounting Standards. This responsibility includes the design, implementation and maintenance of internal control relevant to the preparation and presentation of the financial statements that give a true and fair view and are free from material misstatement, whether due to fraud or error.

**AUDITOR'S RESPONSIBILITY:**

Our responsibility is to express an opinion on these financial statements based on our audit. We conducted our audit in accordance with the Standards on Auditing issued by the Institute of Chartered Accountants of India. Those Standards require that we comply with ethical requirements and plan and perform the audit to obtain reasonable assurance about whether the financial statements are free from material misstatements.

An audit involves performing procedures to obtain audit evidence about the amounts and disclosures in the financial statements. The procedures selected depend on the auditor's judgment, including the assessment of the risks of material misstatement of the financial statements, whether due to fraud or error. In making those risk assessments, the auditor considers internal control relevant to the Bank's preparation and fair presentation of the financial statements in order to design audit procedures that are appropriate in the circumstances. An audit also includes evaluating the appropriateness of accounting policies used and the reasonableness of the accounting estimates made by management, as well as evaluating the overall presentation of the financial statements.

**We report that:**

We believe that, the audit evidence we have obtained is sufficient and appropriate to provide a basis for our audit opinion.

**OPINION:**

Subject to our comments and observations contained in Part - A, B and C and Part - I and II of Audit Memo of bank respectively, in our opinion and to the best of our information and according to the Explanations given to us, the aforesaid financial statements have been drawn up in the prescribed forms and in accordance with the provisions of Maharashtra Co-operative Societies Act, 1960 and Banking Regulation Act, 1949 as applicable to Co-operative Societies and give the information required by the Act in the manner so required and give a true and fair view in conformity with the accounting principles generally accepted in India,

**REPORT ON OTHER LEGAL AND REGULATORY REQUIREMENTS:**

(a) We have obtained all the information and explanation which to the best of our knowledge and belief were necessary for the purpose of our audit and also found satisfactory.
(b) In our opinion proper books of accounts, as required by the act, the rules and bye-laws of the bank have been kept by the bank so far as it appears from the examination of these books.
(c) The Balance Sheet and Profit & Loss Account examined by us are in agreement with the books of accounts and returns of the bank and further the Profit and Loss Account shows true balance of profit for the period covered by such accounts.
(d) The transaction of the bank, which has come to our notice, has been within the powers of the bank.
(e) The return received from the bank has been found adequate for the purpose of our audit.
(f) To the best of our information and explanation given to us, the transactions of the bank, which have come to our notice have been within the competence of the bank and are in accordance with RBI Guidelines.

Further, for the year: 2025-26 the bank is awarded audit class **"A"** under the Camels Rating System prescribed by the Commissioner for Co-operation (MS), Pune.

**As per our report even date**
**For Vijay Panchappa and Co, Chartered Accountants**
**CA Prabhakar Gunjale**
Partner
**UDIN-26144817SBCVOQ4504**

**Date :- 06/06/2026**
**Place :- Solapur**

# लोकमंगल को - ऑप. बँक लि; सोलापूर

१२८अ, मुरारजी पेठ, सेवासदन प्रशालेजवळ, सोलापूर-४१३००१.
फोन नं. (०२१७) २७३५५०३,६६ E-mail id : ho@lokmangal.bank.in Website : www.lokmangal.bank.in

## ३१ मार्च २०२६ अखेरचे ताळेबंद पत्रक

| ३१/०३/२०२५ रुपये पैसे | रुपये पैसे | भांडवल व देणी | रुपये पैसे | ३१/०३/२०२६ रुपये पैसे |
|---|---|---|---|---|
| ४२,२८,०४,९५०.०० | | **१. भाग भांडवल** | | ४६,८२,६२,०२५.०० |
| | ८०,००,००,०००.०० | १. अधिकृत भाग भांडवल | ८०,००,००,०००.०० | |
| | | ८००००० भाग प्रत्येकी रू.१००० चे | | |
| | ४२,२८,०४,९५०.०० | २. वसुल झालेले भाग भांडवल | ४६,८२,६२,०२५.०० | |
| ८०,५१,४०,०७८.४५ | | **२. गंगाजळी व इतर निधी** | | ८४,७५,६७,३६१.०९ |
| | १३,२९,४६,६८०.०६ | १. विधीविहीत गंगाजळी | १४,३९,४६,५७६.०६ | |
| | ३,२२,३३५.०० | २. धर्मादाय निधी | ३,२२,३३५.०० | |
| | ४,८६,००,०००.०० | ३. इमारत निधी | ५,०१,००,०००.०० | |
| | ४९,३९,८५,१५७.७४ | ४. संशयित व बुडीत कर्ज निधी | ५३,०१,१३,०११.३८ | |
| | १९,८४,९६९.६५ | ५. सभासद कल्याण निधी | ३८,३५,२३९.६५ | |
| | २,९३,७५,०००.०० | ६. गुंतवणूक चढउतार निधी | २,९३,७५,०००.०० | |
| | १,७५,००,०००.०० | ७. उत्तम जिंदगी तरतूद निधी | १,७५,००,०००.०० | |
| | १,३७,८६३.०० | ८. लाभांश समिकरण निधी | १,३७,८६३.०० | |
| | १,००,०००.०० | ९. सांस्कृतिक निधी | १,००,०००.०० | |
| | ५५,०००.०० | १०. आकस्मित निधी | ५,०००.०० | |
| | १६,७१,५००.०० | ११. गुंतवणूक घसारा निधी | १६,७१,५००.०० | |
| | ४९,४०,७८६.०० | १२. कर्मचारी कल्याण निधी | ४२,६२,१२८.०० | |
| | ३,००,०००.०० | १३. शैक्षणिक / ट्रेनिंग निधी | ३,००,०००.०० | |
| | ७,३२,२०,७८७.०० | १४. पुनर्मुल्यांकन निधी | ६,५८,९८,७०८.०० | |
| ६०२,३३,४२,२६२.८८ | | **३. ठेवी** | | ९०१,०६,५०,२१४.८५ |
| | ४,९८,८०,६७,५६९.०० | १. मुदत ठेवी | ७,८०,९५,०६,६४१.८० | |
| | ५८,९२,४९,७१६.१९ | २. बचत ठेवी | ६५,०८,५४,०७०.६६ | |
| | ३५,६०,५८,४२१.६९ | ३. चालू ठेवी | ४६,८०,८२,७४९.३९ | |
| | ८,९८,७२,८४२.०० | ४. आवर्तक ठेवी | ८,२१,२५,७०२.०० | |
| | ९३,७१४.०० | ५. पिग्मी ठेवी | ८१,०५१.०० | |
| ९,३५,३२,४६६.०० | | **४. देणे व्याज** | | १४,४३,४४,८८६.०० |
| ३८,५०,२२,२७३.२९ | | **५. थकव्याज तरतूद दुबेरजी** | | ३०,४०,७९,९६६.८० |
| १,८२,४४,५५७.३३ | | **६. इतर देणी** | | २,२९,९७,७५२.८३ |
| | ६८,४५,२२३.९६ | १. पे स्लिप | १,३४,९६,३६७.४६ | |
| | ५२,५००.०० | २. टेलीफोन बील देणे | ४४,५००.०० | |
| | १,३५,०००.०० | ३. लाईट बील देणे | १,३५,०००.०० | |
| | २०,००,०००.०० | ४. लेखापरिक्षण फी देणे | २५,००,०००.०० | |
| | १९,३३,९४७.३७ | ५. ड्राफ्ट पेयेबल | १९,३३,९४७.३७ | |
| | ५६,१७,८८६.०० | ६. लाभांश देणे | २७,२३,९३८.०० | |
| | १२,६०,०००.०० | ७. रेंट पेयेबल | १७,६४,०००.०० | |
| | ४,००,०००.०० | ८. सॉफ्टवेअर व हार्डवेअर टेंडर EMD | ४,००,०००.०० | |
| ४,०८,४६,०५६.९४ | | **९. नफा** | | ५,९०,९९,१८८.६६ |
| | ९,२४९.१७ | १. मागील वर्षाचा शिल्लक नफा | ७९,७२९.९४ | |
| | ४,०८,३६,८०७.७७ | २. चालू वर्षाचा नफा | ५,९०,१९,४५८.७२ | |
| | | | | |
| ७,७८,८९,३२,६४४.८९ | | **बेरीज** | | १०,८५,७०,०१,३९५.२३ |

| ३१/०३/२०२५ रुपये पैसे | रुपये पैसे | जिंदगी व येणी | रुपये पैसे | ३१/०३/२०२६ रुपये पैसे |
|---|---|---|---|---|
| ७,५७,७२,७६०.०० | | **१. रोख शिल्लक** | | ६,५१,७६,५१३.०० |
| | ७,५७,७२,७६०.०० | अ. हातातील शिल्लक | ६,५१,७६,५१३.०० | |
| ४५,९१,३६,३९५.३४ | | **२. बँकातील चालू खात्यातील शिल्लक** | | ५०,१६,८३,७७०.०४ |
| | ४६,६३,४१८.९७ | १. आय.डी.बी.आय.बँक CSGL A/C | ३८,२५,०४२.६५ | |
| | ६६,८५,००५.७८ | २. आय.डी.बी.आय.बँक एटीएम | ५०,०२,२९७.७१ | |
| | ९२,५९,३२९.९२ | ३. आय.डी.बी.आय.बँक इसीएस | ६८,००,१३९.४८ | |
| | ४,२८,०३,५८२.०१ | ४. आय.डी.बी.आय. Inward | ४,६४,८८,१६९.५४ | |
| | ९०,०७,७७८.१४ | ५. आय.डी.बी.आय. Outward | २,२२,०४,०५४.०४ | |
| | २,१०,४४,१२१.८२ | ६. आय.डी.बी.आय. पुणे | ४०,५७,७१८.३७ | |
| | ४९,२४,९२२.६८ | ७. आय.डी.बी.आय. बार्शी शाखा | ३०,२४,९०४.६९ | |
| | १,०२,५२,७०६.६६ | ८. एस.बी.आय. सोलापूर | २,९२,०५,८२९.८६ | |
| | ३,०४,९९,९९८.९४ | ९. बँक ऑष महाराष्ट्र अक्क्लकोट | २,६६,९९,९५९.३२ | |
| | ४१,६८,४६१.४८ | १०. बँक ऑफ इंडिया | ५,४१,६८,४६१.४८ | |
| | १३,८१,००९.८० | ११. एम.एस.सी.बँक | १३,८१,००९.८० | |
| | ९,६३,८४,६५८.९८ | १२. सो.जि.म.सह. बँक प्रधान शाखा | ५,१४,३४,९२५.९७ | |
| | १,५१,१५,०३३.४६ | १३. एक्सिस बँक सी.टी.एस, | ४,०४,४७,१४२.७६ | |
| | ५,९४,६७,७८६.२९ | १४. एक्सिस बँक सोलापूर शाखा | २,६२,७२,५३६.४२ | |
| | ७,७९,०८,४४७.९७ | १५. आयसीआयसीआय. आयएमपीएस | ९,०९,२४,७६६.७५ | |
| | ९,१०,२२३.०० | १६. आयसीआयसीआय, मंगळवेढा | ०.०० | |
| | ११,१०,२९७.०७ | १७. एक्सिस बँक पंढरपूर शाखा | ०.०० | |
| | २,४८,४९,६१३.४३ | १८. आयसीआयसीआय बँक UPI | २,१९,४५,८००.५७ | |
| | ३,८६,९९,९९८.९४ | १९. बँक ऑफ महाराष्ट्र सांगोला शाखा | ३,५९,८९,९१६.८७ | |
| | ०.०० | २०. बँक ऑफ महाराष्ट्र पंढरपूर शाखा | ३,१८,११,०९३.७६ | |
| २,१६,१६,१७,१३२.०० | | **३. गुंतवणूक** | | ४,१६,६९,५७,६२८.०० |
| | ८३,२४,६०,२००.०० | १. सरकारी कर्जरोखे (केंद्र) | २,७१,३५,९५,५३३.०० | |
| | ७४,४६,०३,०००.०० | २. सरकारी कर्जरोखे (राज्य) | ७९,५८,१४,६११.०० | |
| | ५,०००.०० | ३. सो.जि.म.सह. बँक शेअर्स | ५,०००.०० | |
| | १,०००.०० | ४. एम.एस.सी.बँक शेअर्स | १,०००.०० | |
| | ११,३५०.०० | ५. सो.जि.म. सह. बँक ठेव | ११,३५०.०० | |
| | ९,६८,९२,९८८.०० | ६.आय.डी.बी.आय. बँक | ११,३०,८३,५४५.०० | |
| | ८,६०,००,०००.०० | ७. जना बँक ठेव | २२,८९,००,०००.०० | |
| | १,९०,००,०००.०० | ८. इक्विटास बँक ठेव | ८,३०,००,०००.०० | |
| | २६,७५,००,०००.०० | ९. सुर्योदय बँक ठेव | १६,३५,००,०००.०० | |
| | १,३१,४३,५९४.०० | १०.आय.सी.आय.सी.आय. बँक ठेव | १,४०,४६,५८९.०० | |
| | १०,२०,००,०००.०० | ११. युनिटी बँक ठेव | ०.०० | |
| | ०.०० | १२. ए.यु. बँक ठेव | ५,५०,००,०००.०० | |
| ४,१५,१५,०१,१६०.४४ | | **४. कर्जे** | | ५,२३,९६,४९,०४३.७१ |
| | १,०६,३०,४०,९००.७१ | अ. अल्पमुदतीची कर्जे | १,२७,९२,९२,६३४.२८ | |
| | | १. तारण कर्जे रू. १,२७,८२,१५,२०४.२८ | | |
| | | पैकी थकबाकी रू. १८,९२,१०,१७९.०८ | | |
| | | २. विनातारण कर्जे रू. १०,७७,४३०.०० | | |
| | | पैकी थकबाकी रू. १०,७७,२४०.०० | | |
| | २,९७,२१,४३,०२४.१३ | ब. मध्यम मुदतीची कर्जे | ३,८२,६७,९५,६७५.८३ | |
| | | १. तारण कर्जे रू. ३,८१,९५,५०,०५२.०३ | | |
| | | पैकी थकबाकी रू. ३६,००,१८,३९३.२८ | | |
| | | २. विनातारण कर्जे रू. ७२,४५,६२३.८० | | |
| | | पैकी थकबाकी रू. ६०,६८,५४६.८० | | |
| | ११,६३,१७,२३५.६० | क. दिर्घ मुदतीची कर्जे | १३,३५,६०,७३३.६० | |
| | | १. तारण कर्जे रू. १३,३५,६०,७३३.६० | | |
| | | पैकी थकबाकी रू. १,११,२८,८७०.०० | | |
| ३८,५०,२२,२७३.२९ | | **५. थकव्याज तरतूद दुबेरजी** | | ३०,४०,७९,९६६.८० |
| १०,२६,००,२४८.८२ | | **६. जागा, इमारत व स्थावर** | | ११,३८,७४,६५९.५३ |
| | १,०६,६८,२६८.९९ | १. फर्निचर | १,०९,३७,३७४.८० | |
| | २०,६६,५४८.१५ | २. कॉम्प्युटर व इतर ईलेक्ट्रॉनिक साहित्य | १,५९,३७,२१७.७९ | |
| | ३२,०२,३०३.६० | ३. मोटार कार | २७,२१,९५८.०६ | |
| | १५,४२,९२३.५९ | ४. मशिनरी व इतर | १२,७४,६७७.५९ | |
| | ६८,९९,७००.०० | ५. जमीन (जागा) | ६८,९९,७००.०० | |
| | ७,८२,२०,५०४.४९ | ६. इमारत | ७,६१,०३,७३१.२९ | |
| ९,९३,३९,६१९.०० | | **७. इतर येणी** | | ११,१६,८२,७५८.१५ |
| | १,८१,८६,३३१.०० | १. सरकारी कर्जरोखे गुंतवणूक व्याज येणे | ३,८५,२२,०७२.५० | |
| | ४,०२,५४,४९१.०० | २. गुंतवणूक व्याज येणे | ३,७९,११,३९५.३३ | |
| | ४,७८,४०३.०० | ३. कर्मचारी खाते व्याज येणे | ३,२३,१३६.०० | |
| | ९,०००.०० | ४. सो.म.पा. नळ डिपॉजीट | ९,०००.०० | |
| | २,२१,०९५.०० | ५. एम.एस.ई.बी. डिपॉजीट | २,२१,०९५.०० | |
| | १,६००.०० | ६. गॅस डिपॉजीट | १,६००.०० | |
| | १८,००,०००.०० | ७. शाखा सिक्युरिटी डिपॉजीट | १८,००,०००.०० | |
| | ९,५००.०० | ८. टेलिफोन डिपॉजीट | ९,५००.०० | |
| | १८,७२,७२०.०० | ९. सरकारी कर्जरोखे प्रिमियम | १५,५०,७६६.०० | |
| | ३,५०,००,०००.०० | १०. ॲडव्हान्स टॅक्स | २,२५,००,०००.०० | |
| | ६,०७,५४८.०० | ११. फ्रेंकिंग पार्किंग फंड | ४,३०,७५०.०० | |
| | ८,९८,९३१.०० | १२. इमारत खरेदी EMD | ०.०० | |
| | ०.०० | १३ एस.जि.एस.टी. | ४२,०३,८२७.६६ | |
| | ०.०० | १४ सी.जि.एस.टी. | ४१,९९,६१५.६६ | |
| ३५,३९,४३,०५६.०० | | **८. नॉन बँकिंग असेट (NBA)** | | ३५,३८,९७,०५६.०० |
| ७,७८,८९,३२,६४४.८९ | | **बेरीज** | | १०,८५,७०,०१,३९५.२३ |

**संभाव्य देणी (Contingent Liablities)**

| ३१/०३/२०२५ रुपये पैसे | रुपये पैसे | तपशील | रुपये पैसे | ३१/०३/२०२६ रुपये पैसे |
|---|---|---|---|---|
| ५,२२,५०,६३८.७१ | | **संभाव्य देणी (Contingent Liablities)** | | ५,४३,६९,१५२.१९ |
| | १,१५,५०,६३८.७१ | १. अनक्लेम्ड ठेवींची रक्कम रिझर्व्ह बँकेकडे वर्ग | १,३१,४५,९०७.१९ | |
| | ४,०७,००,०००.०० | २. बॅक गॅरंटी | ४,१२,२३,२४५.०० | |
| ५,२२,५०,६३८.७१ | | **बेरीज** | | ५,४३,६९,१५२.१९ |

## ३१ मार्च २०२६ अखेरचे नफा-तोटा पत्रक

| ३१/०३/२०२५ | रुपये पैसे | खर्च | रुपये पैसे | ३१/०३/२०२६ |
|---|---|---|---|---|
| ४१,०४,८३,९४२.०० | | **१. व्याज खर्च** | | ५५,१२,८०,५४७.०० |
| | ४१,०४,८३,९४२.०० | १. ठेवीवर दिलेले व्याज | ५५,१२,८०,५४७.०० | |
| ६,२८,८१,३७५.५१ | | **२. कर्मचाऱ्यांचे पगार व भत्ते** | | ६,९७,११,१७५.०० |
| | ५,७५,३३,७४७.०९ | १. पगार | ५,८७,५३,६५२.०० | |
| | ३५,९५,९३९.०० | २. प्रॉव्हिडंट फंड कॉन्ट्रीब्युशन | ४३,४३,४६३.०० | |
| | ५,४१,६४४.८० | ३. कर्मचारी गणवेश खर्च | ८,६७,५४०.०० | |
| | १,००,८७३.०० | ४. कर्मचारी प्रशिक्षण खर्च | २,१८,३०८.०० | |
| | १०,५९,२१५.६२ | ५. ग्रॅच्युटी | ५,२८,२१२.०० | |
| | ४९,९५६.०० | ६. रजा रोखीकरण खर्च | ५०,००,०००.०० | |
| १३,५६,७२७.०० | | **३. मा. संचालक मंडळ बैठक भत्ता व प्रशिक्षण** | | २२,९३,१५८.०० |
| | १३,५३,७६५.०० | १. मिटिंग भत्ता | २२,३०,८७८.०० | |
| | २,९६२.०० | २. मा. संचालक प्रशिक्षण खर्च | ६२,२८०.०० | |
| २,०३,०७,४३८.०० | | **४. भाडे कर विमा इ.** | | ५,२३,१८,५२५.२४ |
| | ५४,७६,३३७.०० | १. इमारत भाडे व कर | ६५,२४,१५४.०० | |
| | ५९,०२,०६२.०० | २. इनकम टॅक्स | ३,५०,११,८१०.०० | |
| | ६९,९४,७८९.०० | ३. विमा खर्च | ८६,५७,७७३.२४ | |
| | १९,३४,२५०.०० | ४. वीज खर्च | २१,२४,७८८.०० | |
| ५,९०,०२३.७२ | | **५. टपाल तार दुरध्वनी वर्गणी खर्च** | | १०,०१,४६५.९२ |
| | १,८८,३३९.०१ | १. दुरध्वनी खर्च | ६,७३,८२४.१७ | |
| | १,५७,४००.०० | २. वर्गणी | ९५,३५६.०० | |
| | २,४४,२८४.७१ | ३. टपाल | २,३२,२८५.७५ | |
| २१,९९,१५४.०० | | **६. ऑडीट फी** | | २९,७९,९५०.०० |
| ८४,५७,९८५.०३ | | **७. घसारा व देखभाल खर्च** | | १,९३,८४,८१७.६० |
| | ३८,५४,०८७.५२ | १. फर्निचर, कॉम्प्युटर, इमारत व इतर | १,१९,८५,८६९.१६ | |
| | ३,३३,९५४.०० | २. सरकारी कर्जरोखे घसारा | ८,८२,५१०.०० | |
| | ३२,७४,४२९.०१ | ३. पेंटींग रिपेअर ॲण्ड मेंटेनन्स खर्च | ५५,००,५६३.४४ | |
| | ९,९५,५१४.५० | ४. ए.एम.सी. चार्जेस | १०,१५,८७५.०० | |
| १,२२,२१,८७०.७९ | | **८. स्टेशनरी छपाई जाहिरात व प्रवास खर्च** | | १,६४,५३,५७९.७५ |
| | ३१,८८,६४८.३२ | १. स्टेशनरी | २७,०३,२४०.६८ | |
| | ५६,८९,०६८.४७ | २. जाहिरात | १,०९,६१,६२९.०७ | |
| | ३३,४४,१५४.०० | ३. प्रवास खर्च | २७,८८,७१०.०० | |
| १,६१,४३८.१८ | | **९. इतर बँक चार्जेस** | | २,९५,७७९.५९ |
| | १,६१,४३८.१८ | १. कमिशन | २,९५,७७९.५९ | |
| ८,७५,००,०००.०० | | **१०. तरतूदी** | | ८,००,००,०००.०० |
| | ८,५०,००,०००.०० | १. संशयीत व बुडीत निधी तरतूद | ८,००,००,०००.०० | |
| | २५,००,०००.०० | २. उत्तम जिंदगी तरतूद | ०.०० | |
| २,६७,८३,५१५.६६ | | **११. इतर खर्च** | | २,५७,९३,७१०.९१ |
| | ३२,४४,०७९.६९ | १. किरकोळ खर्च | ३७,२४,२८५.२६ | |
| | ३३,८२,८२२.०६ | २. सांस्कृतिक कार्यक्रम खर्च | ६०,९३,८६१.४० | |
| | ७,५७,६९५.५५ | ३. वाहन खर्च डिझेल | १२,५९,३८०.५९ | |
| | १७,०१,२०३.१८ | ४. लिगल फी | १६,७२,५१८.७० | |
| | ३२,७९,९३१.३५ | ५. शाखा कनेक्टीव्हीटी खर्च | २६,०४,१५९.८९ | |
| | ७,७९,०५६.०० | ६. बी.सी/बी.एफ कमिशन खर्च | ८,६०,२१५.०० | |
| | २२,६५,२४०.७२ | ७. एस.एम.एस. सुविधा खर्च | ४१,३५,५४३.११ | |
| | ३५,१०,०१९.७३ | ८. ए.टी.एम. चार्जेस | ५,१३,९६१.९९ | |
| | ७३,६३,४६७.३८ | ९. जी.एस.टी. खर्च | ४९,२९,७८४.९७ | |
| | ५,००,०००.०० | १०. आरबीआय दंड | ०.०० | |
| | | १२. नफा | | |
| ४,०८,३६,८०७.७७ | ४,०८,३६,८०७.७७ | **१. नफा** | ५,९०,१९,४५८.७२ | ५,९०,१९,४५८.७२ |
| ६७,३७,८०,२७७.६६ | | **बेरीज** | | ८८,०५,३२,१६७.७३ |

| ३१/०३/२०२५ | रुपये पैसे | उत्पन्न | रुपये पैसे | ३१/०३/२०२६ |
|---|---|---|---|---|
| ५९,६३,५५,८०६.७१ | | **१. एकूण व्याज व वाटप** | | ७८,७५,६३,५२३.९६ |
| | ४६,४१,५०,४५७.९२ | १. कर्जावरील व्याज | ५९,८७,१५,५६९.८४ | |
| | ३,८२,४१,९०७.०० | २. मुदत ठेव गुंतवणुकीवरील व्याज | ६,७४,९७,१२७.११ | |
| | ९,३९,६३,४४१.७९ | ३. सरकारी कर्जरोखे गुंतवणुकीवरील व्याज | १२,१३,५०,८२७.०१ | |
| ५,६४,५४५.२४ | | **३. कमिशन ब्रोकरेज** | | ४,१०.६३३.३६ |
| ७,६८,५९,९२५.७१ | | **३. किरकोळ इतर** | | ९,२५,५८,०१०.४१ |
| ६७,३७,८०,२७७.६६ | | **बेरीज** | | ८८,०५,३२,१६७.७३ |

तपासले लेखापरिक्षण अहवालातील शेऱ्यास पात्र राहून बरोबर आहे.

**आ. सुभाष देशमुख**
चेअरमन

**प्रदीप नागणे**
व्हा. चेअरमन

**सौरभ अंबुरे (सी.ए.)**
तज्ञ संचालक

**राजेशसिंह एल. बायस**
मुख्य कार्यकारी अधिकारी

**मे. विजय पंचप्पा ॲन्ड कंपनी**
(चार्टर्ड अकौंटंट)
UDIN No.- 26144817SBCVOQ4504



# ऑस्ट्रेलियाची बाद फेरीत धडक

**सॅन फ्रान्सिस्को, २६ जून**

फिफा २०२६ फुटबॉल विश्वचषक स्पर्धेत पॅराग्वेविरुद्धचा सामना गोलशून्यने बरोबरीत सोडवून ऑस्ट्रेलियाने विश्वचषकाच्या 'अंतिम ३२' संघांच्या फेरीत आपले स्थान निश्चित केले; या निकालामुळे पॅराग्वेला मात्र आता आपण पुढे जाणार की नाही, या चिंतेत वाट पाहावी लागणार आहे.

सॅन फ्रान्सिस्को बे एरिया स्टेडियमवर झालेल्या या चुरशीच्या आणि शारीरिक ताकद पणाला लावणाऱ्या सामन्यात, सुरुवातीला पिछाडीवर पडल्यानंतर पॅराग्वेने उत्तरार्धात आक्रमक खेळ केला. मात्र, अखेरीस ऑस्ट्रेलियाचा संघ बाद फेरीत धडक मारण्यात यशस्वी ठरले. कतारमधील स्पर्धेत अंतिम १६ संघांच्या फेरीपर्यंत मजल मारल्यानंतर ऑस्ट्रेलियाने तिसऱ्यांदा बाद फेरीत पोहोचण्याची कामगिरी केली आहे.



टोनी पोपोविच यांच्या संघाने 'गट डी'मध्ये सह-यजमान अमेरिकेपाठोपाठ दुसरे स्थान पटकावले.

आता त्यांचा सामना 'गट जी'मधील दुसऱ्या क्रमांकाच्या संघाशी होईल; 'गट जी'मधील परिस्थिती मात्र अजूनही अनिश्चित आहे, कारण शुक्रवारी इजिप्त विरुद्ध इराण आणि बेल्जियम विरुद्ध न्यूझीलंड असे सामने होणार आहेत.

चार गुण मिळवलेला पॅराग्वे संघ 'सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या आठ तिसऱ्या क्रमांकाच्या संघांपैकी एक' म्हणून पुढे जाण्यासाठी कदाचित पात्र ठरू शकेल; मात्र २०१० च्या स्पर्धेत उपांत्यपूर्व फेरी गाठणाऱ्या या संघाला पुढील काही दिवसांत होणाऱ्या गटातील अंतिम सामन्यांच्या निकालांची वाट पाहावी लागेल. ◂ (वृत्तसंस्था)

# एलंगाच्या गोलमुळे सामना बरोबरीत

## जपान, स्वीडन दोन्ही संघ बाद फेरीत



जपानच्या हिरोकी इटोला हुलकावणी देत गोल करण्याच्या प्रयत्नात स्वीडनचा अँन्थोनी एलंगा

**डॅलस, २६ जून**

फिफा विश्वचषक स्पर्धेत येथे जपान आणि स्वीडन यांच्यादरम्यान खेळला गेलेला एफ गटाचा साखळी सामना १-१ गोलने बरोबरीत राहिला. हा सामना बरोबरीत सुटल्याने दोन्ही संघांचे हित साधले गेले, या दोन्ही संघांनी अंतिम ३२ संघांच्या फेरीत आपले स्थान निश्चित केले. मध्यंतरापर्यंतचा खेळ गोलशून्यने बरोबरीत राहिला. त्यानंतर ५६ व्या मिनिटाला डायझेन माएडाने जपानला आघाडी मिळवून दिली, परंतु त्यानंतर ६२ व्या मिनिटाला अँन्थोनी एलंगाने झकासरित्या गोल नोंदवून स्वीडनला सामन्यात बरोबरी मिळवून दिली. जपानचे स्थान आधीच निश्चित झाले होते आणि 'गट उपविजेते' म्हणून ते सोमवारी ह्युस्टन येथे ब्राझीलचा सामना करतील. हा बाद फेरीतील एक अत्यंत रोमांचक सामना ठरणार आहे, जो स्पर्धेच्या इतक्या सुरुवातीच्या टप्प्यावर होणे तसे अपेक्षित नव्हते. ◂ (वृत्तसंस्था)

## आजचे सामने

**पनामा वि. इंग्लंड**
**वेळ** : शनिवारी रात्री २:३० वाजतापासून
**स्थळ** : मेटलाइफ स्टेडियम, न्यू जर्सी

**क्रोएशिया वि. घाना**
**वेळ** : शनिवारी रात्री २:३० वाजतापासून
**स्थळ** : लिंकन फायनान्शियल फील्ड, फिलाडेल्फिया

**कोलंबिया वि. पोर्तुगाल**
**वेळ** : रविवारी पहाटे ५:०० वाजतापासून
**स्थळ** : हार्ड रॉक स्टेडियम, मियामी

**डीआर काँगो वि. उझबेकिस्तान**
**वेळ** : रविवारी पहाटे ५:०० वाजतापासून
स्थळ : मर्सिडीज-बेंझ स्टेडियम, अटलांटा

**अल्जेरिया वि. ऑस्ट्रिया**
**वेळ** : रविवारी सकाळी ७:३० वाजतापासून
**स्थळ** : ॲरोहेड स्टेडियम, कॅन्सस सिटी

**जॉर्डन वि. अर्जेंटिना**
**वेळ** : सकाळी ७:३० वाजतापासून
स्थळ : एटी अँड टी स्टेडियम, डॅलस

**थेट प्रसारण** : युनाईट८ (झी५) वर

# आयव्हरी कोस्ट पहिल्यांदाच बाद फेरीत

**फिलाडेल्फिया, २६ जून**

आयव्हरी कोस्टने कुरासाओचा २-० असा पराभव करून पहिल्यांदाच विश्वचषकाच्या बाद फेरीत धडक मारली. किशोरवयीन प्रतिभावान खेळाडू यान डायोमांडेच्या उत्कृष्ट कामगिरीनंतर निकोलस पेपेने पहिल्या हाफमध्ये संघाचे खाते उघडले. त्यानंतर दुसऱ्या हाफच्या मध्यावर पेपेने संघाचा विजय निश्चित केला. या विजयामुळे आयव्हरी कोस्टने 'गट ई' मध्ये उपविजेते म्हणून पुढील फेरी गाठली. ◂ (वृत्तसंस्था)



# तुर्कीकडून अखेरच्या क्षणी अमेरिकेचा पराभव

### आता लक्ष बोस्नियाविरुद्धच्या सामन्याकडे



विश्वचषक गट 'डी' फुटबॉल सामन्यादरम्यान चेंडूसाठी संघर्ष करताना अमेरिकेचा जिओव्हानी रेना (७) आणि तुर्कीचा ओरकुन कोक्चू (६)

**लॉस एंजेलिस, २६ जून**

अमेरिकेच्या पुरुष राष्ट्रीय संघाने या उन्हाळ्यात आधीच इतिहास रचला आहे. त्यांनी फिफा विश्वचषकाच्या एका सामन्यात सर्वाधिक गोल केले, आधुनिक युगात पहिल्यांदाच स्पर्धेत सलग दोन सामने जिंकले आणि अटीतटीच्या 'गट डी' मध्ये एक सामना शिल्लक असतानाच अव्वल स्थान निश्चित केले.

मात्र तुर्कीविरुद्धच्या सामन्यात अमेरिकेचा संघ मोक्याच्या व निर्णायक क्षणी डगमगला. अशा निर्णायक क्षणी बाद फेरीतील सामन्यांचे निकाल ठरतात आणि तिथेच अमेरिकाचा संघ डगमगला. सामन्याच्या अगदी शेवटच्या किकवर कान आयहानने केलेल्या गोलमुळे तुर्कीने ३-२ असा विजय मिळवला . या पराभवानंतरही अमेरिका संघाने अंतिम ३२ संघांच्या फेरीत स्थान मिळविले. बाद फेरीत त्यांचा सामना बोस्निया आणि हर्झेगोव्हिनाशी होणार आहे लॉस एंजेलिस स्टेडियमवर ७०,४९२ प्रेक्षकांच्या उपस्थितीत, अमेरिकन संघाचे काम सुरुवातीला इतके कठीण वाटत नव्हते. पॅराग्वे आणि ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या सामन्यांप्रमाणेच, अमेरिकेने सुरुवातीलाच आघाडी घेतली; यावेळी बचावपटू ऑस्टन ट्रस्टीने आश्चर्यकारक फटका मारून गोल केला. परंतु, नंतरच्या सत्रात निर्णायक क्षणी अमेरिकेची बचावफळी दबावाखाली कोलमडली आणि त्यांनी अर्दा गुलेर (१० व्या मिनिटाला) व ओरकुन कोक्चू (३१ व्या मिनिटाला) यांच्याकडून दोन गोल स्वीकारले. या स्पर्धेत अमेरिकेवर पिछाडीवर पडण्याची ही पहिलीच वेळ होती.

तरीही, अखेरीस त्यांनी जोरदार पुनरागमन केले. मध्यंतरानंतर लगेचच सेबॅस्टियन बेरहाल्टरने उत्कृष्ट 'व्हॉली' मारून सामना बरोबरीत आणला. अमेरिकेला आणखी काही संधी मिळाल्या होत्या ज्यातून सामन्याचा निकाल बदलू शकला असता.

# इक्वेडोरकडून जर्मनीचा पराभव



**न्यू जर्सी, २६ जून**

फिफा २०२६ विश्वचषक स्पर्धेत 'गट ई'च्या साखळी सामन्यात इक्वेडोरने जर्मनीवर २-१ अशा गोलफरकाने रोमांचक विजय नोंदविला.

अत्यंत चुरशीच्या सत्रात, लेरॉय सानेने सुरुवातीला गोल करून आघाडी मिळवून दिली, परंतु निल्सन अंगुलोने गोल करत ती बरोबरी साधली. त्यानंतर ७७ व्या मिनिटाला निर्णायक गोल करत गोन्झालो प्लाटा इक्वेडोर संघाचा तारणहार ठरला. या विजयामुळे इक्वेडोर 'गट ई' मध्ये तिसऱ्या स्थानावर असला, तरी त्यांची 'अंतिम ३२' संघांच्या फेरीमधील आगेकूच निश्चित झाली आहे. गटातील दुसऱ्या सामन्यात आयव्हरी कोस्टने कुरासाओचा २-० असा पराभव केला आणि जर्मनीच्या मागे राहून दुसरे स्थान मिळविले. ◂ (वृत्तसंस्था)

# ट्युनिशियावर विजय, नेदरलँड्स 'अंतिम ३२'मध्ये

**कॅन्सस सिटी, २६ जून**

नेदरलँड्स संघाने ट्युनिशियावर ३-१ अशा गोलने रोमहर्षक विजय नोंदवून फिफा विश्वचषकाच्या 'अंतिम ३२'मध्ये आपले स्थान निश्चित केले.

'ऑरेंज' संघाची बस आता वेगाने मार्गस्थ झाली पाहिजे. ट्युनिशियाविरुद्धच्या सामन्यात स्पर्धेतील विक्रमाशी बरोबरी करणाऱ्या १२ व्या 'आत्मघाती गोल'ची (स्वतःच्याच गोलपोस्टमध्ये केलेला गोल) मदत झाली, तसेच ब्रायन ब्रॉबी आणि जॅन पॉल व्हॅन हेकेने केलेल्या गोलमुळे नेदरलँड्सने जपानला मागे टाकत 'गट एफ'मध्ये अव्वल स्थान निश्चित केले.

या विजयाचे बक्षीस म्हणजे 'अंतिम-३२' फेरीत ब्राझीलविरुद्धचा सामना टाळता येणे; त्याऐवजी रोनाल्ड कोमन यांचा संघ आता मॉन्टेरी येथे मोरोक्कोविरुद्धच्या एका रोमांचक लढतीसाठी सज्ज झाला आहे. दक्षिण टेक्सासमध्ये जवळपास एक महिन्यापूर्वी दाखल झालेली आणि डॅलस, ह्युस्टन व कॅन्सस सिटी येथील सामन्यांना हजेरी लावणारी ही विशेष 'डबल-डेकर' बस आता उत्तर मेक्सिकोमधील सोमवारच्या सामन्यापूर्वी १,००० मैलांहून अधिकचा प्रवास करणार आहे. ◂ (वृत्तसंस्था)



## अल्पवयीन मुलीला दिली धमकी; तरुणावर पोस्कोचा गुन्हा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ जून-**

पाठलाग करून एका १७ वर्षीय अल्पवयीन मुलीला जीवे मारण्याची धमकी देणाऱ्या एका तरुणावर विजापूर नाका पोलीस ठाण्यात पोस्को अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वसीम शेख (रा. कुमठे, ता. उत्तर सोलापूर) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. यातील आरोपीने सदर अल्पवयीन मुलीला वारंवार फोन करून आणि बोलण्याचा प्रयत्न करून त्रास दिला. या प्रकाराकडे मुलीने दुर्लक्ष करून त्याला विरोध दर्शवला असतानाही आरोपीने तिचा पाठलाग करणे सुरूच ठेवले. इतकेच नाही तर, आरोपीने स्नॅपचॅट आयडीवरून पीडित मुलीला वारंवार मेसेज केले. ''तुला आता असं नाही समजणार, बघ आता उद्या कसं समजावतो, तुला नक्की समजेल, तुझे घर कसं बरबाद करतो, माझं नाव न ऐकलं तरी तुझा जीव मारून टाकावे असे वाटते,'' अशी धमकी आरोपीने पीडित मुलीला दिल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.



## विनर्स फाउंडेशनच्या शर्विल व विनायकला राष्ट्रीय स्केटिंग स्पर्धेत रौप्य पदक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ जून-**

रोलर स्केटिंग फेडरेशन ऑफ इंडियाच्या वतीने आयोजित ऑल इंडिया ओपन राष्ट्रीय चॅम्पियनशिपमध्ये येथील विनर्स फाउंडेशन स्केटिंग क्लबच्या शर्विल संतोष माळवदकर आणि विनायक सुनील हुचे यांनी रौप्य पदकांची कमाई केली.

कोलकाता (पश्चिम बंगाल) येथे झालेल्या राष्ट्रीय स्पर्धेत शर्विल याने १००० मीटर आणि १ लॅप अशा दोन्ही प्रकारांत अप्रतिम कामगिरी करत दोन रौप्य पदके पटकावली. या यशासह स्केटिंग प्रकारात सोलापुरचा पहिला नॅशनल मेडलिस्ट खेळाडू ठरण्याचा मान शर्विलने मिळवला आहे. रांची (झारखंड) येथे झालेल्या राष्ट्रीय स्पर्धेत स्केटर विनायक याने १००० मीटर रेसमध्ये वैयक्तिक चमक दाखवत रौप्य पदक आपल्या नावावर केले.

या यशाबद्दल दोन्ही खेळाडूंचा जिल्हा क्रीडा अधिकारी प्रकाश मोहारे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी जिल्हा कार्यकारी क्रीडा अधिकारी दत्ता वरकड, क्रीडा अधिकारी नदीम शेख उपस्थित होते. या दोन्ही खेळाडूंना सम्येक मोहोळकर यांचे मार्गदर्शक म्हणून लाभले असून क्लबचे मुख्य प्रशिक्षक सागर राठोड यांनी खेळाडूंची तयारी करून घेतली आहे.

## काँग्रेस कमिटीचे आजपासून तीन दिवस एसआयआर प्रशिक्षण शिबिर

**सोलापूर, दि. २६ जून-**

शहर व जिल्हा (पुर्व) काँग्रेस कमिटीच्या वतीने सोलापूर लोकसभा मतदारसंघातील सर्व विधानसभा म तदार संघात मतदार यादी पुनरीक्षण कार्यक्रम २७ ते २९ जूनपर्यंत हाती घेण्यात आला आहे. त्या संदर्भात संपूर्ण लोकसभा मतदारसंघातील बीएलए१ व बीएलए२ यांच्या प्रशिक्षणाचे आयोजन केल्याची माहिती सोलापूर शहर काँग्रेसचे अध्यक्ष चेतन नरोटे व सोलापूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे जिल्हाध्यक्ष सातलिंग शटगार यांनी दिली. या शिबिराचे उद्घाटन शनिवार २७ जून रोजी सकाळी ११ काँग्रेस भवन येथे खासदार प्रणितीताई शिंदे यांच्या हस्ते होईल. या शिबिरासाठी तज्ञ मार्गदर्शक खासदार प्रणितीताई शिंदे, प्रदेशच्या डॉ.स्मिता शहापूरकर, रोहिणी धोत्रे मार्गदर्शन करणार आहेत. हे शिबिर पूर्णतः बुथ लेवल एजंट व प्रमुख कार्यकर्त्यासाठी असणार आहे. शिबीरास येताना दोन फोटो व मतदान ओळख पत्राच्या दोन झेरॉक्स प्रती घेऊन यावेत असे आवाहन शहर व जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने करण्यात आले आहे.

**शिबिराचा कार्यक्रम असा**

शनिवार २७ जून : सकाळी १० ते ११ : नाव नोंदणी, साहित्य (किट) वाटप. दुपारी ३ ते ५ : अक्कलकोट विधानसभा मतदारसंघ. रविवार २८ जून : सकाळी ११ते १ वाजता मोहोळ विधानसभा मतदारसंघ हॉटेल लोकसेवा मोहोळ.दुपारी ३ ते ५ : काँग्रेस भवन सोलापूर शहर मध्य व शहर उत्तर विधानसभा मतदारसंघ. सोमवार २९ : सकाळी ११ ते १ : पंढरपूर. ३ ते ५ या हॉटेल सुगरण,पंढरपूर रोड,मंगळवेढा.

## पृथ्वीराज (भैय्या) माने
### तरुणाईचा विश्वास, विकासाचा ध्यास

उत्तर सोलापूर तालुक्यातील कोंडी गटाचे जिल्हा परिषद सदस्य म्हणून प्रथमच निवडणुकीत उभारल्यानंतर जिंकून आलेले, तालुक्याच्या विकासासाठी सातत्याने प्रयत्न करणारे मा.श्री.पृथ्वीराज (भैय्या) दिलीपराव माने (मालक) यांनी आपल्या कार्यकाळात विकासाभिमुख नेतृत्वाची वेगळी छाप पाडली आहे. आपल्या मतदारसंघासह सोलापूर जिल्ह्यातील जनतेच्या प्रश्नांना प्राधान्य देत त्यांनी रस्ते, पाणीपुरवठा, शिक्षण, आरोग्य, ग्रामविकास आणि मूलभूत सुविधांच्या उभारणीसाठी सातत्याने पाठपुरावा केला आहे.

कोंडी गटासह जिल्ह्यातील ग्रामीण भागातील रस्त्यांची कामे, अंतर्गत मार्गांचे डांबरीकरण, पिण्याच्या पाण्याच्या योजनांना गती, शाळांमधील आवश्यक सुविधा, अंगणवाडी इमारती, समाजमंदिरे यांसह विविध विकासकाम ांसाठी निधी उपलब्ध करुन देण्यात त्यांनी पुढाकार घेतला.



जिल्हा परिषद आणि राज्य शासनाच्या विविध योजनांचा लाभ गावागावांपर्यंत पोहोचविण्यासाठी त्यांनी प्रशासनाशी सातत्याने समन्वय साधला.

आरोग्य केंद्राच्या माध्यमातून नागरिकांना दिल्या जाणाऱ्या आरोग्यसेवा याची वेळोवेळी माहिती घेतली. ज्या-ज्या आरोग्य केंद्रांमध्ये औषधांसह कर्मचाऱ्यांची कमतरता असेल ते-ते जिल्हा प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिले. जिल्हा परिषदेच्या पहिल्या सर्वसाधारण सभेत त्यांनी आरोग्य, शैक्षणिक सामाजिक आणि झेडपीच्या उत्पन्न वाढीसाठी अनेक मुद्दे उपस्थित केले.

युवक, महिला, शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांवर त्यांनी नेहमीच सकारात्मक भूमिका घेतली. विविध शासकीय योजनांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविणे, पात्र लाभार्थ्यांना योजनांचा लाभ मिळवून देणे आणि विकासकाम ांच्या अंमलबजावणीवर नियमित लक्ष ठेवणे, ही त्यांच्या कार्यपध्दतीची वैशिष्ट्ये राहिली आहेत.

जिल्हा परिषदेत विविध विषयांवर अभ्यासपूर्ण मांडणी करत त्यांनी उत्तर सोलापूर तालुक्याच्या प्रश्नांना प्रभावीपणे वाचा फोडली. गावांच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक निधी मंजूर करून घेण्यासाठीही सातत्याने पाठपुरावा केला. अनेक विकासकामे मार्गी लावून ग्रामीण भागातील नागरिकांना दिलासा मिळवून दिला.

सामाजिक उपक्रमांमध्येही त्यांचा सक्रिय सहभाग राहिला आहे. शैक्षणिक, आरोग्यविषयक, क्रीडा आणि सांस्कृतिक कार्यक्रम ांना प्रोत्साहन दिले. युवकांना सामाजिक कार्यात सहभागी करुन घेत विकास प्रक्रियेत त्यांची भूमिका अधिक सक्षम करण्याचा प्रयत्न केला आहे. विकासाचा ध्यास, जनतेशी कायम संवाद आणि सर्वसामान्यांच्या हितासाठी सातत्याने काम करण्याची भूमिका यामुळे पृथ्वीराज (भैय्या) माने यांनी उत्तर सोलापूरच्या राजकीय आणि सामाजिक क्षेत्रात विश्वासार्ह नेतृत्व म्हणून आपली ओळख निर्माण केली आहे. आगामी काळातही विकासकाम ांना अधिक गती देत जनतेच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी ते कटिबध्द असल्याचा विश्वास त्यांच्या कार्यकर्त्यांसह नागरिक व्यक्त करत आहेत. आज त्यांचा वाढदिवस; त्यानिमित्त मन:पूर्वक शुभेच्छा.

# खाडिलकर संघाचा चंदू पवार संघावर शानदार विजय

### लिटिल चॅम्प १२ वर्षाखालील क्रिकेट स्पर्धा : मीत गुडगुंटी सामन्याचा मानकरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ जून-**

लिटिल चॅम्प १२ वर्षाखालील क्रिकेट स्पर्धेत अटीतटीच्या लढतीत चंदू खाडिलकर संघाने ३ गडी राखून बाजी मारली.

जुळे सोलापूर येथील भंडारी मैदानावर झालेल्या सामन्यात चंदू खाडिलकर इलेव्हनने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला, जो त्यांच्या गोलंदाजांनी योग्य ठरवला. चंदू पवार इलेव्हनचा डाव २९.१ षटकांत अवघ्या १०५ धावांवर आटोपला. पवार इलेव्हनकडून चिराग आणि सुरज मोरे यांनी प्रत्येकी २६ धावांची खेळी करत संघाला शंभरी पार करून दिली. अवनीक लकडे आणि निहाल साका यांनी प्रत्येकी १० धावांचे योगदान दिले.



चंदू खाडिलकर इलेव्हनच्या गोलंदाजांनी शिस्तबद्ध मारा केला. श्रीतिका देशमुख, सोमेश लोखंडे, आरव शहा आणि मीत गुडगुंटी यांनी प्रत्येकी २ बळी घेत विरोधी संघाला खिंडार पाडले, तर मल्हार आणि साईविराज देशेटी यांनी प्रत्येकी १ बळी घेत त्यांना चांगली साथ दिली.

१०६ धावांचे आव्हान घेऊन मैदानात उतरलेल्या चंदू खाडिलकर इलेव्हनची सुरुवातही सोपी नव्हती. चंदू पवार इलेव्हनच्या गोलंदाजांनी अचूक मारा करत सामन्यात रंगत आणली. शिवम कोगनुरे, निहाल साका, अवनीक लकडे आणि स्वरूप पवार यांनी प्रत्येकी १ बळी घेत खाडिलकर इलेव्हनच्या ६ फलंदाजांना तंबूत पाठवले होते. साम न्याचा टर्निंग पॉईंट ठरला तो म्हणजे, जेव्हा संघ अडचणीत होता, तेव्हा मीत गुडगुंटीने संयमी आणि आक्रमक फलंदाजीचे प्रदर्शन केले. त्याने नाबाद ३६ धावांची झुंजार खेळी करत साम ना चंदू पवार इलेव्हनच्या हातातून हिसकावून घेतला. त्याला हर्षवर्धन काळे (१४ धावा) आणि साईविराज देशेटी (१२ धावा) यांची मोलाची साथ लाभली. अखेर २४ व्या षटकात चंदू खाडिलकर इलेव्हनने ६ बाद १०७ धावा करत सामना ३ विकेट्सने आपल्या नावावर केला. गोलंदाजीत २ महत्त्वाचे बळी आणि फलंदाजीत नाबाद ३६ धावांची मॅच-विनिंग खेळी करणाऱ्या मीत गुडगुंटीला सामन्याचा सर्वोत्कृष्ट खेळाडू म्हणून घोषित करण्यात आले. पंच म्हणून चंदू मंजिली आणि अशोक डोंबावळे यांनी काम पाहिले. प्रथमेश देगावकर यांनी गुणलेखन केले.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## राजर्षी शाहू महाराज जयंती



### वसुंधरा महाविद्यालय

सर्व माणसे सारखी आहेत, त्यामुळे सर्वांना जगण्याचा समान अधिकार असायला हवा म्हणून वंचित, उपेक्षित घटकांना सामाजिक न्यायाच्या कक्षेत आणून लोकराजा राजर्षी छ. शाहू महाराजांनी सामाजिक न्यायाचे लोकशाहीकरण केले असे मत वसुंधरा महाविद्यालयातील प्राचार्य डॉ. दिगंबर झोंबाडे यांनी व्यक्त केले. ते राजर्षी शाहू महाराजांच्या जयंतीनिमित्त बोलत होते. याप्रसंगी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.



### मनपा प्राथमिक शिक्षण मंडळ

नवी पेठ येथील महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळामध्ये राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळाचे मुख्य लिपिक मल्लिकार्जुन हिरेमठ यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी मनपा प्राथमिक शिक्षण मंडळाचे लेखापाल महेश वालावलकर, सारंग अंजीखाने, आबरा डोंगरी, तुकाराम भोसले, आनंद सायमन, भालचंद्र साखरे, विकास आमले, सागर मोठे आदी उपस्थित होते.



### वखारिया विद्यालय, बार्शी

वखारिया विद्यालय, उपळे दुमाला येथे लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. मुख्याध्यापक दयानंद रेवडकर व उपळे गावातील ग्रामस्थ सचिन नाईकवाडी, भावेश पौळ, संतोष शिंदे व फारुख तांबोळी यांच्या हस्ते राजर्षी शाहू महाराज व मामासाहेब जगदाळे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. त्यानंतर मुख्याध्यापक रेवडकर यांनी प्रमुख पाहुणे व मान्यवरांचे बुके देऊन स्वागत केले. त्यानंतर प्रशालेतील विद्यार्थ्यांनी शाहू महाराजांच्या जीवनकार्यावर आधारित भाषणे सादर करून त्यांना अभिवादन केले. विद्यार्थ्यांच्या भाषणानंतर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे सचिन नाईकवाडी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष दयानंद रेवडकर यांनी विद्यार्थ्यांना राजर्षी शाहू महाराज यांच्या शैक्षणिक, सामाजिक आणि लोककल्याणकारी धोरणांची माहिती देऊन त्यांच्या कार्याचा आदर्श जीवनात अंगीकारण्याचे आवाहन केले. सांस्कृतिक विभाग प्रमुख लंकेश्वर यांनी आभार मानले.

## चित्रकार जितेश मोरे यांची कलात्मक अनोखी आदरांजली



छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त सोलापूर येथील युवा चित्रकार जितेश मोरे यांनी अवघ्या चार तासांत कलर मार्करच्या माध्यमातून शाहू महाराजांचे आकर्षक डूडल आर्ट चित्र साकारून त्यांना अनोखी आदरांजली वाहिली आहे. डूडल आर्ट या आधुनिक कला प्रकारात रेखाटलेल्या या चित्रात हजारो सूक्ष्म वळणदार रेषा, विविध रंगछटा आणि कलात्मक स्पंदनांचा वापर करण्यात आला आहे. शाहू महाराजांच्या व्यक्तिमत्त्वातील तेज, सामाजिक समतेची भावना, मानवतावाद आणि बहुजन समाजाच्या उन्नतीसाठी त्यांनी केलेल्या कार्याचे प्रतिबिंब या चित्रातून उमटविण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.राजर्षी शाहू महाराजांच्या जयंतीनिमित्त साकारलेल्या या कलाकृतीचे सामाजिक, शैक्षणिक आणि कला क्षेत्रातील मान्यवरांकडून कौतुक होत आहे.

# टोळीकडून कारवर कोयत्याने हल्ला; दोघे जखमी

### ११ आरोपींना अटक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ जून-**

जुन्या भांडणाचा राग मनात धरुन ११ जणांच्या टोळीने एका कारवर कोयता आणि दगडांनी हल्ला केला. हल्ल्यात कारमधील तरुण आणि त्याचा मित्र गंभीर जखमी झाले आहेत. याप्रकरणी ११ जणांवर सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करुन अटकही केली आहे.

सात रस्ता परिसरातील बिग बझारसमोर गुरुवारी पहाटे ही घटना घडली. रियाज राजसाब नदाफ, नोमान कुडले, साहिल ऊर्फ सोनु गायकवाड, शोएब अजाज खान, रिहान रफिक शेख, सुयश रमेश जाधव, रितेश परशुराम गायकवाड, अरमान सिकंदर शेख, वैभव देवीदास गायकवाड, साहिल बाळराज गायकवाड, सिध्दार्थ दशरथ गायकवाड (सर्वजण रा.सोलापूर) अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत.





याप्रकरणी अथर्व जवळकोटे (वय-२०, रा.सोनामाता नगर, आरटीओ ऑफिस जवळ, सोलापूर) यांनी फिर्याद दिली. दि.२५ जून रोजी पहाटे १२:३० वाजण्याच्या सुमारास ते त्यांचे मित्र महादेव पडसलगी आणि हिंगमिरे यांच्यासोबत कारमधून सात रस्ता येथे चहा पिण्यासाठी आले होते. यावेळी जुन्या भांडणाचा राग मनात धरुन आलेल्या ११ जणांच्या टोळीने फिर्यादीच्या कारला चहूबाजूंनी घेरले आणि कोयत्याने कारच्या काचा फोडून नुकसान केले.

एका आरोपीने कारची चावी काढून घेतली, तर दुसऱ्याने अथर्व यांना कारबाहेर ओढत 'तुला खल्लास करतो, तुला लई मस्ती आली आहे', असे म्हणून कोयत्याने वार केला. हा वार कारच्या टपावर लागल्याने कोयता आडवा झाला. त्याच्या चपट्या बाजूचा मार अथर्व यांच्या खांद्यावर बसला. अथर्व खाली पडल्यानंतर सर्व आरोपी 'आता याला सोडायचे नाही, खल्लास करु' असे म्हणत जीवे मारण्याच्या उद्देशाने कोयता उगारुन अंगावर धावून आले.

तेव्हा, अथर्व यांचा मित्र पडसलगी याने धाडस दाखवून आरोपींना बाजूला ढकलले. यामुळे चिडलेल्या आरोपींनी फिर्यादीवर दगडफेक सुरु केली. या मारहाणीत अथर्व यांच्या तोंडावर, कपाळावर, दोन्ही हातांवर, बोटांवर व खांद्याला दुखापत झाली आहे. मित्र पडसलगी याच्या पाठीवर, कमरेवर आणि मांडीवर गंभीर मार लागले, असेही फिर्यादीत म्हटले आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक दिनेश कुलकर्णी हे या प्रकरणाचा तपास करत आहेत.

# विष्णुपंत कुलकर्णींचे समाजकार्य उल्लेखनीय : डॉ. इनामदार

**तभा वृत्तसेवा,**
**माळशिरस, दि. २६ जून -**

विष्णुपंत कुलकर्णी यांनी केलेले समाजकार्य उल्लेखनीय आहे. त्यांच्यामुळे सर्व संस्थाचे रुपांतर वटवृक्षात झाल्याचे प्रतिपादन हृदयरोगतज्ञ डॉ. एम.के. इनामदार यांनी केले.



माळशिरसमधील विविध संस्थांचे मार्गदर्शक विष्णुपंत कुलकर्णी तथा अण्णा काका यांच्या १५ व्या पुण्यतिथीनिमित्त गोपाळराव देव प्रशालेत रक्तदान, वृक्षारोपण आणि मोफत आरोग्य शिबिर झाले. त्याच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी, श्री हनुमान शिक्षण प्रसारक संस्थेचे कार्याध्यक्ष मिलिंद कुलकर्णी, नगराध्यक्ष रघुनाथ चव्हाण, कार्यवाहक रामचंद्र दोशी, सहकार्यवाह राजाराम ढाले, संचालक संतोष कुलकर्णी, सुभाष शिंदे, धनंजय मस्के, नंदकुमार घाडगे, एम.पी. कुलकर्णी, डॉ. सुभाष देशमाने, डॉ. सुधीर दोशी, महादेव देशमुख, प्रवीण बंडेवार, ॲड. आप्पासाहेब वाघमोडे, विश्वास महामुनी आदी मान्यवर उपस्थित होते. रक्तदान शिबिरात १०९ जणांनी रक्तदान केले. तसेच समीर गांधी कला महाविद्यालयात वृक्षारोपण झाले. वैद्य महेश कुलकर्णी व वरूण कुलकर्णी यांनी ९४ रुग्णांची मोफत आयुर्वेद चिकित्सा केली. डॉ. किशोर बागडे यांनी ४१ रुग्णांची मोफत कान व श्रवणदोष तपासणी केली. डॉ.अशोक बागनवर यांनी ४१ रुग्णांची दंतचिकित्सा केली. विद्यार्थ्यांना शालेय दाखल्याचे वाटप झाले.

गोपाळराव देव प्रशालेचे मुख्याध्यापक सुर्यकांत जानकर, समीर गांधी कला महाविद्यालयाचे प्रा. देविदास गेजगे, इंग्लिश मीडियमच्या प्रा. अपर्णा इनामदार व मारुतीनाना कुलकर्णी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका कांता कांबळे व समन्वयक राहुल राजमाने यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व शिक्षक व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. आभार प्रदर्शन काटकर यांनी केले.

# दत्तकला इन्स्टिट्यूशन्सच्या डिप्लोमा डिग्री अभियांत्रिकीच्या प्रवेश क्षमतेत वाढ

**जेऊर दि.२६ जून-**

दत्तकला ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन्सच्या डिप्लोमा व डिग्री इंजिनिअरिंगच्या विविध शाखांच्या प्रवेश क्षमतेत वाढ करण्यात आली आहे. या वाढीस अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र शासन, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ तसेच महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ यांची मान्यता प्राप्त झाली आहे.याशिवाय संस्थेमार्फत राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिषदांचे आयोजन, प्रोजेक्ट कॉन्फरन्स, विविध कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम, उद्योगाभिमुख उपक्रम, कॅम्पस प्लेसमेंट, स्टार्टअप व इनोव्हेशन उपक्रम यशस्वीपणे राबविले आहेत.



संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. रामदास झोळ यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाचे तांत्रिक शिक्षण उपलब्ध करून देण्याचे कार्य सातत्याने सुरू आहे.

### पत्नीकडून पतीला मारहाण

**सोलापूर, दि. २६ जून-**

घरगुती भांडणाच्या कारणावरून एका पत्नीने आपल्या पतीला लोखंडी सळई व कळशीने मारहाण केल्याची घटना भैय्या चौक येथे गुरुवारी घडली. नौशाद इलाही पटेल (वय ४१, रा. बुबणे चाळ, भैया चौक, सोलापूर) असे पतीचे नाव आहे. घरगुती भांडणाच्या कारणावरून त्यांना त्यांची पत्नी रेशमा हिने मारहाण केली. यात मार लागल्याने ते स्वतः उपचारासाठी येथील शासकीय रुग्णालयात रात्री नऊ वाजता दाखल झाले.

### मल्लव्वा पोगुल यांचे निधन

**सोलापूर दि. २६ जून**



भवानी पेठ येथील रहिवासी मल्लव्वा राजया पोगुल यांचे शुक्रवार दि. २६ जून रोजी सकाळी १० वाजता निधन झाले. मृत्यूसमयी त्या ९२ वर्षांच्या होत्या. त्यांच्या पश्चात ६ मुली, २ मुले, नातवंडे असा परिवार आहे. त्यांची अंत्ययात्रा शनिवार दिनांक २७ जून रोजी सकाळी १० वाजता राहत्या घरातून निघणार आहे.

# एमआयटी शाळेत विद्यार्थी परिषद पदग्रहण सोहळा





**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २६ जून-**

एमआयटी शाळेत शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी नव्याने निवडून आलेल्या विद्यार्थी परिषदेचा पदग्रहण सोहळा संपन्न झाला. विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण, जबाबदारीची जाणीव आणि संघभावना रुजविणाऱ्या या सोहळ्याला बार्शी ग्रामीण पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक महेश माने प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. शाळेच्या मुख्याध्यापिका रेखा पाटील यांनी त्यांचे स्वागत केले. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व सरस्वती पूजनाने झाली. यानंतर शाळेचे मुख्य विद्यार्थी प्रतिनिधी अमित नरवडे, मुख्य विद्यार्थिनी प्रतिनिधी जान्हवी राऊत, क्रीडा प्रमुख स्वराज माने तसेच प्रज्ञा, विपुला, दक्षा आणि प्रेरणा या गटांचे विद्यार्थी प्रतिनिधी यांना पदचिन्हे आणि सॅश प्रदान करुन नेतृत्वाची जबाबदारी सोपविण्यात आली.

मुख्याध्यापिका रेखा पाटील यांनी सर्व विद्यार्थी प्रतिनिधींना शपथ देत शाळेच्या मूल्यांप्रती निष्ठा, प्रामाणिकपणा, शिस्त आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण हितासाठी कार्य करण्याची प्रतिज्ञा दिली. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या शिस्तबद्ध मार्चपास्टने उपस्थितांची दाद मिळवली तर इयत्ता सहावीच्या विद्यार्थ्यांनी नेतृत्व या संकल्पनेवर आधारित सादर केलेल्या आकर्षक नृत्याविष्काराने कार्यक्रमात रंगत आणली. प्रमुख पाहुणे पोलिस उपनिरीक्षक महेश माने यांनी आपल्या प्रेरणादायी मार्गदर्शनात संघभावना, शिस्त, सामाजिक उत्तरदायित्व आणि प्रभावी नेतृत्व ही यशस्वी आयुष्याची मूलभूत तत्त्वे असल्याचे सांगत विद्यार्थ्यांना कर्तव्यनिष्ठ व संवेदनशील नागरिक बनण्याचे आवाहन केले.


### खरेदीपुर्व जाहिर नोटीस

तमाम लोकांना विशेषतः पंढरपूर शहर व तालुक्यातील लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे ओझेवाडी, ता. पंढरपूर येथील गट नं. २१५ क्षेत्र २ हे. ८९ आर, पो.ख. ० हे. ०२ आर, आकार ६ रू. ५० पैसे यापैकी सुरेखा राजेंद्र कवडे यांचे मालकीची संपूर्ण शेतजमीन क्षेत्र ० हे. ७३ आर, पो.ख. ० हे. ०२ आर, आकार १ रू. ६४ पैसे येणेप्रमाण वर्णनाची शेतजमीन व आतील इतर तदंगभुत वस्तु व हक्कासह.वर नमूद केलेली शेतजमीन ही सुरेखा राजेंद्र कवडे यांचे स्वतंत्र मालकी वहिवाटीची आहे. तशा नोंदी वर नमूद शेतजमीनीच्या ७/१२ पत्रकी व इतरसरकार दप्तरी झालेल्या आहेत. वर नमूद जागा मालक सुरेखा राजेंद्र कवडे यांनीवर नमूद केलेली त्यांचे मालकीची संपूर्ण शेतजमीन आमचे अशिलांना खरेदी देण्याचे ठरवून आमचे अशिलाकडून इसार रक्कम घेतलेली आहे व सदरची शेतजमीन निर्वेध, निजोखमी असल्याबाबत व शेतजमीनीवर कोणाचाही कसलाही वारसा हक्क, हितसंबंध नाही तसेच सदर शेतजमीनीचा कोणताही भाग ग्रामपंचायतीने संपादीत केलेला नाही. अशी खात्री व भरवसा सदर विद्यमान मालकाने आमचे अशिलास दिल्यानंतर सदर शेतजमीनीचे खरेदीखत करणेचे आमचे अशिलांनी ठरविले आहे. तरी सदर शेतजमीनीबाबत अन्य कोणाचे गहाण, दान, लिन, लिज,साठेखत, खरेदीखत, मुदत खरेदी, बक्षीसपत्र, मृत्युपत्र, फेडपत्र, हक्कसोडपत्र, करार-मदार, कोर्ट मॅटर, इजमेंट, वाटप, वारसा हिस्सा, बँक लोन, ॲटेचमेंट, जप्ती, पोटगी, चोळी बांगडी, कुळ, भाडेपट्टा, लायसेन्सी, दावा इ. स्वरूपाचा तसेच अन्य कोणत्याही स्वरूपाचा हक्क अधिकार असल्यास संबंधितांनी ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ (सात) दिवसाचे आत खालील पत्यावर पुराव्यानिशीहरकत घ्यावी. मुदतीत कोणाचीही काहीही कसलाही हरकत न असल्यास सदर मिळकत निर्वेध, निजोखमी, बोजाविरहित असल्याचे प्रामाणिकपणे ग्रहित धरून आमचे अशिल सदरचा खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील. मागाहून कोणाची कसलीही तकार चालणार नाही. म्हणून ही जाहिर नोटीस असे.ही जाहीर नोटीस दिली ता. २६/०६/२०२६

सही/-
**ॲड. विनायक विलास डंके**
**बी.ए., एलएल.बी.**
**बंकटं स्वामी मठासमोर,**
**प्रदक्षिणा रोड, पंढरपूर जि. सोलापूर,**
**मो.नं. ९२८४८०३८३८**

### प्राजक्ता नागरी सहकारी पतसंस्था मर्या., सोलापूर.

८/९, पद्मशाली भवन, रविवार पेठ, सोलापूर.

*** वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना ***
(फक्त सभासदांसाठी)

**प्राजक्ता नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित सोलापूर या संस्थेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, आपल्या पतसंस्थेची २५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार दि. ११/०७/२०२६ रोजी सकाळी १०.०० वाजता. ८/९, पद्मशाली भवन, रविवार पेठ, सोलापूर येथे बोलविण्यात आलेली आहे. तरी सर्व सभासदांनी सदरहू सभेस उपस्थित राहून सहकार्य करावे, ही विनंती.**

*** सभेपुढील विषय ***

**सभेपुढील विषय नोटिस बोर्डवर लावण्यात आलेले आहेत.**

स्थळ : सोलापूर,
दिनांक : २४/०६/२०२६

विशेष सूचना :-

मा.संचालक मंडळाच्या आज्ञेवरुन
सचिव

१. गणपूर्तीच्या (क़ोरम) अभावी सभा तहकूब झाल्यास ती सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर घेण्यात येईल मात्र त्यावेळेस कोरमची आवश्यकता भासणार नाही.

### महावितरण — ई-निविदा सूचना

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

ई निविदा महावितरण सोलापूर मंडला कार्यालयाअंतर्गत खराब झालेल्या वितरण पेटी (Distribution Boxes) देखभाल व दूरूस्ती करण्याकरीता नोंदणीकृत व अनुभवी ठेकेदाराकडून ई-निविदा मागवण्यात येत आहे. ई- टेंडर क्र. अअ / सोमंका/टी-०२ / २०२६-२७ ( निविदा रक्कम रू ५४.०० लाख, निविदा विक्री दि. २६.०६.२०२६ ते दि. ०६.०७.२०२६ निविदा सादर करण्याची अंतिम तारीख ०६.०७.२०२६ रोजी १४.०० वाजेपर्यंत, इतर सर्व माहिती https://etender.mahadiscom.in/eatApp या संकेतस्थळावर उपलब्ध आहे . निम्नस्वाक्षरी धारकाकडे कोणतेही कारण न देता निविदा रद्द करणेबाबत अधिकार राखून ठेवले आहेत.

**PRO No- PRO/BMTZ/58/2026-27**

**अधिक्षक अभियंता, सोलापूर मंडल कार्यालय, सोलापूर**

### जाहीर समन्स

आरटी.एस. अपील नं. १४२/२०२५.
संगणक क्र. २१२/२०२५
पु.ने.ता. २९/०७/२०२६

**सोलापूर येथील मे. उपविभागीय अधिकारी क्र. १ सोलापूर साहेब यांचे न्यायालयात**

**श्री. अमोल गोरख जाधव, वगैरे - अपेलंट**
विरुध्द
**श्रीमती सुवर्णा वसंत पाटील, वगैरे - रिस्पॉडंट**

ज्याअथी, अपेलंटने रिस्पाँडंट विरुध्द सोलापूर येथील मे. उविभागीय अधिकारी क्रं. १ यांचे कोर्टात प्रस्तुतचे अपील दाखल केलेले आहे. सदर अपीलामध्ये मौजे पानगाव, ता. बार्शी येथील गट नं. १०८ बाबत तहसिलदार बार्शी यांचेकडील आदेश क्र. दरखास्त/एसआर/१०/२०२३ अन्वये पारीत केलेला आदेश रद्द होवून मिळणेकरीता सदरचे अपील दाखल केलेले आहे. प्रकरणी यातील रिस्पॉडंट नं. ७) श्रीमती सुवर्णा प्रमोद भगत, रा. रुम नं. ८ फ्लोअर नं. १, अभिषेक बी हौसिंग सोसायटी, सुवासिनी मंगल कार्यालयाजवळ, वडगाव बु. शहर, पुणे ४११०४३ व रिस्पॉइंट नं. ८ श्रीमती वनमाला मनोहर कोळी, रा. उपळाई रोड, गोंदील प्लॉट, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर यांना त्यांचे नमूद पत्त्यावर समन्स काढून त्याची बजावणी होत नाही. आपला सदर पत्त्यावर रिस्पाँडंट नं. ७ व ८ यांचा आढळ होत नाही मिळून येत नाही, तरी रिस्पॉउंट नं. ७ व ८ याच्या तर्फे कोणी कायदेशीर वारस असतील तर त्यांनी याकामी हजर होवून हे समन्स प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत सदर प्रकरणी आपले प्रतिनिधी अथवा स्वतः जातीने हजर राहून आपले म्हणणे हरकती दाखल कराव्यात.

वरील प्रमाणे आपण अर्जात हजर न झाल्यास अपेलंटच्या अपीलातील मागणीप्रमाणे रिस्पॉडंट नं. ७ व ८ यांचे विरुध्द एकतर्फा सुनावणी होईल. कळावे याची नोंद घ्यावी. हे जाहीर समन्स मे. न्यायालयाच्या सही व शिक्क्यानिशी दिले असे. दि. २५/०६/२०२६

सही/-
लिपीक
मे. उपविभागीय अधिकारी
क्र. १ सोलापूर

कोर्टाचा शिक्का

सही/-
उपविभागीय अधिकारी
सोलापूर क्र. १, सोलापूर

### जाहीर समन्स

आरटी.एस. अपील नं. १४१/२०२५.
संगणक क्र. २११/२०२५
पु.ने.ता. २९/०७/२०२६

**सोलापूर येथील मे. उपविभागीय अधिकारी क्र. १ सोलापूर साहेब यांचे न्यायालयात**

**श्री. दगडू केरु मोरे - अपेलंट**
विरुध्द
**श्रीमती सुवर्णा वसंत पाटील, वगैरे - रिस्पॉडंट**

ज्याअर्थी, अपेलंटने रिस्पाँडंट विरुध्द सोलापूर येथील मे. उपविभागीय अधिकारी क्रं. १ यांचे कोर्टात प्रस्तुतचे अपील दाखल केलेले आहे. सदर अपीलामध्ये मौजे पानगाव ता. बार्शी येथील गट नं. १०८ बाबत तहसिलदार बार्शी यांचेकडील आदेश क्र. दरखास्त/एसआर/१०/२०२३ अन्वये पारीत केलेला आदेश रद्द होवून मिळणेकरीता सदरचे अपील दाखल केलेले आहे. प्रकरणी यातील रिस्पॉउंट नं. ७) श्रीमती सुवर्णा प्रमोद भगत, रा. रुम नं. ८ फ्लोअर नं. १, अभिषेक बी हौसिंग सोसायटी, सुवासिनी मंगल कार्यालयाजवळ, वडगाव बु. शहर, पुणे ४११०४३ व रिस्पाँडंट नं. ८ श्रीमती वनमाला मनोहर कोळी, रा. उपळाई रोड, गोंदील प्लॉट, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर यांना त्यांचे नमूद पत्त्यावर समन्स काढून त्याची बजावणी होत नाही. आपला सदर पत्त्यावर रिस्पाँडंट नं. ७ व ८ यांचा आढळ होत नाही मिळून येत नाही, तरी रिस्पॉउंट नं. ७ व ८ याच्यातर्फे कोणी कायदेशीर वारस असतील तर त्यांनी याकामी हजर होवून हे समन्स प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत सदर प्रकरणी आपले प्रतिनिधी अथवा स्वतः जातीने हजर राहून आपले म्हणणे हरकती दाखल कराव्यात.

वरीलप्रमाणे आपण अर्जात हजर न झाल्यास अपेलंटच्या अपीलातील मागणीप्रमाणे रिस्पॉडंट नं. ७ व ८ यांचे विरुध्द एकतर्फी सुनावणी होईल. कळावे याची नोंद घ्यावी. हे जाहीर समन्स मे. न्यायालयाच्या सही व शिक्क्यानिशी दिले असे. दि. २५/०६/२०२६

सही/-
लिपीक
मे. उपविभागीय अधिकारी
क्र. १ सोलापूर

कोर्टाचा शिक्का

सही/-
उपविभागीय अधिकारी
सोलापूर क्र. १, सोलापूर

### जाहीर समन्स

आरटी.एस. अपील नं. ३४/२०२५.
संगणक क्र. २००/२०२५
पु.ने.ता. २९/०७/२०२६

**सोलापूर येथील मे. उपविभागीय अधिकारी क्र. १ सोलापूर साहेब यांचे न्यायालयात**

**श्रीमती सुवर्णा वसंत पाटील - अपेलंट**
विरुध्द
**अर्चना अतुल पाटील, वगैरे - रिस्पॉडंट**

ज्याअर्थी, अपेलंटने रिस्पाँडंट विरुध्द सोलापूर येथील मे. उपविभागीय अधिकारी क्रं. १ यांचे कोर्टात प्रस्तुतचे अपील दाखल केलेले आहे. सदर अपीलामध्ये मौजे पानगाव ता. बार्शी येथील गट नं. १०८ बाबत तहसिलदार बार्शी यांचेकडील आदेश क्रं. दरखास्त/एसआर/१०/२०२३ अन्वये पारीत केलेला आदेश रद्द होवून मिळणेकरीता सदरचे अपील दाखल केलेले आहे. प्रकरणी यातील रिस्पॉडंट नं. ६) श्रीमती सुवर्णा प्रमोद भगत, रा. रुम नं. ८ फ्लोअर नं. १, अभिषेक बी हौसिंग सोसायटी, सुवासिनी मंगल कार्यालयाजवळ, वडगाव बु. शहर, पुणे ४११०४३ व रिस्पॉडंट नं. ७ श्रीमती वनमाला मनोहर कोळी, रा. उपळाई रोड, गोंदील प्लॉट, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर यांना त्यांचे नमूद पत्त्यावर समन्स काढून त्याची बजावणी होत नाही. आपला सदर पत्त्यावर रिस्पॉडंट नं. ६ व ७ यांचा आढळ होत नाही मिळून येत नाही, तरी रिस्पॉडंट नं. ६ व ७ याच्या तर्फे कोणी कायदेशीर वारस असतील तर त्यांनी याकामी हजर होवून हे समन्स प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत सदर प्रकरणी आपले प्रतिनिधी अथवा स्वतः जातीने हजर राहून आपले म्हणणे हरकती दाखल कराव्यात.

वरील प्रमाणे आपण अर्जात हजर न झाल्यास अपेलंटच्या अपीलातील मागणीप्रमाणे रिस्पॉडंट नं. ६ व ७ यांचे विरुध्द एकतर्फा सुनावणी होईल. कळावे याची नोंद घ्यावी. हे जाहीर समन्स मे. न्यायालयाच्या सही व शिक्क्यानिशी दिले असे. दि. २५/०६/२०२६

सही/-
लिपीक
मे. उपविभागीय अधिकारी
क्र. १ सोलापूर

कोर्टाचा शिक्का

सही/-
उपविभागीय अधिकारी
सोलापूर क्र. १, सोलापूर

### जाहीर प्रसिध्दीकरण

दि.कि. अर्ज २१/२०२६
पुढील नेमली ता. २८/०७/२०२६ नि.५

**बार्शी येथील मे. डिस्ट्रिक्ट जज साहेब यांचे कोर्टात**

१) **श्रीनिवास सचिन गोरे,** वय ०६ वर्षे, धंदा - शिक्षण, अ.पा.क. अर्जदार नं ५ जनक आई विद्या सचिन गोरे
२) **शिवकुमार सचिन गोरे,** वय ०९ वर्षे, धंदा - शिक्षण, अ.पा.क. अर्जदार नं ५ जनक आई विद्या सचिन गोरे
३) **शिवण्या सचिन गोरे,** वय १० वर्षे, धंदा - शिक्षण, अ.पा.क. अर्जदार नं ५ जनक आई विद्या सचिन गोरे
४) **शिवानी सचिन गोरे,** वय १२ वर्षे, धंदा - शिक्षण, अ.पा.क. अर्जदार नं ५ जनक आई विद्या सचिन गोरे
५) **श्रीमती विद्या गोरे,** वय ३२ वर्षे, धंदा - शेती / घरकाम
६) **बिपिन शिवाजी गोरे,** वय ४० वर्षे, धंदा - शेती
७) **नितिन शिवाजी गोरे,** वय ४५ वर्षे, धंदा - शेती
८) **छाया शिवाजी गोरे,** वय ०७ वर्षे, धंदा - शेती/घरकाम,
अर्जदार नं १ ते ८ सर्व रा. वाणी गल्ली, कसबा पेठ, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर — **अर्जदार**

विरूध्द

**सरकार - सा.वाला**

तमाम जनतेस या जाहीर प्रसिध्दीकरणाद्वारे कळविण्यात येते की, ज्याअर्थी डि. सोलापूर सब. डी. व ता. बार्शी पैकी मौजे नागोबाचीवाडी येथील जमीन गट नं ९३ पैकी दक्षिण बाजूची ०० हे ९६ आर यासी चतुसीमा :- पूर्व - गट नं. ८९, दक्षिण - गट नं. ८९, पश्चिम - गट नं. ९६, उत्तर - गट नं. ९३ पैकी योगिता चंद्रकांत बेळे यांची जमीन येणेप्रमाणे वर्णनाची जमीन यातील अर्जदार नं १ ते ८ यांचे नावावर आहे. यातील अर्जदार नं. १ ते ४ हे अज्ञान आहेत. अर्जदार नं. १ ते ४ हे शिक्षण घेत आहेत. अर्जदार नं. १ ते ४ यांचे शिक्षणाचा खर्च वरचेवर वाढत आहे. त्यांच्या गरजा वाढल्या आहेत, त्यांना शिक्षण, जीवन जगणे, कपडालत्ता, दवाखाना, खासगी कर्ज व इतर खर्चासाठी. मोठ्या रकमेची जरुरी आहे. त्यामुळे यातील अर्जदार नं. १ ते ४ यांच्या नावावरील गट नं ९३ हि मिळकत विक्री केल्याशिवाय यातील अर्जदार नं. १ ते ४ यांच्या प्रापंचिक गरजा भागणार नाहीत. भविष्याच्या दृष्टीने शिक्षण घेणे अत्यंत जरुरीचे आहे, त्यामुळे अर्जदार नं १ ते ८ यांनी गट नं ९३ हि मिळकत विक्रीस काढली आहे. सौ. कमल अंगद जमदाडे यांचे बरोबर सदर जमीन विक्री बद्दल बोलणी झाली. जमिनीची किंमत १८,८०,०००/- रु. ठरलेली आहे. यातील अर्जदार नं १ ते ४ यांचे नावावरील जमीन अर्जदार नं ५ विद्या यांना अर्जदार नं १ ते ४ यांचे अपाक नेमून अर्जदार नं १ ते ४ यांचे हिता करिता विक्री करण्यास परवानगी मिळावी म्हणून हा अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी, सदर अर्जास कोणाचा आक्षेप / हरकत असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत वकिलामार्फत अगर स्वतः मे कोर्टात नेमलेल्या तारखेसह दि. २८/०७/२०२६ रोजी अगर त्यापूर्वी हजर होऊन म्हणणे मांडावे सदर मुदतीत कोणाचीही तक्रार न आल्यास मा. न्यायालय योग्य तो आदेश पारित करील याची नोंद घ्यावी.

हे प्रसिध्दीकरण माझ्या सहीने व मे. कोर्टाचे सही शिक्यानिशी दिले ता. २५/०६/२०२६.

सही/-
कनिष्ठ लिपीक

कोर्टाचा शिक्का

सही/-
अधिक्षक
अतिरिक्त जिल्हा न्यायालय,
बार्शी, जि. सोलापूर

## महत्वाचे...

### ऑनलाइन सीबीटी प्रणालीवर स्पर्धा परीक्षा विद्यार्थ्यांमध्ये नाराजी

**सोलापूर, दि.२६ जून-**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने (एमपीएससी) महाराष्ट्र शासनाच्या विविध विभागांतील २६१९ पदांसाठी महाराष्ट्र गट-क सेवा संयुक्त पूर्व परीक्षा-२०२६ ची जाहिरात प्रसिध्द केली आहे. ही परीक्षा २७ सप्टेंबर २०२६ पासून राज्यातील विविध केंद्रांवर ऑनलाइन संगणक आधारित (सीबीटी) पध्दतीने होणार असल्याची घोषणा करण्यात आली आहे. मात्र, जाहिरात प्रसिध्द होताच भरतीपेक्षा परीक्षा पध्दतीच चर्चेचा विषय ठरली असून स्पर्धा परीक्षा विद्यार्थ्यांनी ऑनलाइन पद्धतीला तीव्र विरोध दर्शविला आहे. विद्यार्थ्यांचे म्हणणे आहे की, ऑनलाइन परीक्षांमुळे दूरस्थ परीक्षा केंद्रांवर जावे लागते. त्यामुळे प्रवास, निवास आणि इतर खर्चाचा अतिरिक्त आर्थिक बोजा सहन करावा लागतो. त्याचबरोबर तांत्रिक अडचणी, सर्व्हर समस्या, नॉर्मलायझेशन प्रक्रिया आणि गुणांकनातील पारदर्शकतेबाबतही गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. त्यामुळे पूर्वीप्रमाणे ऑफलाइन पद्धतीनेच परीक्षा घेण्याची मागणी अधिक तीव्र झाली आहे. जाहिरातीनुसार, २७ जून ते १७ जुलै २०२६ या कालावधीत ऑनलाइन अर्ज करता येणार असून, शुल्क भरण्याची अंतिम मुदतही १७ जुलै आहे. बँक चलनाद्वारे शुल्क भरण्यासाठी १९ व २० जुलै हे दिवस निश्चित करण्यात आले आहेत. आयोगाने जाहिरातीनंतर नव्याने प्राप्त होणाऱ्या मागणीपत्रांनुसार पदसंख्या किंवा आरक्षणामध्ये बदल होऊ शकतो, असेही स्पष्ट केले आहे.राज्य स्पर्धा परीक्षा विद्यार्थी संघटनेचे राज्य उपाध्यक्ष प्रशांत शिरगुर यांनी आगामी अधिवेशनात ऑनलाइन परीक्षा रद्द करून ऑफलाइन पद्धतीची परीक्षा घेण्याची मागणी उपस्थित करण्याचे आवाहन केले आहे. भरतीची मोठी संधी उपलब्ध झाली असली तरी परीक्षा पद्धतीवरून निर्माण झालेला वाद आता शासन आणि आयोग कोणत्या भूमिकेतून हाताळतात? याकडे राज्यातील लाखो स्पर्धा परीक्षा विद्यार्थ्यांचे लक्ष लागले आहे.

#### गैरव्यवहार, तांत्रिक फेरफार

ऑनलाइन प्रक्रियेमध्ये गैरव्यवहार, पेपरफुटी, तांत्रिक फेरफार आणि भ्रष्टाचाराच्या शक्यतांमुळे विद्यार्थ्यांमध्ये अविश्वास निर्माण झाल्याचा दावा त्यांनी केला. सन २०२३ मध्ये गट-क पदभरती परीक्षा ऑफलाइन पध्दतीने यशस्वीरीत्या पार पडल्या होत्या. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या हिताचा विचार करून यंदाही त्याच पध्दतीचा अवलंब करावा, अशी मागणी संघटनांकडून करण्यात येत आहे.



### आयडब्ल्यूएमएस प्रणालीच्या अंमलबजावणीबद्दल गौरव सोहळा

**सोलापूर, दि.२६ जून-**

सोलापूर महानगरपालिकेतील विकासकामांचे व्यवस्थापन अधिक पारदर्शक, कार्यक्षम आणि डिजिटल पद्धतीने करण्यासाठी राबविण्यात आलेल्या इंटेलिजंट वर्क्स मॅनेजमेंट सिस्टीम या आधुनिक प्रणालीच्या यशस्वी अंमलबजावणीबद्दल गुरुवारी गौरव सोहळा पार पडला. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले सभागृहात महापौर विनायक कोंडयाल यांच्या हस्ते कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रणालीमुळे कागदाधारित प्रक्रियेत मोठी घट झाली असून मंजुरी प्रक्रिया अधिक सुलभ आणि जलद झाली आहे. अधिकारी, अभियंते व कंत्राटदारांना कामांचा प्रगती आढावा, आवश्यक कागदपत्रे आणि बिलांची स्थिती ऑनलाइन उपलब्ध होत असल्याने प्रशासनातील कार्यक्षमता वाढल्याचे यावेळी नमूद करण्यात आले. कार्यक्रमास उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, स्थायी समिती सभापती रंजीता चाकोते, सभागृह नेते नरेंद्र काळे, नगरसेविका रोहिणी तडवळकर, आयुक्त डॉ.सचिन ओम्बासे, नगर अभियंता सारिका आकुलवार, प्रकाश दिवाणजी आदी उपस्थित होते. इन्मॉईस टेक्नॉलॉजिसचे कार्यकारी संचालक रोहन अजगेकर यांनी प्रणालीची वैशिष्ट्ये आणि कार्यपद्धती याबाबत सादरीकरण केले. कार्यक्रमाच्या शेवटी प्रणालीच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी योगदान देणाऱ्या अधिकारी, अभियंते, कर्मचारी, कंत्राटदार आणि टीमचा सत्कार करण्यात आला.

# जिल्हा परिषदेत सुट्टीतही 'ड्युटी'

## प्रलंबित कामे पूर्ण करण्यासाठी ग्रामपंचायत विभाग सुरु राहणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२६ जून-**

आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर ग्राम पंचायत विभागातील प्रलंबित कामे वेळेत पूर्ण करण्यासाठी सोलापूर जिल्हा परिषदेने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. शासकीय सुट्टी असतानाही २६ ते २८ जून या तीन दिवसांत जिल्हा परिषदेचा ग्रामपंचायत विभाग कार्यरत ठेवण्याचे आदेश ग्रामपंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी सूर्यकांत भुजबळ यांनी परिपत्रकाद्वारे दिले आहेत.

सन २०२५-२६ या आर्थिक वर्षातील प्रलंबित प्रशासकीय कामे, आषाढी वारीच्या अनुषंगाने आवश्यक नियोजन वेळेत पूर्ण व्हावे, यासाठी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या सूचनेनुसार हा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे सुट्टीच्या दिवशीही संबंधित अधिकारी



व कर्मचाऱ्यांना कार्यालयात उपस्थित राहून कामकाज पार पाडावे लागणार आहे.

परिपत्रकानुसार या तीन दिवसांतील कार्यालयीन उपस्थितीचा स्वतंत्र अहवाल सामान्य प्रशासन विभागाकडे सादर करणे बंधनकारक करण्यात आले आहे. तसेच आदेशाच्या अंमलबजावणीत कोणतीही हयगय होऊ नये, याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना स्पष्ट सूचना देण्यात आल्या आहेत. आषाढी वारीच्या काळात ग्रामपंचायतींशी संबंधित विविध कामे, मंजुरी प्रक्रिया, प्रशासकीय पत्रव्यवहार आणि प्रलंबित प्रस्तावांचा निपटारा जलदगतीने करण्यासाठी हा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे. सुट्टीच्या काळातही कार्यालय सुरु राहणार असल्याने विकासकामांना गती मिळण्याबरोबरच वारीपूर्व तयारी अधिक प्रभावीपणे पूर्ण होण्यास मदत होणार आहे.

#### २६ ते २८ जून या कालावधीत कामकाज सुरु

आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर ग्रामपंचायत विभागातील प्रलंबित कामे विहित मुदतीत पूर्ण होणे आवश्यक आहे. मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या सूचनेनुसार २६ ते २८ जून या शासकीय सुट्टीच्या कालावधीतही विभागाचे कामकाज सुरु ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी आदेशाचे काटेकोर पालन करून उपस्थित राहावे आणि कामे वेळेत पूर्ण करावीत, असे ग्रामपंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी सूर्यकांत भुजबळ यांनी सांगितले.

## कचऱ्याच्या ढिगाऱ्यामध्ये आढळली मानवी कवटी आणि हाडे

**सोलापूर, दि. २६ जून-**

एका अज्ञात व्यक्तीचा मानवी सांगाडा यात कवटी, कंबरेचे हाड गुरुवारी सकाळी स्वातंत्र्य सैनिक नगरच्या पुढे असलेल्या कंबर तलावाच्या बॅक वॉटरच्या बाजूला कचऱ्याच्या ढिगाऱ्यामध्ये मिळून आला. ही बाब सकाळी त्या परिसरातून जात असलेल्या नागरिकांच्या लक्षात आली. त्यानंतर याची माहिती पोलिसांना दिली. या घटनेची माहिती मिळताच विजापूर नाका पोलीस ठाण्याचे पोलिस घटनास्थळी धाव घेऊन अवशेष ताब्यात घेतले आणि दुपारी सिव्हिल हॉस्पिटल, सोलापूर येथे तपासणीसाठी दाखल केले. या प्रकरणाचा तपास सपोनि मोहन पवार करत आहेत. ही हाडे शनिवारी तपासणीसाठी पाठवली जाणार आहेत . त्यानंतरच ही मानवी हाडे पुरुष की स्त्रीची आहेत याचा उलगडा होईल.

## रखडलेल्या पाणी योजनांसंदर्भात लोकप्रतिनिधींनी आवाज उठवावा

**मंगळवेढा, दि. २६ जून -**

राज्यात सद्य:स्थितीत २४४ सिंचन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी १.६५ लाख कोटी रुपयांची गरज आहे. रखडलेल्या पाणी योजनांसाठी लोकप्रतिनिधींनी आवाज उठवावा, असे प्रतिपादन पाणी संघर्ष समितीचे अध्यक्ष शिवाजी काळुंगे यांनी केले. मंगळवेढा येथे आयोजित केलेल्या पाणी परिषदेत ते बोलत होते.

व्यासपीठावर आ.समाधान आवताडे, आ.डॉ.बाबासाहेब देशमुख, माजी आमदार विक्रम सावंत, राजेंद्र देशमुख, गौरव नायकवाडी, वैभव नायकवाडी, डॉ.अनिकेत देशमुख, विश्वंभर बाबर, ॲड.सुभाष पाटील, ॲड.सरफराज बागवान, ॲड.भारत पवार, प्रा.दत्ताजी जाधव, ॲड.बिराप्पा जाधव, तुकाराम महाराज, शोभा काळुंगे उपस्थित होते.

#### या कामासाठीचे ठराव मंजूर

म्हैसाळचे मंगळवेढा, सांगोला व जतमधील अर्धवट कामे पुर्ण करणे. सांगली व सातारा जिल्ह्यातील पाच तालुक्यातील प्रकल्प अजून रखडलेले . तासगाव, आटपाडी, सांगोल्यातील टेंभूचे काम पूर्ण व्हायचे आहे. टेंभू-म्हैसाळचे पाणी माण नदीतून मंगळवेढ्यापर्यंत आण. भीमा, माण व कोरडा नदीवर बॅरेजेस यासाठी ३० मंजूर केले.

यावेळी आ.समाधान आवताडे, आ.बाबासाहेब देशमुख, वैभव नाईकवाडी आदींनीही मनोगत व्यक्त केले.

# शालार्थ आयडीअभावी पगार नाही; एस.टी.च्या अर्ध्या तिकिटावर शिक्षक पत्नी पोहोचली शिक्षण कार्यालयात

### महिलेच्या व्यथा ऐकून शिक्षणाधिकारी सचिन जगताप झाले भावूक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.२६ जून-**

विनाअनुदानित शाळांमध्ये कार्यरत असलेल्या शिक्षकांच्या आर्थिक संघर्षाच्या अनेक कहाण्या वेळोवेळी समोर येत असतात. शासनाकडून अनुदान मंजूर झाल्यानंतरही प्रशासकीय त्रुटी, कागदपत्रांची पूर्तता आणि शालार्थ आयडीसारख्या प्रक्रियांमध्ये अडकलेल्या शिक्षकांना मोठ्या हालअपेष्टा सहन कराव्या लागतात. अशाच एका शिक्षक कुटुंबाच्या व्यथेला मंगळवारी सोलापूर जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षण विभागात उपस्थितांनी जवळून अनुभवले.

कोर्टाच्या कामानिमित्त सोमवारी कोल्हापूर येथे गेलेले माध्यमिक शिक्षणाधिकारी सचिन जगताप मंगळवारी कार्यालयात दाखल होताच विविध कामांसाठी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची मोठी गर्दी झाली होती. प्रत्येकाची समस्या संयमाने ऐकत ते निर्णय देत होते.

याचवेळी पंढरपूर तालुक्यातील एक महिला आपल्या शिक्षक पतीच्या वतीने अर्ज घेऊन शिक्षणाधिकाऱ्यांसमोर आली. शिक्षण उपसंचालक कार्यालयाने प्रस्तावात काही त्रुटी नोंदवल्यामुळे संबंधित शिक्षकांचा शालार्थ आयडी मंजूर झाला नव्हता. परिणामी त्यांचा पगारही रखडला होता.

अर्ज पाहताच शिक्षणाधिकारी जगताप यांनी संबंधित लिपिकाला बोलावून प्रकरणाची माहिती घेतली. त्रुटी तातडीने दूर करण्याचे निर्देश देत संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांनाही दूरध्वनीवरुन आवश्यक पूर्तता करण्यास सांगितले. 'या शिक्षकाला मी ओळखतो. त्यांचे काम प्राधान्याने पूर्ण झाले पाहिजे', असे स्पष्ट निर्देशही त्यांनी दिले.

कामाची प्रक्रिया सुरु झाल्यानंतर जगताप यांनी त्या महिलेला विचारले, 'तुम्ही स्वतः कशाला आलात? सर कुठे आहेत?' यावर त्या महिलेने दिलेले उत्तर उपस्थितांच्या मनाला चटका लावणारे होते. 'सर, अनेक दिवसांपासून पगार नाही. घरची परिस्थिती खूप कठीण झाली आहे. त्यांना येण्यासाठी वाहनखर्चाचेही पैसे नव्हते. मला एसटीमध्ये अर्धे तिकीट असल्याने मीच आले,' असे ती म्हणाली.

हे शब्द ऐकताच कार्यालयातील वातावरण काही क्षणांसाठी स्तब्ध झाले होते. शिक्षणाधिकारी सचिन जगताप यांनाही क्षणभर काय बोलावे हे सुचेना. त्यांनी तत्काळ शिपायाला बोलावून त्या महिलेला प्रवासखर्चासाठी काही मदत करता येईल का? याची विचारणा केली.

#### शिक्षण विभागात दररोज गर्दी

पदोन्नती, वेतनवाढ किंवा इतर प्रशासकीय मागण्यांसाठी शिक्षण विभागात दररोज गर्दी होत असते. मात्र एका शिक्षक कुटुंबाची ही संघर्षगाथा उपस्थितांना अंतर्मुख करून गेली. विनाअनुदानित शिक्षकांच्या प्रश्नांकडे केवळ कागदोपत्री नव्हे, तर मानवी दृष्टिकोनातून पाहण्याची गरज या घटनेने पुन्हा अधोरेखित केली आहे.

## टीईटी प्रश्नपत्रिका हरियाणाहून दाखल



### २८ जूनला होणार सोलापुरातील ४७ केंद्रांवर परीक्षा

### २८ हजारांहून अधिक उमेदवार, बायोमेट्रिक तपासणी होणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२६ जून-**

प्राथमिक शिक्षक होण्याचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी महत्त्वाची असलेली महाराष्ट्र शिक्षक पात्रता (टीईटी) परीक्षेसाठी हरियाणाहून प्रश्नपत्रिका सोलापुरात दाखल झाले आहेत. 'नीट'च्या धड्यानंतर प्रशासनाने कडक खबरदारी घेतली असल्याचे दिसून येत आहे. रविवार, दि.२८ जून सोलापूर शहर व परिसरातील ४७ परीक्षा केंद्रांवर होणार आहे. जिल्ह्यातून पेपर-१ साठी १२ हजार २६१ तर पेपर-२ साठी १६ हजार ३७ उमेदवारांनी नोंदणी केली. एकूण २८ हजार २९८ परीक्षार्थी परीक्षा देणार आहेत.

परीक्षा सुरळीत, पारदर्शक आणि गैरप्रकारमुक्त वातावरणात पार पडावी; यासाठी जिल्हा प्रशासन आणि महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेकडून व्यापक नियोजन करण्यात आले आहे. परीक्षार्थींनी पेपर-१ साठी सकाळी ८.३० वाजेपर्यंत तर पेपर-२ साठी दुपारी १२.३० वाजेपर्यंत परीक्षा केंद्रावर उपस्थित राहणे बंधनकारक आहे. केंद्रावर बायोमेट्रिक उपस्थिती नोंदविणे व फेस स्क्रीनिंग प्रक्रिया होणार असल्याने वेळेपूर्वी पोहोचावे लागेल.

सकाळी १०.१० वाजल्यानंतर आणि दुपारी २.१० वाजल्यानंतर कोणत्याही उमेदवाराला परीक्षा केंद्रात प्रवेश दिला जाणार नाही. सोबत प्रवेशपत्रासह मूळ फोटो ओळखपत्र आणि त्याची छायाप्रत सोबत ठेवणे आवश्यक आहे. मोबाईल, स्मार्ट वॉच, डिजिटल घड्याळ, ब्लूटूथ किंवा इतर कोणतीही इलेक्ट्रॉनिक साधने परीक्षागृहात नेण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे.

दिव्यांग उमेदवारांना लेखनिकाची सुविधा हवी असल्यास त्यांनी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) कार्यालयाकडून पूर्वपरवानगी घेणे आवश्यक आहे. लेखनिक हा बारावीपेक्षा अधिक शिक्षित नसावा, त्याचे वय १९ वर्षांपेक्षा कमी असावे आणि तो उमेदवाराच्या कुटुंबातील सदस्य नसावा, अशी अट घालण्यात आली आहे, असे यावेळी सांगण्यात आले.

जि.प.प्राथमिक विभागाचे शिक्षणाधिकारी कादर शेख यांच्या अध्यक्षतेखाली उपशिक्षणाधिकारी रुपाली भावसार, विस्ताराधिकारी सुदर्शन राठोड आदींच्या उपस्थितीत घेण्यात आलेल्या आढावा बैठकीत परीक्षा नियोजन, सुरक्षा व्यवस्था आणि विविध विषयांसंबंधी साधकबाधक चर्चा करण्यात आली.

#### टीईटी प्रमाणपत्र वितरण

सोलापूर जिल्ह्यात आतापर्यंत २,७४७ टीईटी प्रमाणपत्रे प्राप्त झाली असून त्यापैकी २,५०० प्रमाणपत्रांचे वितरण पूर्ण झाले आहे. उर्वरित प्रमाणपत्रे लवकरच संबंधित उमेदवारांना वितरित करण्यात येणार आहेत.

#### परीक्षा नियमांचे तंतोतंत पालन करावे

परीक्षार्थींनी प्रवेशपत्रासह मूळ फोटो ओळखपत्र सोबत ठेवावे, कोणतेही इलेक्ट्रॉनिक साहित्य आणू नये. परीक्षा नियमांचे तंतोतंत पालन करून प्रशासनाला सहकार्य करावे. परीक्षा केंद्राचा पत्ता आगाऊ पाहून अनावश्यक धावपळ टाळावी, असे आवाहन प्राथमिकचे शिक्षणाधिकारी, महा टीईटी परीक्षा समनियंत्रक कादर शेख यांनी केले.




## पीर बडा मंगलबेडा सवारीची मिरवणूक भक्तिमय वातावरणात



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२६ जून-**

मोहरम उत्सवात थोरला मंगळवेढा तालीम येथील पीर बडा मंगलबेडा (अहले हरम) सवारीचा मिरवणूक सोहळा भक्तिमय आणि मंगलमय वातावरणात संपन्न झाला. यानिमित्ताने सामाजिक आणि धार्मिक ऐक्याचा अनुबंध पाहायला मिळाला. सकाळी ८ वाजता फातेहाखानी विधीनंतर पीर मंगलबेडा सवारीच्या जयजयकारात मिरवणुकीस प्रारंभ झाला.

पीर मंगळवेढा सवारीचे प्रमुख मानकरी मुजावर परिवाराने स्वागत केले. यावेळी सवारीचे प्रमुख, ज्येष्ठ पत्रकार स्व.एजाज हुसेन मुजावर यांना श्रध्दांजली वाहण्यात आली. ही मिरवणूक आभार शरीफ येथे पोहोचल्यानंतर तेथे फातेहाखाली विधी झाला. तेथून मिरवणूक पूर्वस्थळी पोहोचली. मिरवणुकीच्या अग्रभागी हिरवे निशाण आणि भगवे निशाण घेतलेले दोन घोडेस्वार होते.

हलग्यांचे पथक, ब्रॉस बँड पथक, ताशा पथकाच्या सहभागातून निघालेल्या या मिरवणुकीत शिवसेना जिल्हाप्रमुख तथा गटनेता अमोल शिंदे, ज्येष्ठ विधीज्ज्ञ धनंजय माने, शिक्षण मंडळाचे माजी सभापती संकेत पिसे, नगरसेवक बिज्जू प्रधाने, सतीश प्रधाने, अमर धंगेकर, सवारीचे मानकरी पृथ्वीराज दीक्षित, सदाशिव येलुरे, सुनील शेळके, विकास गायकवाड, मुदस्सर शेख, मिनाजुद्दीन काझी, दशरथ मिसाळ, उज्वल दीक्षीत, इब्राहिम शेख, कादर सय्यद, सुनील शेळके, प्रकाश कदम, आदींचा सहभाग होता.

#### पंजा सवारी मिरवणुकीत हजारो नागरिकांनी सहभाग

**सोलापूर, दि.२६ जून-**

दरवर्षीप्रमाणे यंदाही मोहरम उत्सव मोठ्या भक्तिभावाने व उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. शहरातील विविध भागांतून पारंपरिक पंजा सवारी (ताबूत) मिरवणुका काढण्यात आल्या. हजारो नागरिकांनी सहभाग नोंदवत मोहरमची परंपरा जपली.

मुस्लिम पाच्छा पेठ येथील जिंदाबाद चौक येथे बडे इमाम हुसेन, छोटे इमाम हुसेन अर्थात तलवार पंजे यांची मिरवणुकांची भेट झाली. याठिकाणी नागरिकांची मोठी गर्दी झाली होती. धार्मिक एकात्मता, शिस्त आणि पारंपरिक उत्साहाचे दर्शन घडवत मोहरमची मिरवणूक शांततेत व उत्साहात पार पडली.







हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : विवेक कृष्णाजी घळसासी. ● समूह मुख्य संपादक : दिलीप यशवंत पेठे.● मुख्य संपादक :प्रशांत वसंतराव माने दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. E-mail starunbharatgmail.com. ● Website:http://dainiktarunbharat/ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर
SOLAPUR TARUN BHARAT
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा





CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# विविध संस्था, शाळांमध्ये राजर्षी शाहू महाराज जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ जून**

आरक्षण व सामाजिक न्यायाचे जनक, लोकराजे राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची जयंती राज्यातील विविध शैक्षणिक संस्था, महाविद्यालये आणि शाळांमध्ये उत्साहात साजरी करण्यात आली. हा दिवस राज्यभरात 'सामाजिक न्याय दिन' म्हणून साजरा केला गेला. या निमित्ताने विविध शाळांमध्ये सकाळच्या सत्रात राजर्षी शाहू महाराजांच्या पुतळ्याला व प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. अनेक ठिकाणी विद्यार्थ्यांनी पारंपरिक वेशभूषेत प्रभातफेऱ्या काढल्या, तर काही संस्थांमध्ये वक्तृत्व, निबंध स्पर्धा आणि समता दिंडीचे आयोजन करण्यात आले होते.



## सोलापूर विद्यापीठात ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन

राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंती निमित्त सोलापूर विद्यापीठातील डॉ. मामासाहेब जगदाळे ज्ञानस्रोत केंद्रात ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. या ग्रंथप्रदर्शनाचे उद्धघाट प्रमुख पाहुणे डॉ. महादेव गव्हाणे, कुलगुरु प्रकाश महानवर, राजाभाऊ सरवदे, समन्वयक डॉ. गौतम कांबळे, प्र. कुलगुरु लक्ष्मीकांत दामा, प्र. कुलसचिव डॉ. अतुल लकडे यांच्या उपस्थितीत करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरु डॉ. प्रकाश महानवर उपस्थित होते. व्यासपीठावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन केंद्राचे अध्यक्ष राजाभाऊ सरवदे, समन्वयक डॉ. गौतम कांबळे, प्र-कुलगुरु लक्ष्मीकांत दामा, प्र. कुलसचिव डॉ. अतुल लकडे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरवातीला मान्यवरांच्या हस्ते राजर्षी शाहू महाराज आणि अहिल्यादेवी होळकर, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आले. प्रस्ताविक डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन केंद्राचे समन्वयक डॉ. गौतम कांबळे यांनी केले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय डॉ. प्रभाकर कोळेकर यांनी करून दिला. यावेळी कार्यक्रमाला वित्त व लेखा अधिकारी महादेव खराडे, परिक्षा व मुल्यामापन संचालक डॉ. श्रीकांत अंधारे, डॉ. प्रभाकर कोळेकर, डॉ. चंद्रकांत गार्डी, आदीसह विद्यापीठातील विविध संकुलाचे संचालक, प्राध्यापक, कर्मवारी मोठ्या संखेने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन डॉ. तेजस्वीनी कांबळे यांनी केले तर आभार सहाय्यक कुलसचिव डॉ. शिवाजी शिंदे यांनी मानले. कार्यक्रमाला विद्यार्थी मोठ्या संखेने उपस्थित होते.



## मेहता प्राथमिक शाळा

जुळे सोलापूर येथील कै.वि.मो. मेहता प्राथमिक शाळेत छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. सर्वप्रथम प्रमुख अतिथी सोनल केत (जिल्हा परिषद वेतन पथक, वरिष्ठ लिपिक) व मुख्याध्यापिका सीमा कोरवलीकर यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले. सीमा कोरवलीकर यांनी आपल्या प्रास्ताविक केले. शाळेतर्फे पाहुण्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांनी आपल्या भाषणातून शाहू महाराजांच्या जीवन चरित्राचे कथन केले. वेदांत जाधव या विद्यार्थ्याने राजर्षी शाहू महाराजांची वेशभूषा साकारली होती. योगेश सरवदे यांनी गोष्टी रूपातून आपले मनोगत व्यक्त केले. प्रमुख अतिथी सोनल केत यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन व अतिथींचा परिचय मयुरी दुरूगकर यांनी केले तर आभार स्वाती गडदे यांनी मानले.



## हरिभाई देवकरण प्रशाला

राजर्षी शाहू महाराज जयंती सामाजिक न्याय दिन, प्रारंभी प्रमुख वक्ते पर्यवेक्षक औदुंबर सर्वगोड मुख्याध्यापिका स्मिता कांगुणे, उपप्राचार्य शांतप्पा कुंभार, प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयाचे सर्व पर्यवेक्षक यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले. प्रास्ताविक व सूत्रसंचालन मल्लिकार्जुन घवाळे यांनी केले. प्रमुख वक्ते पर्यवेक्षक औदुंबर सर्वगोड यांनी मनोगता व्यक्त केले. मुख्याध्यापिका स्मिता कांगुणे यांनी राजर्षी शाहू महाराजांनी महिला व विद्यार्थीनीं साठी दिलेले योगदान या विषयी सांगितले. आभार अलका जगताप यांनी मानले.



## महापालिका

सोलापूर महापालिकेच्या वतीने राजर्षी शाहू महाराज जयंती आणि सामाजिक न्याय दिन दिनानिमित्त आज कौन्सिल हॉल येथील महापौर यांच्या कार्यालयात राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रतिमेस महापौर विनायक कोंड्याल यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी कामगार कल्याण अधिकारी अजितकुमार खानसोळे, जयप्रकाश आमनगी, जनसंपर्क अधिकारी श्रीगणेश बिराजदार, शेखर सकट, अशोक खडके, प्रेम कांबळे उपस्थित होते.



## नूमवि शाळा

नू.म.वि मराठी शाळेत शाहू महाराज जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षा मुख्याध्यापिका स्मिता माळवदकर यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर तेजस्विनी गंजी, अन्वी भंडगे, संबोधी माने, राजवीर रजपूत या विद्यार्थ्यांनी भाषणे केली. तसेच सेवाजेष्ठ शिक्षिकारोहिणी चौधरी यांनी आपल्या मनोगतातून शाहू महाराजांच्या कार्याची माहिती सांगितली सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन रोहिणी चौधरी यांनी केले.

## संभाजी आरमार

निर्मलकुमार फडकुले पटांगण येथे राजर्षी छत्रपती शाहू महाराज जयंतीनिमित्त संभाजी आरमारचे संस्थापक अध्यक्ष श्रीकांत डांगे व कार्याध्यक्ष तथा नगरसेवक शिवाजी वाघमोडे यांच्या हस्ते शाहू महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आले. यावेळी सरचिटणीस गजानन जमदाडे, उपाध्यक्ष शशिकांत शिंदे, संघटक प्रकाश डांगे, शहर प्रमुख सागर ढगे, शहर संघटक राज जगताप, उपशहर प्रमुख सागर दासी, शिव पालखी प्रमुख अर्जुन शिवशिंगवाले, मल्लिकार्जुन पोतदर, अविनाश विटकर, महेश घोडके, रोहन तपासे, सुधाकर करणकोट, प्रदीप मोरे उपस्थित होते.




## ज्ञानामृत आनंदलहरी - १४८४

**आपलें तें हित फार । तुका म्हणे खरें सार ।।**

इतरांसाठी काहीतरी करा,असा सल्ला बहुतांशांना आवडत नाही. हे सत्य असले तरीही आम्ही समाजासाठी हे करतो, ते करतो, असे सांगणारे कमी नाहीत. इतरांसाठी कांही तरी करण्यासाठी माणसाने प्रथम स्वत:साठी करायला हवे. हा मानवी जीवनाचा मूलमंत्र आहे. पण मोठेपणासाठी, दिखाव्यासाठी, प्रसिध्दीसाठी माणूस या मूलमंत्राकडे दुर्लक्ष करतो. प्रत्यक्षात माणूस स्वार्थ जोपासण्यासाठी इतरांसाठी कांही तरी केल्याचे दाखवतो. लपून छपून स्वत:साठी करायचे आणि इतरांसाठी केल्याचे दाखवायचे म्हणजे वाईट होय. त्यापेक्षा उघडपणे स्वत:साठी करणे जास्त योग्य असते. स्वत:साठी किंवा स्वत:च्या हितासाठी करायचे म्हणजे नेमके काय करायचे? असा प्रश्न उद्भवू शकतो. अध्यत्मिक क्षेत्रातून या प्रश्नाचे उत्तर द्यायचे झाले तर ते पुढीलप्रमाणे देता येईल. स्वत:कडील ईर्षा, द्वेष, स्वार्थ, मत्सर, काम, क्रोध, अहंकार आदि काढून टाकायचे. आपण कोण आहोत याचा परिचय करून घेऊन सदैव सकारात्मक दृष्टीकोनातून कर्तव्य पार पाडायचे. तुकाराम महाराजांनी जनहित करा असा सल्ला न देता स्वत:चे हित करा असा सल्ला दिला आहे. महाराजांनी नाशवंत व भौतिक वस्तूंची जमवाजमव करून हित साधा असा सल्ला न देता आपल्या कडील नको त्या गोष्टी काढून टाकण्याचा व योग्य त्याचा स्विकार करण्याचा सल्ला दिला आहे. या सल्ल्याचे पालन हाच जीवनाचा खरा सार आहे. हे सांगताना ते म्हणतात, **आपले ते हित फार । तुका म्हणे खरें सार ।।**



आपण आपल्यासाठीच प्रयत्नशील असावे, असा सल्ला देण्याची वेळ महाराजांवर का आली? याचा विचार आपण करायला हवा. आपण स्वत:च्या जीवनात नीट वागत नाही. आपण ईर्षा, मत्सर, अहंकार, प्रसिध्दी, क्रोध, काम, आदि सर्वांना सोबत घेवून जगत असतो आणि इतरांना मानवी जीवन मुल्याचे डोस देत असतो. मुळात स्वत:कडेच इतरांना कांही देता येण्यासारखे नसतांना ते इतरांना देण्याचा प्रयत्न करणे योग्य नव्हे. इतरांना देण्यासाठी जमवाजमव करण्याची गरज नाही. तर आपल्याकडे जे नको आहे ते काढून काढण्याची आवश्यकता आहे. आपल्याकडील नको ते गेले म्हणजे आपोआप योग्य त्या सर्वांचा मुबलक साठा होऊ लागतो. योग्यतेचा हा साठा इतरांना वाटण्याचा प्रयत्न करण्यापूर्वीच तो सकारात्मक वृत्तीमुळे आपोआप वाटला जावू लागतो. चांगल्यांनी इतरांना देण्याचा प्रयत्न करण्या अगोदरच त्यांच्या चांगुलपणाकडे पाहून लोक चांगल्या गोष्टी घेऊ लागतात. अर्थात हे सर्व घडण्यासाठी संतांच्या दृष्टीकोनातून आपण आपले हित जोपासले पाहिजे. असे हित जोपासणाऱ्याला दिखाव्याचे नाटक करावे लागत नाही. जय जय राम कृष्ण हरी।

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

**वार : शनिवार,**
**दि. २७ जून २०२६**
**विक्रम संवत् २०८३ ।**
**शके -१९४८**
**संवत्सर - पराभव**
**मास - ज्येष्ठ शु. त्रयोदशी**
**ऋतु - ग्रीष्म ।**
**नक्षत्र- अनुराधा (२२.१०)**
**योग - साध्य (१२.३१)**
**करण - कौलव (११.३१)**
**राहू काल : शनिवार**
**स. ०९.०० ते १०.३०**

**दिनविशेष : ✻ जागतिक औद्योगिक कामगार दिन.**
**१८६४ - प्रखर राष्ट्रभक्त, कवी, निबंधकार आणि 'काळ' या प्रसिद्ध संपादक शिवराम परांजपे यांचा जन्म.**
**१९६४ - पी. टी. उषा: भारताची सुवर्णकन्या म्हणून ओळखली जाणारी प्रसिद्ध धावपटू आणि भारतीय ऑलिम्पिक असोसिएशनच्या अध्यक्षा.**
**२००८ - भारताचे पहिले फील्ड मार्शल सॅम माणेकशा यांचे निधन.**




# महापालिका महिला व बाल कल्याण विभागातर्फे ४३१ विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकांचे वाटप

## उपमहापौर व स्थायी समिती सभापती यांच्या हस्ते वितरण

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २६ जून-**

महानगरपालिकेच्या महिला व बाल कल्याण समिती विभागातर्फे मनपा संचलित माध्यमिक शाळांतील इयत्ता नववी व दहावीच्या ४३१ विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तकांचे वितरण करण्यात आले.

कार्यक्रमास उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, स्थायी समिती सभापती रंजिता चाकोते, गटनेत्या वहीदाबानो शेख, नगरसेविका श्वेता खरात (खांडेकर), कल्पना कदम, नगरसेवक प्रियदर्शन साठे, नगरसेवक नरसिंग आसादे, शिक्षण मंडळाचे नियंत्रण अधिकारी तथा मुख्य लेखापाल डॉ. रत्नराज जवळगेकर, उपायुक्त तथा नियंत्रण अधिकारी सोनाली यादव, प्रशासन अधिकारी मल्हारी माने, महिला व बाल कल्याण अधिकारी अजितकुमार खानसोळे पस्थित होते.

कॅम्प येथील महानगरपालिका मराठी मुलींच्या शाळेत बुधवारी आयोजित कार्यक्रमात विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके वितरित करण्यात आली. उपायुक्त तथा नियंत्रण अधिकारी सोनाली यादव यांनी प्रास्ताविक केले.

**सुमारे ३ हजार ९९१ पाठ्यपुस्तकांचे वितरण**

मनपा प्रशाला क्रमांक १, २, ३ व ४, उर्दू कॅम्प शाळा, जय भवानी प्रशाला आणि सावित्रीबाई फुले इंग्लिश मिडियम स्कूलमधील विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके देण्यात आली.

यंदा नववीच्या २०४ आणि दहावीच्या २२७ अशा एकूण ४३१ विद्यार्थ्यांना सुमारे ३ हजार ९९१ पाठ्यपुस्तकांचे वितरण करण्यात आले. मराठी, हिंदी, इंग्रजी, गणित, विज्ञान, इतिहास, राज्यशास्त्र, भूगोल, अर्थशास्त्र, जलसुरक्षा, संरक्षणशास्त्र, रिटेल, ऑटोमोबाईल आणि उर्दू या विषयांच्या पुस्तकांचा त्यामध्ये समावेश होता.

# लग्नाच्या पंधरा दिवस आधीच भावी वराची गळफासाने आत्महत्या



**सोलापूर, दि. २६ जून-**

लग्नाच्या पंधरा दिवसा आधीच एका २० वर्षीय भावी वराने अज्ञात कारणावरून घरातील छताच्या हुकाला साडीच्या साह्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना कुमठा नाका येथे २५ जून रोजी सकाळी ११:३० वाजताच्या सुमारास उघडकीस आली. दुर्गेश मन्नू श्रीराम (वय २० वर्ष, रा. कुमठा नाका सोलापूर) असे मृत तरुणाचे नाव आहे. त्याचा पुढील महिन्यात ९ जुलै रोजी विवाह होता.

दुर्गेश याने गुरुवारी सकाळी घरात गळफास घेतला असल्याचे घरच्यांना आढळून आले . हा प्रकार लक्षात येताच त्याच्या नातेवाईकांनी त्याला तातडीने गळफासापासून सोडवून उपचारासाठी येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

# मार्गदर्शकांशिवाय मिशन ऑलिम्पिकचे स्वप्न कसे होणार पूर्ण?

## महाराष्ट्राला हवेत हक्काचे क्रीडा शिक्षक व शारीरिक शिक्षण संचालक







भारत क्रीडा क्षेत्रात एका ऐतिहासिक वळणावर उभा आहे. नोव्हेंबर २०२५ मध्ये ग्लासगो येथील बैठकीत भारताला २०३० च्या राष्ट्रकुल स्पर्धांचे अधिकृत यजमानपद मिळाले आहे. २०१०च्या दिल्ली राष्ट्रकुल स्पर्धेनंतर भारत दुसऱ्यांदा या भव्य स्पर्धेचे आयोजन करणार आहे. यासोबतच, २०३६च्या उन्हाळी ऑलिम्पिक खेळांचे यजमानपद मिळवण्यासाठी भारताने २०२४ मध्येच आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समितीकडे आपला अधिकृत अर्ज सादर केला असून, अहमदाबाद हे याचे मुख्य केंद्र म्हणून विकसित होत आहे. २०२९च्या मध्यावर या यजमानपदाचा अंतिम निर्णय होणार असून, कतार, तुर्की आणि दक्षिण आफ्रिका यांच्या आव्हानावर मात करत भारताचा दावा अत्यंत मजबूत मानला जात आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे हे 'ऑलिम्पिक स्वप्न' पूर्ण करण्यासाठी प्राथमिक स्तरापासून उच्च स्तरापर्यंतच्या खेळाडूंची कामगिरी सुधारणे अत्यंत गरजेचे आहे. मात्र, महाराष्ट्रातील क्रीडा क्षेत्रात सध्यातरी 'कुठे आनंद, तर कुठे दुर्लक्ष' असे चित्र पाहायला मिळत आहे.

**प्राथमिक स्तरावर ऐतिहासिक पाऊल, अंमलबजावणी गरजेची**

राज्यातील क्रीडा संस्कृतीला पुनरुज्जीवित करण्यासाठी आणि ग्रामीण भागातील खेळाडूंना बालपणापासूनच योग्य प्रशिक्षण देण्यासाठी महाराष्ट्र राज्य शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने एक क्रांतीकारी निर्णय घेतला आहे. जानेवारी २०२६ च्या शासन निर्णयानुसार जिल्हा परिषदांच्या प्राथमिक शाळांसाठी तब्बल ४,८६० केंद्रस्तरीय विशेष क्रीडा शिक्षक या नवीन संवर्गाची निर्मिती केली आहे. तसेच १५ मार्च २०२४च्या संच मान्यता शासन निर्णयानुसार केंद्र स्तरावर एक आणि माध्यमिक स्तरावर २५१ विद्यार्थ्यामागे एक क्रीडा शिक्षक या निकषानुसार राज्यातील रिक्त पदाची संख्या जाहीर करून तातडीने भरती प्रक्रिया सुरू करावी, अशी मागणी विविध क्रीडा व शिक्षक संघटनांकडून जोर धरत आहे. याची अंमलबजावणी झाल्यास ही भरती केवळ रिक्त पदे भरणारी नसून, राज्यातील हजारो बेरोजगार क्रीडा पदवीधरांच्या करिअरला नवी दिशा देणारी ठरेल.

**क्रीडा आणि शिक्षणमंत्र्यांकडून अपेक्षा**

'२०३०च्या राष्ट्रकुल स्पर्धा आणि २०३६ च्या ऑलिम्पिकमध्ये महाराष्ट्राच्या खेळाडूंनी तिरंगा फडकवावा असे वाटत असेल, तर क्रीडा मैदानांवर मार्गदर्शक असणे अनिवार्य आहे.' त्यासाठी शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील आणि क्रीडामंत्री सुनेत्राताई अजितदादा पवार यांनी या गंभीर समस्येकडे तातडीने लक्ष देण्याची गरज आहे. शालेय व उच्च शिक्षण विभागाने तातडीने शासन निर्णय काढून क्रीडा शिक्षक व शारीरिक शिक्षण संचालकांची रिक्त पदे भरल्यास, महाराष्ट्राचे खेळाडू ऑलिम्पिक पातळीवर देशाचे नाव नक्कीच सुवर्ण अक्षरांनी कोरतील.

**उच्च शिक्षणात मात्र २०१७ पासून भरती रखडली**

प्राथमिक व माध्यमिक स्तरावर कौतुकास्पद पावले पडत असताना, उच्च व तंत्र शिक्षण विभागाने मात्र 'शारीरिक शिक्षण संचालक' या अत्यंत महत्त्वाच्या पदांकडे साफ दुर्लक्ष केले आहे. २०१७ ते २०२६ या काळात राज्यातील अनुदानित महाविद्यालयांमध्ये १०२ शारीरिक शिक्षण संचालकांची पदे रिक्त आहेत. एकट्या सोलापूर विभागातील ४१ अनुदानित महाविद्यालयांतील ३६ मंजूर पदांपैकी ९ पदे रिक्त आहेत. सध्या उच्च व तंत्र शिक्षण विभाग अनुदानित महाविद्यालयांमधील ५,०१२ प्राध्यापकांच्या रिक्त पदांची भरती करत आहे, परंतु दुर्दैवाने यात शारीरिक शिक्षण संचालकांना वगळण्यात आले आहे.

२०१७ पासून राज्यातील बेरोजगार एमपीएड, पीएचडी आणि नेट-सेट धारक तरुण या भरतीची चातकासारखी वाट पाहत आहेत. अगदी 'तासिका तत्त्वावर' तरी या पदांना मंजुरी देणे गरजेचे होते, परंतु तेही केले गेले नाही.

**आझाद मैदानावरील आंदोलन; आमदारांची शिफारस**

या अन्यायाविरोधात 'महाराष्ट्र राज्य वरिष्ठ महाविद्यालयीन शारीरिक शिक्षण संचालक महासंघाने' ८ जून २०२६ रोजी मुंबईतील आझाद मैदानावर तीव्र आंदोलन केले होते. वित्त विभागाची परवानगी आल्यानंतर 'शासन निर्णय' काढला जाईल, असे आश्वासन मिळाल्यानंतर आंदोलन स्थगित करण्यात आले. या मागणीसाठी संघटनेने आतापर्यंत तब्बल ७४ वेगवेगळ्या मतदारसंघातील आमदारांची शिफारस पत्रे उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांकडे पाठवली आहेत. परंतु, अद्यापपर्यंत यांच्या भरतीचा शासन निर्णय निघालेला नाही.



**स्ट्रेट ड्राईव्ह**
**अजितकुमार संगवे**
**मो.9881133103**

**विना-अनुदानित, विधी आणि अभियांत्रिकी महाविद्यालयांचे काय?**

राज्यात कला, विज्ञान व वाणिज्य शाखेची सुमारे १,१०४ अनुदानित आणि १,७१५ विना-अनुदानित महाविद्यालये आहेत. विधी व बी.एड. महाविद्यालयात शारीरिक शिक्षण संचालक हे पद मंजूर नाही. तसेच अभियांत्रिकीसह सर्व विना-अनुदानित महाविद्यालयांमध्ये शारीरिक शिक्षण संचालक आहेत की नाही, यावर शासनाचे कोणतेही नियंत्रण नाही. विद्यापीठाने संलग्निकरण किंवा त्याच्या नूतनीकरणाच्या वेळी हे पद भरले आहे की नाही, हे तपासणे बंधनकारक आहे, परंतु प्रत्यक्षात तसे होत नाही. पारंपरिक महाविद्यालयांप्रमाणेच बीएड, विधी आणि अभियांत्रिकी महाविद्यालयातूनही अनेक राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय खेळाडू घडत असतात. तिथे मार्गदर्शकच उपलब्ध नसल्यास खेळाडूंची कामगिरी कशी सुधारणार?

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



### लक्ष्मी आनंद विद्या मंदिरमध्ये शाहू महाराजांची जयंती साजरी

**टेंभुर्णी, दि. २६ जून-**

लक्ष्मी आनंद विद्या मंदिर व ज्युनिअर कॉलेज टेंभुर्णी येथे छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त सामाजिक न्याय दिवस साजरा करण्यात आला यावेळी मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले. शाहू महाराजांचे गुणगान गुणगौरव करणारे काव्यवाचन इयत्ता सातवी मधील आलिया पठाण व स्नेहा जगताप या विद्यार्थिनींनी केले. यावेळी छत्रपती शाहू महाराज यांचे संपूर्ण जीवन चरित्र त्यांचे कार्य आणि त्यांचे विचार विद्यार्थ्यांना समजावे म्हणून शिक्षक मनोगत मधून अश्विनी चौधरी, युवराज वजाळे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. प्राचार्य विकास करळे सर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच या दिनाचे औचित्य साधून इयत्ता आठवीतील विद्यार्थ्यांसाठी छत्रपती शाहू महाराज यांच्या जीवन कार्यावर आधारित प्रश्नमंजुषा स्पर्धा आयोजित करण्यात आली. संस्थेचे अध्यक्ष योगेश बोबडे, सचिवा सुरजा बोबडे यांच्या मार्गदर्शनाखाली हा जयंती उत्सव सोहळा संपन्न झाला. यावेळी प्रशालेचे प्राचार्य विकास करळे पीआरओ सागर खुळे उपस्थित होते.



### टिळक भवन येथे सोलापूर शहर-जिल्हा काँग्रेसची बैठक

**सोलापूर, दि. २६ जून-**

सोलापूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीची आढावा बैठक महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी टिळक भवन येथे प्रदेशाध्यक्ष माननीय हर्षवर्धन सपकाळ साहेब यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. यावेळी व्यासपीठावर सोलापूर जिल्ह्याचे प्रभारी मोहन जोशी, सहप्रभारी यशराज पारखी, भाऊसाहेब आजबे, शहराध्यक्ष चेतन नरोटे, जिल्हाध्यक्ष सातलिंग शटगार उपस्थित होते. या बैठकीत सोलापूर शहर जिल्ह्याचे संपूर्ण आढावा प्रदेशाध्यक्षांनी घेतली. सोलापूर शहर उत्तर दक्षिणची माहिती चेतन नरोटे सोलापूर जिल्हा काँग्रेसची माहिती जिल्हाध्यक्ष सातलिंग शटगार यांनी दिली.

### कामतकर क्लासेसमध्ये प्रवेश प्रक्रिया सुरू

**सोलापूर, दि. २६ जून-**

सोलापूरमधील कामतकर क्लासेसमध्ये इयत्ता ११ वी व १२ वी विज्ञान शाखेसाठी तसेच ८ वी, ९ वी आणि १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. गेल्या २२ वर्षांपासून सातत्यपूर्ण गुणवत्तापूर्ण निकाल देणाऱ्या या क्लासेसमध्ये ११ वी-१२ वी विज्ञान विद्यार्थ्यांसाठी फिजिक्स, केमिस्ट्री, बायोलॉजी आणि गणित या विषयांचे विशेष बॅचेस घेतले जातात. बोर्डाचा संपूर्ण अभ्यासक्रम पूर्ण करून त्यासोबत JEE, NEET, उएढ तसेच इतर स्पर्धा परीक्षांची नियोजनबद्ध तयारी करून घेतली जाते. प्रत्येक विद्यार्थ्याकडे वैयक्तिक लक्ष देण्यासाठी मर्यादित विद्यार्थ्यांच्या बॅचेस ठेवण्यात येतात. याशिवाय ८ वी, ९ वी आणि १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी फाउंडेशन कोर्स सुरू करण्यात आला आहे. हा कोर्स शनिवार व रविवार या दोन दिवसांत घेतला जात असून गणित, विज्ञान, बुद्धिमत्ता आणि इंग्रजी या विषयांवर भर दिला जातो. शालेय अभ्यासक्रमाला कोणताही अडथळा न आणता विद्यार्थ्यांची स्पर्धा परीक्षांसाठी भक्कम पायाभरणी केली जाते. या कोर्समुळे विद्यार्थ्यांना भविष्यात JEE किंवा NEET यापैकी योग्य दिशा निवडण्यास मदत होते. अनेक विद्यार्थ्यांनी या प्रशिक्षणाच्या जोरावर प्रतिष्ठित संस्थांमध्ये प्रवेश मिळवला असून, यंदा आदित्य कामतकर याची IIT मध्ये निवड झाल्याचा क्लासेसला अभिमान असल्याचे संस्थेने सांगितले आहे.

### ए. जी. पाटील पॉलिटेक्निकच्या विद्यार्थ्यांचे उन्हाळी परीक्षेत यश

**सोलापूर, दि. २६ जून-**

महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांच्या वतीने घेण्यात आलेल्या उन्हाळी-२०२६ डिप्लोमा परीक्षेत ए. जी. पाटील पॉलिटेक्निकच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे. महाविद्यालयातील सर्व विभागांतील प्रथम, द्वितीय आणि तृतीय वर्षातील एकूण ८६९ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. त्यापैकी ३०४ विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य मिळवले, तर २५६ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले. तसेच महाविद्यालयातील २८ विद्यार्थ्यांनी ९० टक्क्यांहून अधिक गुण मिळवून विशेष यशाची नोंद केली. कॉम्प्युटर इंजिनिअरिंग विभागातील आनंद बंगले याने ९७.४१ टक्के गुण मिळवून महाविद्यालयात प्रथम क्रमांक पटकावला. याशिवाय आठ विद्यार्थ्यांनी गणित विषयात शंभरपैकी शंभर गुण मिळवले, तर इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन विभागातील एका विद्यार्थ्याने एऊझ विषयात १०० गुण मिळवले. विभागनिहाय प्रथम क्रमांक मिळविणाऱ्यांमध्ये सिव्हिल विभागातून अनुष्का कोकरे (प्रथम वर्ष), समर्थ धुमाळे (द्वितीय वर्ष) आणि कुणाल माढेकर (तृतीय वर्ष), कॉम्प्युटर विभागातून श्रावणी लंके, आमीरअली नदाफ आणि आनंद बंगले, इलेक्ट्रिकल विभागातून नमन दुबे, शिल्पा आळगी आणि सुशांत पवार, इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन विभागातून आलिया शेख, हौसाबाई जाधव आणि साई ब्याळे, तर मेकॅनिकल विभागातून झीशान शेख, नरेश ताटी आणि सत्येंद्रकुमार ठाकूर यांनी प्रथम क्रमांक मिळवला. या उल्लेखनीय यशाबद्दल सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचा संस्थेच्या वतीने गौरव करण्यात आला. संस्थेचे अध्यक्ष सिद्धेश्वर पाटील, उपाध्यक्ष शिवानंद सिद्धेश्वर पाटील, कॅम्पस डायरेक्टर तथा प्राचार्य डॉ. एम. ए. चौगुले, उपप्राचार्य एस. के. मोहिते यांनी विद्यार्थी, विभागप्रमुख आणि शिक्षकांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या सत्कार समारंभाला शैक्षणिक समन्वयक, विभागप्रमुख, प्रशिक्षण व प्लेसमेंट अधिकारी, ग्रंथपाल तसेच सर्व शिक्षक उपस्थित होते.

# भगवंत तीर्थक्षेत्र विकास आराखड्यासाठी आ. राऊतांचे मुख्यमंत्र्यांना पत्र

## २८६ कोटींच्या विकास आराखड्यास प्रशासकीय मंजुरी व १०० टक्के निधीची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २६ जून-**

विधान परिषदेचे आमदार झाल्यानंतर आमदार राजेंद्र राऊत यांनी बार्शीच्या ऐतिहासिक व धार्मिक वैभवाशी निगडित असलेल्या श्री भगवंत मंदिर तीर्थक्षेत्र विकास आराखड्यासाठी मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पहिले पत्र देऊन विशेष बाब म्हणून शासनाकडून १०० टक्के निधी उपलब्ध करुन देण्याची मागणी केली आहे.

मुख्यमंत्र्यांना दिलेल्या पत्रात आमदार राऊत यांनी नमूद केले आहे की, बार्शीतील श्री भगवंत देवस्थान हे प्राचीन व जागृत देवस्थान असून येथे दरवर्षी आषाढी व कार्तिकी एकादशी, माघवारी, अधिक मास, श्री गजानन महाराज पालखी सोहळा, भगवंत महोत्सव तसेच दीपोत्सव यासारख्या धार्मिक कार्यक्रमांदरम्यान लाखो भाविक दर्शनासाठी येतात. त्यामुळे बार्शीचे धार्मिक महत्त्व दिवसेंदिवस वाढत आहे.

बार्शी व परिसर हा दुष्काळी पट्ट्यात मोडत असल्याने रोजगाराच्या संधी मर्यादित आहेत. तीर्थक्षेत्राचा सर्वांगीण विकास झाल्यास भाविकांची संख्या वाढून पर्यटनाला चालना मिळेल. तसेच स्थानिक युवकांसाठी रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होतील, असेही त्यांनी पत्रात म्हटले आहे.

शासनाकडे यापूर्वीच २८६.०१ कोटी रुपयांच्या तीर्थक्षेत्र विकास आराखड्याचा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. मात्र विद्यमान शासन निर्णयानुसार 'ब' श्रेणीतील तीर्थक्षेत्रासाठी ५० टक्के निधी शासनाने, २५ टक्के निधी स्थानिक स्वराज्य संस्थेने आणि २५ टक्के निधी संबंधित देवस्थान ट्रस्टने उभारणे अपेक्षित आहे. बार्शी नगरपरिषदेची आर्थिक परिस्थिती तसेच श्री भगवंत देवस्थान ट्रस्टचे मर्यादित उत्पन्न लक्षात घेता ही रक्कम उभारणे शक्य नसल्याचे आमदार राऊत यांनी स्पष्ट केले आहे. यामुळे श्री भगवंत मंदिर तीर्थक्षेत्र विकास आराखड्यास विशेष बाब म्हणून शासनाने १०० टक्के निधी मंजूर करावा, अशी मागणी त्यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली आहे. या मागणीमुळे बार्शीच्या धार्मिक, पर्यटन आणि आर्थिक विकासाला नवी दिशा मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.



## माढा महाविद्यालयातील कुणबी विद्यार्थ्यांची फी कमी करण्यासाठी निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि. २६ जून-**

माढा कला व वाणिज्य महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या काही कुणबी विद्यार्थ्यांची फी जादा घेतल्याचे निदर्शनास आल्याने राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे विद्यार्थी संघटनेचे माढा तालुका सचिव अक्षय शिंदे यांनी ज्यादा घेतलेली फी संबंधित विद्यार्थ्यांना परत देण्याची निवेदनाद्वारे मागणी केली आहे.

त्या निवेदनात म्हटले आहे की, माढा महाविद्यालयात कुणबी प्रमाणपत्र धारक विद्यार्थाचे प्रवेश करताना त्यांच्याकडून सर्वसाधारण वर्गातील फी आकारण्यात आली आहे. ज्या विद्यार्थ्यांकडे कुणबी प्रमाणपत्र आहे व त्यांचा प्रवेश निश्चित झाला आहे तसेच ज्यांच्याकडून जादाची फी घेतली आहे त्या विद्यार्थ्यांना त्यांची फी त्वरित परत करावी. तसेच महाविद्यालयात डिजिटल पेमेंटची सुविधा उपलब्ध करून विद्यार्थ्यांना द्यावी जेणेकरून



प्रवेश घेताना त्यांना डिजिटल पेमेंटद्वारे महाविद्यालयाची प्रवेश शुल्क भरता येईल. या सकारात्मक पद्धतीने विचार करून त्वरित त्या पूर्ण कराव्यात. अन्यथा येणाऱ्या काळात या संदर्भात आम्ही महाविद्यालयासमोर उपोषणास बसू. निवेदन देताना अक्षय शिंदे, स्वप्नील कदम, संदेश कदम, संदीप वागज, सुयश सुरवसे, क्षितिज गायकवाड, सौरभ काकडे, दिपक कदम, शिवम खाडेकर, सोहम जाधव, ओंकार सुतार उपस्थित होते.

> ज्या विद्यार्थ्यांकडे वैद्यतेसह कुणबी प्रमाणपत्र आहे अश्या विद्यार्थ्यांना इतर मागासवर्गीयप्रमाणे प्रवेश फीमध्ये सवलत दिली जात आहे. ज्या विद्यार्थ्यांकडे कुणबी प्रमाणपत्र आहे परंतु जात वैद्यता प्रमाणपत्र नाही अशा विद्यार्थ्यांना खुल्या प्रवर्गातून प्रवेश दिला जात आहे. संबंधित विद्यार्थ्यांनी योग्य ती कागदपत्रे सादर केल्यास त्यांनाही इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांप्रमाणे फीमध्ये सवलत दिली जाईल.
>
> **- घन:शाम हराळे,**
> प्रभारी प्राचार्य, माढा महाविद्यालय

## पालखीमधील वारकऱ्यांना सुविधा देण्यासाठी माळशिरस न. पंचायातीस ४६ लाख मंजूर

**तभा वृत्तसेवा,**
**माळशिरस, दि. २६ जून-**

पालखी मार्गावरील ग्रामपंचायती पालखी मधील वारकऱ्याना सेवा सुविधा पुरविण्यासाठी निधी दिला जात होत त्याच धर्तीवर पालखी मार्गावरील नातेपुते, माळशिरस येथील नगरपंचायातीस तसेच अकलूज नगर परिषदेमधील हद्दीत वारकऱ्याना सेवा सुविधा देण्यासाठी १ कोटी ८१ लाख रुपये मंजूर झाले आहेत.

त्यामध्ये माळशिरस नगरपंचायात हद्दीतील कामासाठी ४६ लाख रुपये, नातेपुते नगर पंचायात हद्दीमधील कामासाठी ५५ लाख रुपये तर अकलूज नगर परिषद हद्दीतील कामासाठी ८० लाख रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. माळशिरस नगर पंचायात हद्दीतील पालखीत व परिसर मुरमिकरण २० लाख, पालखीतळ येथे आरोग्य विषयक जंतुनाशक व किताक्नाषक इ कामे ५ लाख, पालखी तळ व पालखी मार्ग दिवाबत्ती सोय तसेच पाणी पुरवठ्याच्या अनुषंगाने कामे ५ लाख रुपये, पालखी तळ येथे मंडप व आपत्कालीन मदत केंद्र तयार करणे ५ लाख रुपये, पालखी तळ येथे तंकर फिडीग पोईट व जलशुद्धीकरण साठी मनुष्यबळ पुरवणे ३ लाख, पालखी मार्ग वारकरी यांच्यासाठी सर्व अनुषंगिक सेवा सुविधा पुरविणे ८ लाख रुपये असे ४६ लाख रुपये मंजूर झाले आहेत. यामध्ये मुरमी कर्णाचे काम सार्वजनिक बांधकाम विभाग करणार असून इतर कामे नगर पंचायत करणार आहे.

> **अनेक वर्षाची मागणी मान्य**
>
> पालखी मार्गावरील गावांना वारकऱ्यांना सेवा सुविधा पुरविण्यासाठी निधी दिला जात होता .परंतु नगर पंचायतींना दिला जात नव्हता याबाबत पाठपुरावा करीत होतो.पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी याची दखल घेत निधी मंजूर केला आहे.
>
> **- आप्पासाहेब देशमुख,**
> माजी नगराध्यक्ष

## आर्या कॉलेज ऑफ फार्मसीच्या विद्यार्थ्यांचे यश

**टेंभुर्णी, दि. २६ जून-**

आर्या कॉलेज ऑफ फार्मसी, टेंभुर्णी येथील विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांच्या वतीने घेण्यात आलेल्या उन्हाळी २०२६ परीक्षेमध्ये उल्लेखनीय यश संपादन केले.

डी. फार्मसी प्रथम वर्षाच्या निकालामध्ये जयमाला बाबर हिने ८१.५० टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. प्राची गोमे हिने ७८.३० टक्के गुणांसह द्वितीय, तर राधिका पवार हिने ७७.४० टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक मिळविला. तसेच डी. फार्मसी द्वितीय वर्षामध्ये निखिल शिंदे याने ७६.४६ टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक प्राप्त केला. निकिता शिंदे हिने ७३.६४ टक्के गुणांसह द्वितीय, तर दिपाली मुटकुळे हिने ७१.९१ टक्के गुणांसह तृतीय क्रमांक संपादन केला. सर्व गुणवंत व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे जिल्हा दूध संघाचे अध्यक्ष रणजितसिंह शिंदे, महाविद्यालय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा प्रणिता शिंदे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. धनंजय चव्हाण यांनी अभिनंदन केले.

## छत्रपती शाहू महाराज जयंती व मोहरमनिमित्त फळे वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. २६ जून-**

करमाळा शहरातील उपजिल्हा रुग्णालय येथे छत्रपती राजर्षी शाहू महाराज जयंती व मोहरम सणानिमित्त मराठा सेवा संघ, संभाजी ब्रिगेड, शिवजयंती उत्सव समिती व बहुजन विचारवादी संघटनांच्या वतीने पत्रकारांच्या हस्ते उपजिल्हा रुग्णालय करमाळा येथे फळे व अल्पोपार वाटपाचा कार्यक्रम संपन्न झाला.



यावेळी पत्रकार शितलकुमार मोटे, नासीर कबीर अशपाक सय्यद, सचिन जव्हेरी, सिद्धार्थ वाघमारे, विशाल घोलप, प्रफुल्ल दामोदरे, अंगद भांडवलकर, विशाल परदेशी, आलिम शेख, आयुब शेख, तुषार जाधव, प्रशांत भोसले, हर्षवर्धन गाडे, सुनील भोसले, अशोक मुरूमकर आदी पत्रकारांच्या प्रमुख उपस्थितीत व त्यांच्या हस्ते हा कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी सुरुवातीला राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या प्रतिमेचे पूजन वैद्यकीय अधीक्षक डॉ प्रतिजा वेदपाठक यांच्या हस्ते व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पूजन करण्यात आले. यावेळी भीमराव लोंढे यांनी जिजाऊ वंदना गायन केले. यावेळी मराठा सेवा संघाचे अध्यक्ष सचिन काळे यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी तानाजी जाधव, माजी नगराध्यक्ष शौकत नालबंद, पंचायत समिती सदस्य भरत अवताडे, नगरसेवक महादेव फंड, फारूक जमादार, सचिन अब्दुल्ले, सचिन गायकवाड, संतोष वारे, ज्योतीराम लावंड, मनसेचे उपजिल्हाप्रमुख नानासाहेब मोरे, अमीरशेठ तांबोळी, शिवसेना शहर प्रमुख पंकज परदेशी, नवनाथ राखुंडे, प्रा नागेश माने, अजय कांबळे, गजानन ननवरे, आझाद शेख, सुरज शेख, सोहेल पठाण, जमीर सय्यद, राष्ट्रवादीचे अशपाक जमादार, मुस्तकीन पठाण, गणेश कुकडे, मोबीन बागवान उपस्थित होत. सचिन काळे यांनी आभार मानले.



## नगरसेवक महेश इंगळे यांनी घेतले साईबाबांचे दर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २६ जून-**

येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे चेअरमन व भारतीय जनता पार्टीचे नगरसेवक महेश इंगळे यांनी आपल्या मित्र परिवारसह शिर्डी येथे

श्री साईबाबा समाधी मंदिरात जाऊन साईबाबांचे मनोभावे दर्शन घेतले. यावेळी श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था शिर्डीच्या वतीने संस्थानचे मुख्य अधिकारी गराडे साहेब यांनी महेश इंगळे यांचा शाल, श्रीफळ व साईबाबांची प्रतिमा देऊन यथोचित सत्कार केला. तत्पूर्वी संस्थान पदाधिकाऱ्यांनी त्यांचे स्वागत केले. यावेळी चेअरमन महेश इंगळे यांनी साईंच्या मध्यान्न नैवेद्य आरतीस उपस्थित राहून लाभ घेतला.यावेळी श्रीशैल गवंडी, प्रा.शिवशरण अचलेर, सुनिल पवार, अंकूश केत, बाळासाहेब एकबोटे, स्वामीराव मुसळे, तुषार मोरे, रविंद्र महाले, वाहतुक पोलीस नियंत्रक बणजगोळ उपस्थित होते.



## बार्शीत अबॅकस व वैदिक गणिताची राष्ट्रीय स्पर्धा

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. २५ जून-**

अबॅकस व वैदिक गणिताची राष्ट्रीय स्पर्धा महाराष्ट्र, कर्नाटक, गोवा आदी राज्यातून १३० स्पर्धकांनी भाग घेतला होता. स्पर्धकांबरोबर त्यांच्या पालकांचाही उत्साह व उपस्थिती मोठ्या प्रमाणात होती. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून मदगोंडा पुजारी, बसवराज पुरवंत लाभले.

प्रमुख उपस्थिती गोपाल कबाडे, महादेव सर्जापूर, सदाशिव कबाडे यांची होती. ही स्पर्धा वनुजा कबाडे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. सूत्रसंचालन संस्कृती थळपती यांनी केले. बक्षीस वितरणाच्या प्रारंभी विनोद कबाडे यांनी प्रमुख उपस्थितांचे हार, शाल व स्मृतीचिन्ह देऊन स्वागत केले. हे स्पर्धेचे युग असून स्पर्धांमधूनच स्वतःचे मूल्यमापन कळते, तसेच यशस्वी माणूस घडतो. त्यामुळे स्पर्धांकडे सकारात्मक दृष्टीने पाहण्याचे आवाहन यावेळी पुजारी यांनी केले.

बसवराज पुरवंत यांनी व्ही. के. इन्स्टिट्यूट, बार्शी ही उपक्रमशील संस्था आहे. सातत्याने समाजोपयोगी कार्यामध्ये अग्रेसर आहे. केवळ समाजाचे हित लक्षात ठेवून या स्पर्धेचे आयोजन केल्याबद्दल संस्थेविषयी कृतज्ञता व्यक्त केली. विनोद कबाडे यांनी आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली. कार्यक्रमासाठी प्रशांत कबाडे, प्रथमेश निरंजन, रवी मेळे, गंगाधर सर्जापूर, शिवानंद सर्जापूर, यशराज कबाडे, राकेश मेळे यांचे सहकार्य लाभले.

> **पारितोषिक विजेते**
>
> अबॅकस स्पर्धा- अर्णव मोरे प्रथम क्रमांक- रेंजर सायकल, सिद्धार्थ कोटाळी द्वितीय- स्मार्ट वॉच, स्वराली पांढरे तृतीय- वॉटरप्रूफ बॅग. वैदिक गणित- चॅम्पियन ट्रॉफी- भारती मस्तुद यांनी पटकावली.

## एपीआयला धक्काबुक्की; चौघांवर गुन्हा

**सोलापूर, दि.२६ जून-**

भांडण करणाऱ्या मद्यधुंद तरुणांना थांबविण्याचा प्रयत्न करणाऱ्या ड्युटी बजावणाऱ्या एका सहा. पोलिस निरीक्षकास धक्काबुक्की केल्याचा प्रकार होटगी रोडवरील मजरेवाडी क्रॉस रोडवर घडला. या प्रकरणी चौघांविरोधात एमआयडीसी नाका पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे. सिध्दाराम सुभाषय्या स्वामी, महेश शिवपुत्र हिचगे, सागर श्रीकांत हत्तुरे व अनिकेत शंकर बनसोडे (सर्व रा. सोलापूर) अशी गुन्हा दाखल आरोपींची नावे असून पोलिस कॉन्स्टेबर वाघमारे यांनी एमआयडीसी पोलिसात फिर्याद दिली. एमआयडीसी पोलिस ठाण्याचे स.पोलिस निरीक्षक मस्के हे कर्मचाऱ्यांसोबत गस्त घालत असताना होटगी रोडवरील मजरेवाडी क्रॉस रोडवरील अनिश बिअरबार येथे काही तरुण दारुच्या नशेत एकमेकांसोबत भांडण करत मारामारी करताना दिसले. यावेळी मस्के यांनी त्यांना विचारणा केली असता त्यांनी अंगावर धावून येऊन पाठीमागून जोरात ढकलून दिले. बघून घेईन अशी धमकीही दिली.

## सांगोल्यातील पालखी मार्गावरील ग्रामपंचायतींना निधी देण्याची मागणी

**सांगोला, दि.२६ जून-**

सांगोला तालुक्यातील पालखी मार्गावरील ग्रामपंचायतींना वारकरी भाविकांसाठी पाणी, स्वच्छता व आरोग्य सुविधांसाठी विशेष निधी उपलब्ध करून देण्यात यावा, अशी मागणी जि.प.सदस्य दादासाहेब लवटे यांनी जि.प.सोलापूर यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

तालुक्यातील पालखी मार्गावरील सर्व ग्रामपंचायतीना वारकरी संख्येनुसार विशेष निधी मंजूर करावा, आषाढी व कार्तिकी वारीसाठी स्वतंत्र वारी सुविधा निधी उपलब्ध करून द्यावा, पिण्याच्या पाण्यासाठी टँकर, पाण्याच्या टाक्या व आवश्यक जलपुरवठा व्यवस्था उपलब्ध करावी, महिला व पुरुषांसाठी स्वतंत्र फिरती शौचालये व स्नानगृहांची व्यवस्था करावी, प्राथमिक आरोग्य पथके, वैद्यकीय अधिकारी, औषधसाठा व रुग्णवाहिका उपलब्ध करून द्याव्यात, ग्रामपंचायतीना अतिरिक्त स्वच्छता कर्मचारी व कचरा व्यवस्थापनासाठी विशेष अनुदान मंजूर करावे, आचकदाणी, महूद, खवासपूर, लोटेवाडी व इतर प्रमुख मुक्कामस्थळी कायमस्वरूपी पाणी व स्वच्छता सुविधा विकसित कराव्यात, जि.प., पंचायत समिती, आरोग्य विभाग, पाणीपुरवठा विभाग व स्वच्छ भारत मिशन यांच्या समन्वयातून विशेष कृती आराखडा तयार करून तातडीने अंमलबजावणी करावी अशी मागणी केली आहे.

> वारी कालावधीत सतत विविध दिंड्यांचे आगमन होत असल्यामुळे ग्रामपंचायतींवर पाणीपुरवठा, स्वच्छता, आरोग्य सेवा व कचरा व्यवस्थापनाचा अतिरिक्त भार पडतो. ग्रामपंचायतींची आर्थिक क्षमता मर्यादित असल्याने स्वतःच्या निधीतून आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे शक्य होत नाही.
>
> **-दादासाहेब लवटे**, जि.प.सदस्य



आपला
# जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## वीज पडून मृत महिलेच्या वारसास ४ लाख रुपयांची मदत : शेजूळ

**तभा वृत्तसेवा,**
**माळशिरस, दि. २६ जून -**
यंदा २३ मे रोजी झालेल्या अतिवृष्टी, वादळी वाऱ्यात जाधववाडी, भांबूर्डी येथे पारूबाई काळे (रा भांब) यांचा वीज पडून मृत्यू झाला होता. त्यांच्या वारसास ४ लाख रुपयांची आर्थिक मदत दिल्याची माहिती तहसीलदार सुरेश शेजूळ यांनी दिली.

पत्रकारांशी बोलताना त्यांनी ही माहिती दिली.१ जून ते २३ जून दरम्यान अतिवृष्टी, वादळी वारे, अवकाळी पावसामुळे ३७५ शेतकऱ्यांचे फळ पिक सोडून बागायत पिकाखालील १३४.५८ हेक्टर क्षेत्राचे २२ लाख ८७ हजार ८६० रुपयांचे तसेच ५ हजार ६६८ शेतकऱ्यांचे ३ हजार ३८१.६८ फळपिकाचे ७ कोटी ६० लाख ८७ हजार ८०० असे एकूण ६ हजार ४३ शेतकऱ्यांचे ७ कोटी ८३ लाख ७५ हजार ६६० रुपये पिके व फळबागांचे नुकसान झाले आहे.

### महत्त्वाचे...



## सोलापूर जिल्हा विभागीय वाहतूक अधिकारीपदी संजय भोसले

**सोलापूर, दि. २६ जून-**
अक्कलकोटचे रहिवासी संजय भोसले यांची राज्य परिवहन महामंडळाच्या सोलापूर जिल्हा विभागीय वाहतूक अधिकारी या उच्च पदावर निवड करण्यात आली. निवडीनंतर पहिल्यांदा अक्कलकोट आगारात आगमन होताच आगार व्यवस्थापक खताळ यांनी स्वागत केले. तसेच कर्मचारी व कामगार संघटनेतर्फे सत्कार करण्यात आला. यावेळी तालुका वृत्तपत्र विक्रेते संघटनेचे अध्यक्ष मल्लिकार्जुन कोरे महामंडळातर्फे अंबण्णा कोळी, मदन घाटगे, गुरू गोडेन, वसंत बंडगर, श्रीशैल बोदले, अनिल पाटील, विनायक शिंदे. कर्मचारी व अधिकारी उपस्थित होते.

## निंबर्गीचे गंगाधर बिराजदार यांना शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कार जाहीर



**दक्षिण सोलापूर, दि.२६ जून -**
येथील प्रगतशील शेतकरी गंगाधर बिराजदार यांना वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कार जाहीर झाला आहे. मुंबई येथे राजभवनात १ जुलै रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, राज्यपाल जिष्णूदेव वर्मा, कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते ४४ हजार रुपयाचा धनादेश व स्मृतीचिन्ह देऊन सपत्नीक हा पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे. बिराजदार यांनी आधुनिक कृषी तंत्रज्ञान, जलसंधारण, सेंद्रिय शेती आणि मूल्यवर्धित उत्पादन क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करून शेती व्यवसायाला नवी दिशा दिली आहे. तूर पिकामध्ये प्रति एकर १६ क्विंटल विक्रमी उत्पादन घेऊन त्यांनी विशेष यश संपादन केले. त्यांच्या या कामगिरीची दखल केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतली होती. ठिबक सिंचन, तुषार सिंचन आणि अचूक पाणी व्यवस्थापन तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून त्यांनी पाण्याची बचत आणि उत्पादनवाढ साध्य केली आहे. संरक्षित सिंचनासाठी शेततळ्यांचा प्रभावी वापर, सेंद्रिय खतांचा वापर, जैविक घटकांचा वापर करून पर्यावरणपूरक आणि शाश्वत शेतीचा आदर्श निर्माण केला आहे. उच्च दर्जाच्या बेदाणा उत्पादनाचा यशस्वी प्रकल्प उभारला. निंबर्गी ॲग्रो फार्मर्स प्रोड्युसर कंपनी लिमिटेड ची स्थापना करून परिसरातील शेतकऱ्यांना संघटित केले.

## सिमेंटच्या रस्त्यामुळे अपघात, कारवाई करा अन्यथा आंदोलन : शशिकांत शिंदे

**सोलापूर, दि.२६ जून-**
होटगी रोड येथील सिमेंटच्या रस्त्यामुळे अनेक अपघात झाले असून, कंत्राटदाराच्या चुकीमुळे अनेकजण हॉस्पिटलमध्ये दाखल आहेत. बेजबाबदारपणा करून जनतेच्या जीविताशी खेळ करणाऱ्या संबंधित कंत्राटदारावर योग्य ती कायदेशीर कारवाई करावी. यापुढे एकही अपघात झाला तर संभाजी आरमाराला आंदोलन करावे लागेल, असा इशारा उपजिल्हाधिकारी यांना उपाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी एका निवेदनाद्वारे दिला आहे. यावेळी गजानन जमदाडे, सागर ढगे, अविनाश विटकर, मल्लिकार्जुन पोतदार, सतीश सारोळे, महेश घोडके, प्रदीप मोरे, सुधाकर करणकोट, मनोज पंगुडवाले, प्रवीण मोरे आणि अपघातग्रस्त कुटुंबातील आतिक शेख उपस्थित होते.

# विकासाची घोडदौड दुप्पट गतीने चालू राहणार

## आमदार राजेंद्र राऊत; अधिवेशन संपल्यावर नागरिकांच्या अडीअडचणी जाणून घेणार

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. २६ जून-**
बार्शी शहर व तालुक्यात बाजार समिती, जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुका, नगरपालिका तसेच विधान परिषद निवडणुकीत विजयाबद्दल व सत्ता केंद्र ताब्यात दिल्याबद्दल बार्शी शहर व तालुक्यातील मतदारांची पावसाळी अधिवेशन संपल्यावर प्रत्यक्ष भेट घेणार आहे. शहर-तालुक्यात विकासाची घोडदौड आता दुप्पट गतीने चालू राहणार आहे, असे आश्वासन सोलापूर जिल्ह्याचे नूतन आमदार राजेंद्र राऊत यांनी दिले आहे.



बार्शीतील शासकीय बाजार समिती येथे नूतन आमदार राजेंद्र राऊत यांनी शुक्रवारी दि. २६ जून रोजी पत्रकार परिषद घेतली. यावेळी ते बोलत होते. बार्शी तालुक्याला जिल्हा परिषद अध्यक्षपदाचा मान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यामुळे मिळाला. विधान परिषद निवडणुकीतही मला विजयी करण्यामध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस व पालकमंत्री जयकुमार गोरे यांचे मोठे सहकार्य लाभले. मी आमदार नसल्यामुळे लोकांना विकासकामांविषयी कुठेतरी दुर्लक्ष होईल असे वाटत होते. परंतु श्री भगवंत व आपल्या सगळ्यांच्या आशीर्वादाने मी आज आमदार झालो. बार्शी नगरपालिकेच्या निवडणुकीत पाणी देण्याचा शब्द दिला होता. पण कुर्डूवाडी ते पिंपळनेर दरम्यान नवीन पाईप लाईन रस्त्याच्या मध्ये येत असल्यामुळे त्याचे काम होऊ शकले नाही. परंतु तुम्ही तशीच पाईपलाईन करा म्हणत असाल तर उद्याच करायला सुरुवात करण्यात येईल. परंतु राष्ट्रीय महामार्गाच्या अडचणीमुळे ते काम शक्य होणार नाही. आपले पैसे फुकट वाया जातील.

अक्कलकोट येथे रस्ते महामार्गमंत्री नितीन गडकरी यांना प्रत्यक्ष भेटलो. त्यांनी मला या मार्गाचे लवकरच विस्तारीकरण करणार असा शब्द दिला. कुठल्याही परिस्थितीत मी बाराशे कोटी रुपयांचा निधी या ठिकाणी उपलब्ध करुन देतो आणि भूसंपादनला २५० कोटी आणि साडेनऊ कोटी रस्त्याच्या कामाला, असे सांगितल्याने त्याचीही मंजुरी एक महिन्यात दिल्लीला जाऊन आणतोय. कुर्डूवाडी ते पिंपळनेर या ठिकाणी भूसंपादन करुन कामाला सुरुवात होईल.

नगरपालिका निवडणुकीत पाणीपुरवठा सुरळीत केला जाईल असा शब्द दिला होता, त्याबद्दल मी आपली माफी मागतो. तांत्रिक अडचणीमुळे एक वर्षभर आणखी मुदत द्या, नवीन पाईप लाईन झाल्यावर आपल्याला कायमस्वरुपी रोज पाणी मिळणार आहे. साधारण पुढच्या ३०-३५ वर्षांचा विचार केलेला आहे. त्यामुळे कोणी गैरसमज करुन घेऊ नये. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व सुनेत्रा पवार यांच्याकडून विकास कामाला येणाऱ्या काही दिवसांमध्ये निधी मंजूर होणार आहे. पत्रकार परिषद घेऊन सगळ्या जनतेच्या समोर ही माहिती दिली जाईल, असे आमदार राऊत म्हणाले.

पत्रकार परिषदेत सोलापूर जिल्हा परिषद अध्यक्ष दीपक वैद्य, नगराध्यक्षा तेजस्विनी कथले, बाजार समितीचे चेअरमन विजय गरड, पंचायत समिती सभापती मीनाक्षी रोंगे आदी उपस्थित होते. बार्शी शहर व तालुक्यातून आलेल्या सर्व कार्यकर्त्यांच्यावतीने नूतन आमदार राजेंद्र राऊत यांचा सत्कार करण्यासाठी गर्दी झाली होती. यावेळी जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, नगरपालिका सदस्य, बाजार समिती संचालक आदींसह भाजप कार्यकर्ते व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### जास्तीत जास्त पिक विमा मिळवून देणार

शेतकऱ्यांना जास्तीत जास्त पिकविमा कसा मिळेल यासाठी प्रयत्न करणार आहे. सोलापूर जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या माध्यमातून व जिल्हा दूध संघ सुद्धा कसा चालू करता येईल. याबाबतीतही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व सुनेत्रा पवार यांच्याबरोबर चर्चा करुन पाठपुरावा करणार आहे.

### पदाधिकाऱ्यांसोबत करणार बार्शी तालुक्याचा दौरा

आमदार झाल्यावर लगेच अधिवेशन चालू झाले. अधिवेशन झाल्यानंतर मी सगळ्या ग्रामीण भागाचा व शहरात जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपालिका व बाजार समितीमध्ये सत्ता आल्याबद्दल सगळ्यांचे आभार मानण्यासाठी सर्व पदाधिकाऱ्यांना सोबत घेऊन दौरा करणार असल्याची ग्वाहीही त्यांनी दिली.

## 'इटी नाऊ मशिनिस्ट सुपर शॉपफ्लोअर वॉर्ड'चा 'प्रिसिजन'मानकरी

### सलग तिसऱ्या वर्षी राष्ट्रीय सन्मान




**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २६ जून-**
प्रिसिजन कॅमशाफ्ट्स लिमिटेडने औद्योगिक सुरक्षा, पर्यावरण संवर्धन आणि शाश्वत विकासाच्या क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीच्या बळावर यावर्षीचा प्रतिष्ठेचा 'इटी नाउ मशिनिस्ट सुपर शॉपफ्लोअर वॉर्ड २०२६' पटकावला आहे. 'एनव्हार्यलमेंटल सोशल ॲण्ड गव्हर्नन्स' या विभागातील 'मीडीयम एन्टरप्रायज सेगमेंट'मध्ये कंपनीला 'फस्ट रनर अप' हा राष्ट्रीय सन्मान प्रदान करण्यात आला. विशेष म्हणजे, २०२४, २०२५ आणि २०२६ या सलग तीन वर्षांमध्ये 'इटी नाउ मशिनिस्ट सुपर शॉपफ्लोअर वॉर्ड' मिळविण्याची हॅट्रिक साधणाऱ्या मोजक्या भारतीय कंपन्यांमध्ये प्रिसिजन कॅमशाफ्ट्स लिमिटेडने स्थान मिळवले आहे.

देशातील ऑटोमोबाईल उद्योगातील उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या कंपन्यांचा गौरव करण्यासाठी 'द टाईम्स ग्रुप वर्ल्ड वाईड मीडिया' आणि 'इटी नाउ' यांच्या संयुक्त विद्यमाने हा प्रतिष्ठेचा पुरस्कार दरवर्षी प्रदान केला जातो. कठोर तांत्रिक, व्यवस्थापन आणि कार्यपद्धतीच्या मूल्यमापनानंतर प्रिसिजन कॅमशाफ्ट्स लिमिटेडची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. या सातत्यपूर्ण यशामुळे औद्योगिक सुरक्षा, पर्यावरण संवर्धन आणि शाश्वत विकासाच्या क्षेत्रातील उत्कृष्टतेची कंपनीची परंपरा पुन्हा एकदा राष्ट्रीय स्तरावर अधोरेखित झाली आहे. या उल्लेखनीय यशामागे कंपनीच्या वरिष्ठ व्यवस्थापनाचे दूरदृष्टीपूर्ण नेतृत्व, प्रभावी सुरक्षा व्यवस्थापन प्रणाली तसेच सुरक्षा विभागासह सर्व विभागांतील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे सातत्यपूर्ण योगदान महत्त्वाचे ठरले आहे. सुरक्षित कार्यसंस्कृती, पर्यावरणीय जबाबदारी आणि शाश्वत विकासाच्या सर्वोच्च मानकांचे कंपनीने सातत्याने पालन केल्याची ही राष्ट्रीय स्तरावरील दखल मानली जात आहे.

पुणे येथील द वेस्टिन हॉटेलमध्ये उद्योग क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत झालेल्या दिमाखदार सोहळ्यात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. प्रिसिजन कॅमशाफ्ट्स लिमिटेडच्या वतीने सुहास पाटील (सीनीअर सेफ्टी मॅनेजर), अमित पाटील (सीनिअर ऑफिसर सेफ्टी ) आणि ऋषिकेश शिंदे (एनव्हायर्नमेंट ऑफीसर) यांनी हा पुरस्कार स्वीकारला. औद्योगिक सुरक्षेतील जागतिक दर्जाच्या कार्यपद्धती, पर्यावरणीय नियमांचे काटेकोर पालन, शाश्वत विकासासाठीची बांधिलकी, प्रभावी 'इएसजी' व्यवस्थापन तसेच सातत्यपूर्ण सुधारणा यांचा गौरव म्हणून हा पुरस्कार प्रदान करण्यात येतो. सुरक्षा आणि पर्यावरणाचे रक्षण, हेच आपले कार्यव्रत या ब्रीदवाक्याशी एकनिष्ठ राहून प्रिसिजन कॅमशाफ्ट्स लिमिटेड भविष्यातही औद्योगिक सुरक्षा, गुणवत्ता, पर्यावरण संवर्धन आणि शाश्वत विकासाच्या क्षेत्रात उत्कृष्टतेची नवी शिखरे गाठण्यासाठी कटिबद्ध असल्याचे कंपनीने यावेळी स्पष्ट केले.

### हा सन्मान संपूर्ण प्रिसिजन परिवाराचा

हा सन्मान कोणत्याही एका विभागाचा किंवा व्यक्तीचा नसून संपूर्ण प्रिसिजन परिवाराच्या सामूहिक प्रयत्नांचा, शिस्तबद्ध कार्यपद्धतीचा आणि सुरक्षिततेप्रती असलेल्या दृढ बांधिलकीचा गौरव आहे. कंपनीतील प्रत्येक कर्मचारी, अधिकारी आणि व्यवस्थापनाने सुरक्षा, गुणवत्ता आणि पर्यावरण संवर्धनाला सर्वोच्च प्राधान्य दिल्यामुळेच आम्हाला सलग तिसऱ्या वर्षी हा राष्ट्रीय सन्मान प्राप्त झाला आहे. भविष्यातही जागतिक दर्जाच्या मानकांचे पालन करत उत्कृष्टतेची ही परंपरा अधिक बळकट करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.

**यतीन शहा,** चेअरमन आणि व्यवस्थापकीय संचालक,
प्रिसिजन कॅमशाफ्ट्स लिमिटेड.

## अक्कलकोट उपविभागीय पोलिस अधिकारीपदी राजेंद्र टाकणे

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट, दि. २६ जून-**
अक्कलकोट उपविभागीय पोलिस अधिकारी विलास यामावार यांची पुणे येथे बदली झाली आहे. त्यांच्या रिक्त जागी उपविभागीय पोलीस अधिकारी पदावर नांदेड येथे राज्य गुप्त वार्ता विभागात अपर उपायुक्त पदावर कार्यरत राजेंद्र टाकणे यांची नियुक्ती केली आहे.

राजेंद्र टाकणे हे अक्कलकोट तालुक्यासाठी परिचित अधिकारी आहेत. यापूर्वी त्यांनी अक्कलकोट उत्तर पोलिस ठाण्यात पोलिस निरीक्षक म्हणून यशस्वीपणे काम पाहिले आहे. त्यामुळे तालुक्याची भौगोलिक परिस्थिती, सामाजिक रचना तसेच कायदा व सुव्यवस्थेच्या प्रश्नांची त्यांना चांगली जाण आहे. विशेषतः स्वामी मंदिर परिसरात गर्दीच्या उत्सवाच्या काळात होणारी वाहतुकीची कोंडी तत्कालिन पो. नि. टाकणे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभावीपणे हाताळण्याचे काम झाले.

विभागीय पोलीस अधिकारी म्हणून राजेंद्र टाकणे यांची नियुक्ती झाल्याने अक्कलकोटवासीय व अनेक राजकीय लोक प्रतिनिधी मध्ये आनंद व्यक्त होताना दिसत आहे. आता त्यांच्यावर तालुक्यातील पोलिसांची मलीन झालेली प्रतिमा व प्रतिष्ठा उंचावण्याचे मोठे आव्हान असणार आहे.

# उत्पात मंडळींना दणका; मंदिर समितीला दिलासा

## उत्पात मंडळींच्या सेवा हक्कांचे प्रकरण; जिल्हा न्यायालयाच्या रिमांड आदेशाला अंतरिम स्थगिती

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२६ जून -**
येथील श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरातील वंशपरंपरागत सेवा, हक्कांच्या वादाप्रकरणी उत्पात मंडळीतर्फे दाखल दाव्यात मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर सर्किट बेंचने मंदिर समितीला मोठा अंतरिम दिलासा दिला आहे. पंढरपूर जिल्हा न्यायालयाने मूळ दावा पुन्हा चालवण्यासाठी दिलेला आदेश चुकीचा असल्याचे प्रथमदर्शनी मान्य करत, उच्च न्यायालयाने त्याच्या अंमलबजावणीला स्थगिती दिली आहे.

उत्पात मंडळीतर्फे वीरेंद्रसिंह उत्पात व इतरांनी २०१४ मध्ये पंढरपूर येथील दिवाणी न्यायालयात (कनिष्ठ स्तर) श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीविरुद्ध दावा दाखल केला होता. रुक्मिणी माता व इतर परिवार देवतांची नित्य व नैमित्तिक पूजा-अर्चा करण्यापासून मंदिर समितीने त्यांना रोखू नये, अशी मागणी या दाव्यात केली होती. मंदिर समितीने या दाव्याला कडाडून विरोध केला होता. मंदिर अधिनियमन कायद्यातील तरतुदींनुसार हा दावा चालवण्याचा अधिकार दिवाणी न्यायालयाला नाही, असा युक्तिवाद मंदिर समितीने केला. त्यानुसार हा युक्तिवाद मान्य करत १८ एप्रिल २०१८ रोजी पंढरपूरच्या कनिष्ठ न्यायालयाने उत्पात मंडळींचा दावा फेटाळून लावला होता.

निर्णयाविरुद्ध उत्पात मंडळींनी पंढरपूरच्या जिल्हा न्यायालयात अपील दाखल केले. ६ वर्षे १० महिने चाललेल्या या अपिलावर २३ एप्रिल २०२६ रोजी जिल्हा न्यायाधीश ओ.आर.देशमुख यांनी निकाल दिला. जिल्हा न्यायालयाने कनिष्ठ न्यायालयाचा दावा फेटाळण्याचा निर्णय रद्दबातल ठरवला. तसेच, हा दावा पुन्हा नवीन पुराव्यांसह चालवण्यासाठी कनिष्ठ न्यायालयाकडे वर्ग करण्याचा आदेश दिला. जिल्हा न्यायालयाच्या या रिमांड आदेशाला श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीने कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांच्या माध्यमातून उच्च न्यायालयात आव्हानात्मक अपील दाखल केले होते. समितीचे वकील ॲड.चौधरी यांनी यावर युक्तिवाद केला की, सर्व पुरावे आणि कागदपत्रे समोर असताना जिल्हा न्यायालयाने मूळ दावा पुन्हा चालवण्यासाठी पाठवणे चुकीचे आहे.

उत्पात मंडळींनी न्यायालयात अपील केले होते. त्याबाबत मंदिर समितीने बाजू मांडली होती. ती ग्राह्य धरून न्यायालयाने मंदिर समितीच्या बाजूने निकाल दिला आहे.

**गहिनीनाथ महाराज औसेकर,**
सहअध्यक्ष,
विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती, पंढरपूर.

### दि. २४ जुलै रोजी पुढील सुनावणी

न्यायमूर्ती संदेश पाटील यांच्यासमोर २३ जून रोजी यावर सुनावणी झाली. उच्च न्यायालयाने मंदिर समितीचा युक्तिवाद विचारात घेत, उत्पात मंडळींना (प्रतिवादी) नोटीस बजावली आहे. या प्रकरणाची पुढील सुनावणी २४ जुलै रोजी होणार आहे. उच्च न्यायालयाने पंढरपूर जिल्हा न्यायालयाच्या 'रिमांड' आदेशाला अंतरिम स्थगिती दिली आहे. त्यामुळे आता येथील कनिष्ठ न्यायालयात उत्पातांचा मूळ दावा पुन्हा सुरू होणार नाही. हा मंदिर समितीला तात्पुरता मोठा दिलासा मिळाला आहे.



## खासदार संजय पाटील यांच्यावर कारवाईबाबत करमाळ्यातील पत्रकार संघटनेचे पोलिसांना निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा/ जेऊर, दि. २६ जून -**
पत्रकारांबाबत केलेल्या कथित अपमानास्पद व धमकीवजा वक्तव्याचा तीव्र निषेध करत अखिल भारतीय डिजिटल मीडिया पत्रकार संपादक संघटना, करमाळाच्या वतीने पोलिस निरीक्षक रणजीत माने,यांना निवेदन दिले. ए.पी.आय दिलीप ढेरे यांनी निवेदन स्वीकारले.

खासदार संजय पाटील यांच्यावर तातडीने कायदेशीर कारवाईची मागणी केली. मागण्यांकडे दुर्लक्ष झाल्यास राज्यभर लोकशाही मार्गाने आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही संघटनेने दिला आहे.

अखिल भारतीय डिजिटल मीडिया पत्रकार संपादक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष राजा माने, प्रदेशाध्यक्ष सतीश सावंत, राज्य महासचिव विकास भोसले तसेच जिल्हाध्यक्ष सचिन कुलकर्णी यांनी खासदारावर कठोर कारवाईची मागणी केली आहे. निवेदनावर तालुकाध्यक्ष दिनेश मडके, उपाध्यक्ष सूर्यकांत होनप, संजय साखरे, सचिव नरेंद्रसिंह ठाकुर, सहसचिव तुषार जाधव, तालुका संपर्कप्रमुख नंदकिशोर वलटे, प्रवक्ता नितीन झिंजाडे, कार्यवाह रवींद्र विघ्ने, सहकार्यवाह आनंद माळी, तालुका प्रसिद्धीप्रमुख सचिन चव्हाण, मार्गदर्शक सल्लागार नासीर कबीर, ॲड. बाबुराव हिरडे, अशोक नरसाळे, राजाराम माने यांच्यासह संघटनेच्या पदाधिकाऱ्यांच्या व पत्रकारांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

निवेदन देताना तालुकाध्यक्ष दिनेश मडके, सचिव नरेंद्रसिंह ठाकुर यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी व पत्रकार उपस्थित होते. निवेदनाच्या प्रती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, जिल्हाधिकारी सोलापूर, उपविभागीय अधिकारी करमाळा, तहसीलदार करमाळा यांना पाठविण्यात येणार आहेत, असे सांगण्यात आले.